Regd-No. N 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख ३ माहे एप्रील सन १९१६ ई० [ अंक १३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक
आकोला ९।९।०९ } S. Clemeuts,
एजंट
नं १

---

### अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० २

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं काहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनटी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच.
स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व ८५ ] पूर्णानंद [ सुरू झालें. ट. ख ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरू झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त -।- ( व्ही. पी. पोस्टेजसह ॥≈ ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र मोहनी,
पूर्णानंद-कार्यालय,
खडेबाजार-बेळगांव.

नो. नं.

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाघुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकारितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यात कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय,
सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय
### कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखे-खालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलाबाचीं फुलें, बिलदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल-तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आह्मी सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट दिसण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आह्मी तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आह्मी जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय-कोल्हापूर
नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिवांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण. मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शु॥ १ शके १८३८

## जंगलखात्याचा रिपोर्ट.

मनुष्यप्राणी हा जंगली नाहीं, तथापि त्याला राहण्यासाठीं घर लागतें ह्मणून लाकडासाठीं जंगलाशीं काम पडतें. खाण्याला दूध तूप लागतें, व गाई ह्मशींना चरण्यास कुरण हवें ह्मणून त्याला जंगलाशीं संबंध ठेवावा लागतो. अशा अनेक प्रकारांनीं त्याचा जंगलाशीं येणारा संबंध त्याला होईल तितका कमी त्रासदायक होऊन त्या बरोबर सरकारचें उत्पन्न होईल तितकें वाढावें हें दुष्कर कार्य जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांना करावें लागतें. १९१४–१५ सालीं हें काम मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्या जंगलखात्यानें कसें काय केलें, हें अर्थात् या वरील दोन दृष्टींनीं पाहिलें पाहिजे. जंगलासंबंधाचे प्लान तयार करतांना कित्येक आफिसरांनीं सरकारचें उत्पन्नाचें नुकसान करून ही व जंगलसंरक्षणाचे तत्त्वास हरताळ लावून ही लोकांच्या मागण्यांस तड जोडीच्या तत्त्वावर मान दिला असें सदर रिपोर्टावर अभिप्राय देतांना ना. चीफकामिशनर साहेब यांनीं शेरा मारला आहे, व लोकांच्या सोयीकडे अधिकाऱ्यांचें लक्ष किती आहे हें मुद्दाम वर्तमानपत्रकर्ते व इतर टीकाकार यांचें नजरेस आणावें ह्मणन जरी तो मा नसला तरी त्यांनीं तो लक्षांत घेणें अवश्य आहे. कारण सरकारी नोकरांनीं लोकाच्या हितार्थ सरकारचें उत्पन्न बुडविण्यास ही वेळेस तयार होणें व वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनीं ही ताबेदारांच्या अशा कृतीचा गौरव करणें या दोन्ही गोष्टी कल्पनासृष्टींत जरी नित्याच्या असल्या तरी व्यावहारिक सृष्टींत अपूर्वच होत. ह्मणून लोकहिताला इतकें जपणाऱ्या मे० चीफ कमिशनर साहेबांचे आह्मी मनापासून आभार मानतों, आणि त्यांच्या सारखेच प्रजाहितदक्ष अधिकारी या प्रांताला सदैव लाभोत असें परमेश्वराजवळ प्रार्थितों. थोड्या दिवसापूर्वी गुरांच्या चराईची फार गैरसोय या वऱ्हाड प्रांतांत होती. या बाबतींत लोकांच्या ओरडीकडे लक्ष देऊन सरकारी अधिकाऱ्यांनीं अंशतः तरी ही अडचण दूर करण्याचें श्रेय घेतलें आहे, आणि सध्या १५५९ चौरस मैल इतकी जागा गुरांना चरण्यासाठीं खुली ठेवण्यांत आली आहे व ही बंद असलेल्या जागेपेक्षां मोठी आहे असें रिपोर्टांत ह्मटलें आहे. वऱ्हाडांत लोकांच्या सोयीसाठीं सरकारनें २८०८८० रुपयांचें आपलें उत्पन्न बुडविलें आहे, असें रिपोर्टांत ह्मटलें आहे. लोकांचें हित व सरकारचें नुकसान हे शब्द आमच्या कानाला कसेसेच लागतात व त्यांच्यांतला विरोध ही आह्मांला कळत नाहीं. लोकांचें हित तेंच सरकारचें हित समजावें असें एरवीं ज्या सरकारी अधिकाऱ्यांचे कडून शिकविण्यांत येत असतें (आणि तें त्यांचें ह्मणणें आह्मांस सर्वथा मान्य आहे.) तेच अधिकारी अबकारी किंवा जंगल वगैरे खात्यांचे रिपोर्टाविषयीं लिहितांना हें विरोधाचें काल्पनिक भूत निर्माण करतात तेव्हां आह्मी बुचकळ्यांत पडतों. वस्तुतः जें सरकारी नुकसान ह्मणून दाखविण्यांत आलें आहे तें सार्वजनिक खजीन्याचें ह्मणजे अर्थात् प्रजेचेंच नुकसान आहे व तें प्रजेच्याच सोयीसाठीं प्रजेनें सोसणें यांत कोणताही विरोध नाहीं. विरोध केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या कल्पनेचा खेळ आहे असें ह्मणावें लागतें. लढाईचा परिणाम जंगलखात्याच्या उत्पन्नावर व खर्चावर ही झालेला दिसतो. व्यापाराच्या मंदीमुळें उत्पन्न कमी झालें आणि काटकसर करण्याच्या अवश्यकतेमुळें खर्च ही कमी झाला. गेल्यासालीं मागच्या वर्षापेक्षां १। लक्ष रुपये खर्च कमी झाला आहे. नव्या रस्त्यांवरचा खर्च मागच्या सालाच्या अर्ध्या इतकाच ठेवावा लागला. तथापि जंगलखात्यांतल्या खालच्या नोकरांच्या राहण्याच्या सोयीसाठीं खर्च करण्यास सरकारनें कमी केलें नाहीं. जंगलखात्याच्या उत्पन्नावर लढाईचा परिणाम होऊन एका बाजूनें उत्पन्न कमी झालें असलें तरी गुरचराईचे दर वाढल्यामुळें एकंदरींत उत्पन्न ३२॥ लक्षांनीं वाढलें आहे. नुसत्या वऱ्हाडांतच ही उत्पन्नाची वाढ २। लक्षांनीं झाली आहे. सध्या चोहीकडे महर्घता पसरलेली आहे. अशा वेळीं गुरचराईचे दर वाढवून लोकांच्या अडचणींत भर टाकण्याचें सरकारी अधिकाऱ्यांनीं टाळलें असतें तर त्यांच्या प्रजावात्सल्याच्या लौकिकाला तें योग्यच झालें असतें. जंगलास लागणाऱ्या आगीपासून बचाव करण्यासाठीं सावध राहणें जंगलखात्याच्या नौकरांचें कर्तव्य आहे. पण कित्येक वेळां त्यांनीं ही दक्षता न ठेवल्यामुळें आग लागते व त्याबद्दलचें प्रायश्चित्त त्यांना न मिळतां लोकांना भोगावें लागतें उदाहरणार्थ, जबलपूर— नरसिंगपूर डिव्हिजनमध्यें लागलेल्या एका आगीचा उत्पादक गुन्हेगार पकडतां आला नाहीं, ह्मणून तेथील डे. क. साहेबांनीं उन्हाळ्यांत सर्वांच्या बंदुका हिसकावून घेण्याचा हुकुम सोडल्याचें रिपोर्टांत ह्मटलें आहे. सोम्याचें प्रायश्चित्त गोम्याला असा हा प्रकार कां घडावा तें आह्मांस कळत नाहीं. गुन्हेगार पकडतां आला नाहीं तर जंगलखात्याच्या नोकरांचा हा दोष ह्मटला पाहिजे. त्याबद्दल लोकांच्या स्वातंत्र्यावर गदा काय ह्मणून? लोकांच्या बंदुकी छिनावून घेतल्यावर वाघ, रानडुकर, वगैरे हिंस्र पशूंपासून लोकांचें संरक्षण कसें व्हावें, व यामुळें लोकांच्या प्राणांची हानि झाल्यास त्याबद्दल जबाबदार कोण या गोष्टींचा खुलासा कौंसिलांतल्या आपल्या प्रतिनिधींच्या द्वारें सरकारी अधिकाऱ्यांस विचारण्याचा लोकांना हक्क आहे व तो ते योग्य रीतीनें बजावतील अशी आह्मांस उमेद आहे. दमो डिव्हिजनमध्यें लागलेल्या आगीं पैकीं निमे अधिक लोकांनीं बुद्धिपुरःसर लाविल्या असें गृहीत धरून पुनः अशा आगी लागल्यास लोकांना शिक्षा करण्याचे उपाय योजण्यांत येतील अशी धमकी ही रिपोर्टांत देण्यांत आली आहे. त्या प्रांतांतले लोक तरी दुष्ट असले पाहिजेत किंवा अधिकारी तरी आपलें काम बजावण्यांत पुरे वाकबगार नसले पाहिजेत, एरवीं असा प्रकार होणें संभवनीय नाहीं. पण एकंदर सारे लोक दुष्ट आणि तेही एखाद दुसऱ्या वर्षापुरते होणें हा मनुष्यस्वभावाचा चमत्कार ह्मटला पाहिज, व या चमत्काराला घडण्याला कांहीं बाह्यकारणें ही असलीं पाहिजेत. या कारणांचा तपास न करतां लोकांना शिक्षेची धमकी देणें हें अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वशक्तीस योग्य असलें तरी विवेकशक्तीस कमीपणा आणणारें आहे. ह्मणून या संबंधानें पुनः विचार होणें अवश्य आहे. कांहीं ठिकाणीं आगींची संख्या वाढलेली असली तरी एकंदर प्रांताचा विचार करतां ती संख्या कमी आहे ही समाधानाची गोष्ट आहे व याला कारण सरकार जें जें करील तें तें आपल्या हितासाठींच करील असा विश्वास लोकांना अधिकाधिक वाटू लागला आहे हें होय. हा त्यांचे ठायीं उत्पन्न झालेला विश्वास कोणत्याही कारणानें न ढळेल याविषयीं सरकारी अधिकाऱ्यांनीं फार जपावयास पाहिजे व उत्पन्न वाढविण्याच्या मोहाला बळी पडून आपलें उदार धोरण न बदलतां व लोकांविषयीं ही अनुदारपणाचे मनाचे ग्रह न होऊं देतां तो विश्वास दृढ होईल असें वर्तन ठवण्याची जबाबदारी अधिकारीवर्गावर आहे हें सांगावयास नकोच.

## मुदतबंदी कराराची इतिश्री.

ना. लार्ड हार्डिंज सारख्या न्यायप्रिय व लोकांच्या हक्कास जपणाऱ्या व्हाइसरायाच्या कारकीर्दींतल्या अखेरच्या कायदेकौंसिलाच्या बैठकीचे वेळीं अखेरचा ठराव ह्मणजे वसाहतींतून मजुरांना छळीत असलेल्या मुदतबंदी कराराला बेकायदेशीर ठरवून ती पद्धति अजीबात बंद करण्याविषयींचा यावा व त्यावर सरकारी अधिकारीं उगाच अन्यायाच्या मंडनाची तसदी न घेतां मुकाट्यानें त्या ठरावाचा स्वीकार करावा, ही गोष्ट लार्ड हार्डिंज साहेबांच्या आजपर्यंतच्या कारकीर्दीला पूर्णपणें साजणारी अशीच झाली. ना. मि. मदनमोहन यानीं ठराव आणिला आणि ना. व्हाइसराय साहेबांनीं एकदम त्याचा स्वीकार केला. वादाविवादाचें कारणच पडलें नाहीं. ही पद्धति इतकी दुष्ट, अन्यायाची, आणि लोकांना तिटकारा आणणारी आहे कीं तिला या पूर्वींच मोक्ष मिळावयास पाहिजे होता. पण तो देण्याचें श्रेय लार्ड हार्डिंज साहेबांच्या पदरांत पडावयाचें असा ईश्वरी नेमानेम होता व त्याप्रमाणें झालें. हा ठराव सरकारनें स्वीकारला, तरी वसाहतींतल्या स्थानिक सरकारांशीं पत्रव्यवहार होऊन तो अंमलांत येईपर्यंत कांहीं काळ जाईलच. पण हा काळ जितका अल्प व विलंब जितका अनिवार्य असेल तितका सहन करून ठरावाची अंमलबजावणी झालेली पाहण्यास जरी लार्ड हार्डिंज साहेब अधिकारावर राहिले नाहींत, तरी त्यांच्यामागून येणारे व्हाइसराय लार्ड चेम्सफोर्ड हे या बाबतींत लार्ड हार्डिंज साहेबासारखीच न्यायप्रियता, सहानुभूति आणि चिकाटी या गुणांचा परिचय करून देतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

आस्ट्रेलिया ही स्वराज्याचा हक्क भोगणारी एक मोठी ब्रिटिश वसाहत आहे. त्या ठिकाणीं अलीकडे मजूरांचे संप वारंवार झाले आहेत. पायोनियरच्या बातमीदारानें या संपाबद्दलची मजेदार हकीकत त्या पत्राला कळविली आहे. तो बातमीदार लिहितो कीं मजुरांनीं संप करून कारखान्याचें काम बंद पाडणें हें कायद्याचे दृष्टीनें गुन्हा समजून पोलिसांनीं संप करणारावर खटले केले. न्याय कोर्टांत त्यांचेवर खटला चालला व न्यायाधिशानीं त्यांना दंडाची शिक्षा ठोठावली. पण या वसाहतीसारख्याच दुसऱ्या एका वसाहतींत-न्यू साऊथ वेल्समध्यें-असेच संप एका वर्षांत ३०० वेळा झाले. या संपांत हजारो मजुर सामिल होते. पण पोलिसांनीं त्यांतल्या फक्त ५६ जणांवरच खटले केले. न्यायाधिशांनीं ही त्यांना सर्वांना मिळून २५९२ पौंड दंड केला. झालें न्यायदेवतेनें आपलें काम केलें. पण दंड एकानें सुद्धां भरला नाहीं ! न्यायदेवतेची प्रतिष्ठा कायम ठेवून स्वराज्याचा हक्क भोगण्यापासून होणारे फायदे ही लोकांच्या पदरांत टाकणाऱ्या राज्यपद्धतीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे! लार्ड चेम्सफोर्ड यांनीं या वसाहतींतल्या राज्यपद्धतीचा पूर्ण अनुभव घेतला आहे. त्यांनीं तेथील प्रजेला दिलेलें स्वातंत्र्य हिंदुस्थानच्या प्रजेला त्यांच्या कारकीर्दींत कितपत मिळतें तें पहावें.

## आणखी एक कमिशन.

कमिशन बसणार असें ऐकलें कीं हिंदुस्थानच्या भावी अभ्युदयाचीं स्वप्नें कित्येकांना दिसूं लागतात. आमची इतके खुळे नाहीं आहोंत हें सांगण्यास आह्माला बिलकुल शंका वाटत नाहीं. डी सेंट्रालिझेशन कमिशन, एज्युकेशन कमिशन, युनिव्हर्सिटी कमिशन वगैरे अनेक कमिशनांचे मागचे अनुभव पाहिले, व पब्लिक सर्विस कमिशनाचा रिपोर्ट गुप्त ठेवण्यांत येणारी दक्षता लक्षांत घेतली ह्मणजे ही कमिशनांची साथ हिंदुस्थानच्या पाठची कधीं सुटते असें वाटावयास लागतें. पण हिंदुस्थान इतकें दैववान् कोठें आहे! ना. मि. रहिमतुल्ला यांनीं हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याच्या भविष्याबद्दल चौकशी करण्यासाठीं हिंदुस्थान सरकाराजवळ कमिशन मागितलें, आणि तें हां हां ह्मणतां सरकारकडून मिळालें. यांत भाग्याची गोष्ट येवढीच आहे कीं या कमिशनचे अध्यक्ष सर टॉमस हॉलंड सारखे खऱ्या कळकळीचे गृहस्थ असून औद्योगिक बाबतींत ज्यांना अग्रगण्य ह्मणतां येईल अशा एक दोन हिंदी गृहस्थांना नेमण्याचा आपला विचार सरकारनें स्पष्टपणें कळविला आहे. हे हिंदी मेंबर कोण असतील हें जरी नांवें घेऊन सरविल्यम क्लार्क यांनीं सांगितलें नाहीं तरी मुंबईचे सर फाजल भाई करीम भाई, कलकत्याचे सर राजेंद्रनाथ मुकर्जी व सर दोराब टाटा हे तिघे हिंदी मेंबर उद्दिष्ट असावेत असें बहुतेक निश्चित आहे. कमिशनच्या कामाला सुरुवात बहुधा जूनच्या आंतच होईल; आणि रिपोर्ट होऊन त्याचा

विचार होईपर्यंत बहुधा हिंदुस्थानाच्या हातांशी औद्योगिक उत्कर्ष साधण्याची आलेली सोन्याची संधी निघून ही जाईल, आणि कमिशनचा खटाटोप वराती मागून घोडे नाचवित नेल्यासारखा व्यर्थ होईल कीं काय अशी भिति वाटते.

## सर्पदंशावर उपाय.

केळीच्या सोपटाचा रस हा सर्पदंशावर उत्तम उपाय आहे असा नवा शोध नुकताच एका युरोपियन गृहस्थानें लावल्याचें व अनुभवानें तो खरा ठरल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पण या बाबतींत आमच्या आयुर्वेदकारांनीं दोन हजार वर्षांपूर्वींच काय लिहून ठेविलें आहे तें पाहण्याची तसदी कोण घेतो? निघण्टु नामक वैद्यकग्रंथांत कदली कंद हे शीतळ, बल्दायक, केशवर्धक व पित्तकफादि रक्त दोषांचा नाश करणारे आहेत असें म्हटलें आहे. सर्पदंशानें रक्तदूषित होत असल्यामुळें त्यावर या कंदाचा उपयोग झालाच पाहिजे व तो तसा होतोही. केळीचा रस २० तोळे एकेका तासाच्या अंतरानें चार वेळां दिला असतां सोमलसारखें भयंकर विषसुद्धां उतरतें हा अनुभव इंग्रज डाक्तरांना जरी नवा असला तरी आयुर्वेदक पढलेल्यांना परिचित आहे. केळीच्या कंदांतून कदलीक्षार नांवाचा क्षार काढतात. हा क्षार पावतोळा घेऊन तो कांद्याच्या रसांत मिसळून त्याचा लेप सर्पदंश झालेल्या जागेवर लावल्यानें सर्पविष ताबडतोब उतरतें. मात्र हा उपाय दंशझाल्यानंतर तातडीनें झाला पाहिजे.

## लहान लहान गोष्टी.

हिंदुस्थानसरकारनें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत स्थानिक सरकारचे अभिप्राय विचारण्यासाठीं जें सरक्युलर काढलें आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षणाचें पाऊल फार मागें आहे खरें; पण याचें कारण सरकार मुलींच्या शाळा काढण्यांत पुरेसा पैसा खर्च करीत नाहीं हें आहे कीं सरकार व लोक यांच्याकडून स्त्रीशिक्षण प्रसारार्थ होणारा यत्न बेतावाताचा आहे? प्रश्न सरळ आहेत, आणि त्यांचीं उत्तरें स्थानिक सरकारांनींच नव्हेत तर समाज नायकांनीं ही सरळपणानें द्यावयास पाहिजेत. तीं अगोदर द्या. मुलींच्या शिक्षणक्रमांतले गुणदोष, स्त्रीपुरुषांच्या मेंदूच्या वजनाचें प्रमाण, किंवा मुलींसाठीं स्वतंत्र युनिव्हर्सिटी पाहिजे कीं काय वगैरे प्रश्न मागाहून सोडविता येतील.

स्त्रीयांसाठीं स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढण्याच्या प्रश्नावरून इंदुरच्या एका बातमीदाराकडून कळलेल्या गमतीच्या गोष्टीची आठवण झाली. कु. कृष्णाबाई ठाकुर एम. ए. या नव्या युनिव्हर्सिटीच्या योजनेला सहानुभूति व द्रव्य मिळविण्यासाठीं इंदुरास गेल्या आहेत. तेथें ऑफिसर्स क्लबमध्यें त्यांचें व्याख्यान झालें, आणि लागलीच यादी फिरविण्यांत आली. तेव्हां एका एल एल. बी. जजांनीं यास हरकत घेऊन विचारलें कीं या विषयावर चर्चा करण्यास संधी न देतां यादी फिरवितां व सह्या मागतां हें कसें? यावर सांगण्यांत आलें कीं अगोदर आमची सहानुभूति आहे असें लिहून सही करून द्या, मागाहून विचार करण्यास हवा तेवढा वेळ आहे. तुमच्या खिशांतले पैसे आतांच कोणी काढून नेत नाहीं! या युनिव्हर्सिटीच्या योजनेला जागोजाग शेकडों सहानुभूतिपर सह्या मिळत आहेत या गोष्टीचें इतःपर कोणाला येवढें आश्चर्य वाटावयास नको.

पृथ्वीच्या पाठीवर निर्दोष अशी जात पारशांची व निर्गुण अशी जात म्हणजे हिंदूंची अशी समजूत कित्येक पारशी सुधारकांची झालेली दिसते. परलोकवासी मि० मलबारी यांना हिंदूंतल्या बालविवाहाच्या चालीबद्दल नेहमीं वाईट वाटे, पण पारशी जातींतल्या कुमारिका अश्रु ढाळीत बसलेल्या पाहून त्यांचें कठोर मन कधीं द्रवलें नाहीं. मि. मलबारी यांच्याच आत्म्याचा संचार नागपूरचे ना. दादाभाई यांच्या अंगांत झालेला दिसतो. त्यांनीं अस्पृश्य मानलेल्या जातीच्या उद्धारार्थ हिंदु जातीनें कांहीं एक केलें नहीं म्हणून परवां वरिष्ठ कायदेकौंसिलांत त्या जातीवर सणसणीत कोरडा ओढला. जणूं काय पारशी जातींत समाजसुधारणेला आतां कोठें जागा उरली नाहीं! आणि ना. दादाभाइ यांना आपला जन्म व ईश्वरदत्त उत्साह निरर्थक जाईल कीं काय अशी भीती पडली आहे!

ना. पं. मदनमोहन मालवीय यांनीं रागारागानें मि. दादाभाई यांच्या आक्षेपास उत्तर देण्याचा यत्न केला, पण खरी मुद्याची गोष्ट अप्रत्यक्ष रीतीनें त्यांना सुद्धां कबूल करावी लागली. अस्पृश्य वर्गासंबंधाची उच्च जातीची उपेक्षा ही कांहीं कल्पित कथा नव्हे, सत्य घटना आहे. तिचें अस्तित्व नाकबूल करून कसें चलणार? पण उच्च वर्गाचे लोक अजून सुद्धां आपल्या मागसलेल्या बंधूंची उपेक्षाच करीत आहेत असें जें ना. दादाभाई यांनीं सांगितलें तें मात्र खरें नाहीं. डिप्रेस्ड क्लासेस मिशन कोणीं काढलें? व कोणाच्या साह्यानें तें चाललें आहे? उच्च वर्गाच्या हिंदूकडूनचना?

कित्येक देशी संस्थानांतून राज्यसुधारणेच्या कामीं इतकी झपाट्यानें प्रगति चालली आहे कीं ती गति पाहूनच तिच्या चिरस्थायित्वाविषयीं किंबहुना सत्यतेविषयीं सुद्धां मन साशंक होतें. सक्तीचें व मोफत शिक्षण करण्याची साथ तर बहुतेक संस्थानांतून पसरली आहे. धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांच्यावर संस्थानिकांच्या भाषणांतून वरचेवर दिलेला जोर पाहून तर आमचे संस्थानिक म्हणजे धर्मराजाचेच अवतार होत असें वाटूं लागतें. कायदेकौंसिल आणि लोकांना अधिकार देण्याचे कामीं संस्थानिकांची तत्परता पाहून जॉर्ज वॉशिंगटनची निःस्वार्थता या संस्थानिकांमध्यें एकाएकीं प्रादुर्भूत झाल्याबद्दल समाधान वाटतें. पण इतक्या सगळ्या चांगल्या चांगल्या गोष्टी एकी मागून एक बिनचूक घडत गेल्यामुळेंच मनुष्याचें मन बावरून जाऊन मी पाहतों तें सत्य कीं स्वप्न असा प्रश्न त्याचें मन करू लागतें; आणि हा प्रश्न खोटा, हा देखावा स्वप्न नाहीं असें कोणता वस्तुस्थितिज्ञ म्हणेल? आपलेच दांत आणि आपलेच ओठ म्हणून उगे रहावयाचें येवढेंच. नाहींतर ब्रिटिश अधिकाऱ्यांचें छिद्रान्वेषण देशी पत्रकर्त्यांकडून होत असतें तसें देशी संस्थानिकांविषयीं होईल तर त्या तीव्र कसोटीला किती संस्थानिक उतरतील? शिक्षण सार्वत्रिक केल्याबद्दल टिमकी वाजवून घेण्याची तेवढी हौस, पण शिक्षणाचें स्वरूप सुधारण्याचे कोणते यशस्वी प्रयत्न निदान कळकळीचे यत्न होत असतात? होळीचे दिवसांत वेश्यांचे मेळे भरवून त्यांना हजारों रुपयांचीं इनामें बाटणारे संस्थानिक नीतिशिक्षणाविषयींचा उपदेश करण्यास खरोखर पात्र म्हणतां येतील काय? थंड हवेंत जाण्यासाठीं ब्रिटिश सरकार पैसा व्यर्थ खर्च तें अशी ओरड करणारांची दृष्टि संस्थानिकांच्या या बाबतींतल्या उधळपट्टीकडे कशी जात नाहीं?

## चहा विरूद्ध अनंत मूळ

अगदीं अलीकडे अलीकडे म्हणजे १८९० पासून पुढील १० वर्षाच्या कालांत मुंबई प्रांतांतून आपल्या प्रांतांत एका आरोग्य विघातक पेयाचा प्रसार फार झपाट्यानें झालेला दृष्टीस पडतो. तें पेय म्हणजे चहा हें होय. या पेयानें तात्काल तकवा अंगांत आल्यासारखा दिसतो हें खरें आहे. परंतु त्याच बरोबर मादक पेयांच्या अंगीं असणारे सर्व अवगूण या पेयांत आहेत. या अवगुणांकडे हें पेय इतकें प्रचारांत येईपर्यंत कोणीच लक्ष दिलेलें नाहीं. कोणतेंही खाद्य अगर पेय समाजांत पक्कें दृढ झाल्याशिवाय त्याचे गुणावगूण लक्षांत येत नाहींत व तें पक्कें दृढ झाल्यावर नाइलाजास्तव त्याचा स्वीकार करावा लागतो. तद्वतच चहानें आपणास इतकें रूढ करून घेतलें आहे कीं भेटावयास आलेल्या मित्रांस पानसुपारी किंवा ओढण्याची बिडी अथवा सिगारेटच्या ऐवजीं चहा सादर करण्यांत येतो.

चहाचा पहिला अवगूण तो मादक आहे. सर्व मादक पदार्थांचा परिणाम यकृतावर घडतो. त्यांच्या योगानें अग्निमांद्य आणि तात्कालिक स्फूर्ति हे अवगूण असतात. यकृत बिघडल्यानें सर्व प्रकारचे प्रमेह आणि विशेषतः बहुमूत्र प्रमेह किंवा शर्करा प्रमेह उत्पन्न होतो. पित्ताधिक्य, बद्धकोष्ठत्व इत्यादि पचनक्रिये संबंधीं रोग प्रथमतः जडून त्यांचा विकास प्रमेहांत होतो असें आढळण्यांत आलेलें आहे. या साठीं या पेयास जितकें लवकर समाजांतून उध्वस्त करून देतां येईल तितकें बरें. ज्यांस कसलीच संवय लागली नसेल त्यांस या पेयाऐवजीं एखादें उपयुक्त पेय सुरू करण्याची जरूरी नाहीं हें खरें, तरी पण आमय आणि निरामय अशा दोन्ही अवस्थांत घेतां येण्यासारखें पेय सापडेल तर तें जरूर लोकांस माहित व्हावें या बुद्धीनें पुढील हकीकत देत आहों:—

**अनंतमूळ** या नांवाची एक वनस्पती चहाची संवय घालवून देते असा अनुभव आल्यामुळें बहुतेक वर्तमानपत्रांतून या पेयाबद्दल जाहिराती येऊं लागल्या आहेत. यामुळें या पेयाबद्दल लोकांस माहिती असणें जरूर आहे.

अनंत मूळ ही मुळी बाकेरीचे भातें आणि सालसा, मंजिष्ठ (गुंजांचें मूळ) शतावरी इत्यादि रक्तशुद्धी करणाऱ्या वनस्पती वर्गांत रक्तशोधन आणि रक्तवर्धन करण्यांत नंबर २ ची वनस्पती आहे. पहिला नंबर सालसा. सालस्यापासून सार्सापरीला काढतात. बाकेरीच्या भात्याचा उपयोग व्रण भरून काढण्यांत उत्तम आहे. सालस्याचे खालोखाल अनंत मूळाचा नंबर लागतो.

अनंत मूळ ही जंगलांत सांपडणारी वनस्पती नसून प्रायः खरीफांच्या शेतांत ज्वारीचें पीक काढण्याचे वेळीं सांपडते. एक सारखा सारखा वेल प्रत्येक बाजूस एकेक पान असणारा, जमिनीवर इतस्ततः विस्तृत झालेला आढळतो, तोच अनंत मूळाचा वेल. आणि त्याचे खालीं ज्या मुळ्या सापडतात त्याच अनंत मूळ. हे वेल दोन प्रकारचे असतात. हे दोन प्रकार त्यांच्या पानांच्या आकारावरून, आणि मुळ्यांच्या रंगावरून झालेले आहेत. ज्या वेलाचीं पानें रुंद असतात, त्याचे खालीं पांढऱ्या रंगाचे मूळ सापडते. व ज्या वेलाचीं पानें बारीक आणि निरुंद असतात, निळवट लाल असते. गुणांत दोन्ही मुळांचे प्रमाण कमी अधीक आहे. लाल निळवट मुळाचा गूण सोळा आणे तर पांढऱ्या मूळाचा गूण पांच पासून सहा आणे म्हणजे लालमूळ पांढऱ्या मुळांपेक्षां तिप्पट गुणकारी असते. उत्तर हिंदुस्थानांत म्हणजे नर्मदेच्या उत्तर भागास उपदंशाची व्याधी अधीक असल्यामुळें तिकडे ही वनस्पती सर्वांस विश्रुत तरी आहे. या वनस्पतीस बाळ सुगंधी' मगुरि कपुरी' खोबरेल हीं नावें त्य प्रांतांत आहेत. जमिनीपासून एक हाताचे खोलिवर मूळ सापडते म्हणून आर्य वैद्यकांत या मुळीस अनंत मूळ असें म्हटलेलें आहे.

**गूण** — या वनस्पतीचा मुख्यगूण रक्त संशोधन करून त्याचें वर्धन करण्याचा आहे. याच्या पिण्यानें कदाचित् अवरोध झाला तर होण्याचा संभव आहे. हा क्वचित् प्रकृतीच्या लोकांत सापडणारा दोष सौम्य रेचकानें दूर होण्यासारखा आहे. हें पेय सुरू केल्या बरोबर डोक्यांतील ऊष्णता संवेय मानानें कमी होत जाते. हुशारी वाटूं लागत. शक्ती वाढत चालली आहे असें वाटते. सर्व त्वग्रोग बरे होऊं लागतात. भूक वाढते आणि सर्व प्रकारचे प्रमेह दूर होतात. पिणारास ७-८ दिवसांतच माझी प्रकृति सुधरूं लागली आहे असें माहीत होतें व असें माहीत झाल्यासच आपणास हें पेय लागू पडलें असें घेणारानें समजावें. चहा पिणारांनीं दिवसांतून जितके वेळां चहा पिण्याची संवय असेल तितके वेळां त्यात्या वेळीं हें पेय घेतल्यास त्यांची चहाची संवय सुटते असा अनुभव आलेला आहे. अपूर्ण

## हिंदुस्थानांतले उद्योगधंदे.

हिंदुस्थानांतल्या उद्योगधंद्यांची सद्यःस्थिति व ती सुधारण्याचे उपाय यांचा विचार करण्यासाठीं सरकारी व बिनसरकारी गृहस्थांची कमिटी नेमण्याविषयींच्या ना. मि. इब्राहीम रहिमतुल्ला यांच्या ठरावाला अपेक्षेबाहेर यश येऊन सरकारानें कमिटीच्या ऐवजीं रॉयल कमिशन नेमिलें म्हणून कि-

कित्येक पत्रांना पोटांत हर्ष मावेनासा झाला आहे. पण हिंदुस्थानचा आजपर्यंतचा औद्योगिक इतिहास व त्यांत सरकारचा आलेला संबंध यांच्याशीं ज्यांचा निकट परिचय आहे त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटण्या इतकें मोठें कारण कांहींच दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकारची आमच्या उद्योगाविषयीं सहानुभूति आहे, पण ती फारच सूक्ष्म आहे, आणि अगदीं गळ्याशीं पाणी लागेपर्यंत हिंदी उद्योग धंद्याला स्वावलंबनतत्त्वाचा उपदेश करण्याची व गांगलगाईच्या गतीनें त्याच्या मदतीला धावण्याची खोड आमच्या सरकारला आहे, हें स्पष्टपणें सांगणें आमच्या जिवावर येतें, पण सत्य सांगितलें पाहिजे ह्मणूनच केवळ या गोष्टीचा उच्चार करावा लागतो. पण सध्याच्या युद्धानें सरकारला आपली खोड टाकून देण्याची बुद्धि झाली असली तर ती आह्मी आनंदाची गोष्ट समजून सरकारनें हातीं घेतलेल्या या सत्कार्याला प्रत्येकानें हातभार लावावा अशी आमच्या देशबांधवांना विनंति करण्याला आमची तयारी आहे. हिंदुस्थानच्या लोकांत सांपत्तिक सुधारणेविषयींची खरी मनापासून जागृति झाली आहे, तशी हिंदुस्थान सरकारांत ही झाली आहे अशी आह्मी उमेद बाळगतों. दोन वर्षांपूर्वीं मात्र अशी समाधानकारक स्थिति नव्हती. त्यावेळीं सर इब्राहिम यांनीं हाच ठराव आणिला असतां तो सरकारनें येऊं दिला नव्हता. गेल्या दोन वर्षांत सरकारच्या वर्तनांत व विचारांत येवढी क्रांति झाली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पण या कमिशनचा रिपोर्ट तयार होऊन सरकारपुढें विचारासाठीं जाईपर्यंत सरकारच्या विचारांत आणखी कांहीं क्रांति न होवो ह्मणजे झालें.

## लॉर्ड हार्डिंज यांचीं भाषणें.

लॉर्ड हार्डिंज हे वाग्वीर नाहींत, कर्मवीर आहेत. त्यांच्या मनांत हिंदुस्थानाविषयीं जी न्यायबुद्धि, जी सहानुभूति व जें प्रेम वसत आहे तें त्यांनीं कधीं फारसें बोलून दाखविण्याचें कारणच पडलें नाहीं. लोकांनीं त्यांच्या कृतीवरूनच तें ओळखिलें, व ह्मणूनच त्यांची स्वदेशी प्रयाण करण्याची वेळ जवळ आली तेव्हां वरिष्ठ कायदेकौंसिलांतल्या बिनसरकारी मेंबरांना, निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकांच्या प्रतिनिधींनीं, श्रीमंत तालुकदार व जमिनदार वर्गांनीं, सुशिक्षित लोकांना-सर्वांनींच आपापल्या परीनें लाट साहेबाविषयींचें आपलें हृद्गत त्यांच्या प्रयाणसमयीं उघडें करून दाखविलें. अशावेळीं स्वदेशीं परत गेल्यावरही आपलें लक्ष हिंदुस्थानच्या हिताकडे राहील वगैरे सारखीं भाषणें करण्याचा उपचार आहे व आजपर्यंत येऊन गेलेल्या व्हाइसरायांपैकीं कोणी अशीं औपचारिक भाषणें केलीं नाहींत? पण लॉर्ड हार्डिंज यांची गोष्टच कांहीं निराळी आहे. त्यांनीं असे औपचारिक उद्गार काढण्यापेक्षां हिंदुस्थानच्या लोकांना हितोपदेश करण्यांतच आपलें खरें प्रेम व खरी कळकळ दाखविली. हिंदुस्थानच्या लोकांना स्वराज्याचे हक्क संपादण्याची जी महत्त्वाकांक्षा आहे तिचा उल्लेख करून ते ह्मणाले कीं अशी महत्त्वाकांक्षा धरणें कांहीं गैर नाहीं पण व्यवहाराकडे दुर्लक्ष करून असल्या मनोराज्यांत गुंग होऊन राहणें चांगलें नाहीं, वस्तुस्थिति नीट पहा व तिला तोंड देण्याची तयारी ठेवा तरच तुमचे मनोरथ लवकर सफळ होतील, हा त्यांचा शेवटचा उपदेश टिळक बिझांट प्रभृति पुढाऱ्यांना व त्यांच्या शिष्यवृंदाला कदाचित् रुचणार नाहीं; पण विचारवंतांना खात्रीनें पटेल अशी लाट साहेबाप्रमाणें आमचीही खात्री आहे. हिंदुस्थानांतलें लोकमत वाढत आहे आणि त्याची वाढ योग्य व शाहाणपणाच्या आणि नेमस्त मार्गानें होत आहे याबद्दल लाट साहेबांनीं संतोष प्रदर्शित केला, व त्या बरोबर पुढच्यासाठीं मार्गदर्शक ह्मणून असा उपदेश केला कीं अशीच आपल्यावरच्या जबाबदारीची जाणीव व योग्य संयमन ठेवून मुद्देसूद रीतीनें खरेखरे प्रकार सरकारपुढें मांडल्यानें त्याचा प्रभाव सरकारावर पडल्यावांचून राहणार नाहीं, आणि केवळ आलंकारिक शब्दावडंबर घालून केलेल्या भाषणापेक्षां हेंच कार्य अधिक चिरस्थायी होईल. आमच्या सार्वजनिक संस्था व वक्ते आणि लेखक यांनीं हा उपदेश हृत्पटलावर बिंबवून घेतल्यास त्यांचेहातून खरें देशकार्य होईल. पण असें करणें ह्मणजे नेमस्त बनून लोकप्रियता घालविणें होय अशी कित्येकांची जी समजूत झालेली आहे ती लाट साहेबांच्या उपदेशानें बरी दूर झाली नाहीं तरी कटु अनुभवानें खास नाहींशी होईल. पण ते शहाणे असतील तर कटु अनुभव येण्याची वाट न पाहतां ते लाट साहेबांचा उपदेश ग्रहण करतील. तालुकदारांना उद्देशून केलेल्या भाषणांत ही लाट साहेबांनीं आपल्या राजनीतीच्या उदार धोरणाची आठवण देऊन विश्वास, आणि राजनिष्ठा यांनीं युक्त असें वर्तन ठेवण्याचा उपदेश केला, व असेंच वर्तन परिणामा श्रेयस्कर होईल अशी आपली खात्री असल्याचें पुनः पुनः सांगितलें संस्थानिकांना लाट साहेबांच्या कारकीर्दींत मिळालेल्या स्वातंत्र्याच्या देणगीच्या मुळाशीं याच दोन गोष्टी होत्या हें आतां सांगावयास नकोच. वरिष्ठ सरकारापासून हें उदार राजनीतीचें धोरण शिकून स्वतःच्या संस्थानांत आपल्या वर्तनांत त्याचें प्रतिबिंब उठल्याचें जेव्हां आमचे संस्थानिक दाखवितील, व प्रजेचा अधिकाधिक विश्वास संपादून त्यांचेवर ही तो अधिकाधिक टाकतील, तेव्हांच लाट साहेबांच्या या उपदेशाला सार्थकता आली असें ह्मणतां येईल. पण तो दिवस अद्यापर्यंत तरी आलेला नाहीं.

## महायुद्धाची प्रगति.

अजून वर्डूनची लढाई चाललीच आहे! तिच्या कालमानावरून इतिहासांत आजपर्यंत झालेल्या सर्व लढायांत वरचा नंबर पटकावण्याची तिची महत्त्वाकांक्षा दिसून येते. या लढाईत जर्मन शत्रू व फ्रेंच दोस्त यांच्या पैकीं चिकाटीबद्दल कोणाची अधिक प्रशंसा करावी तें कळत नाहीं. प्रस्तुत युद्धाचा अखेरचा निकाल जणूकाय याच लढाईवर व्हावयाचा आहे अशी दोघांची ही समजूत झालेली दिसते. मार्थोमटेकडी घेण्याची शत्रूनीं इतकी शिकस्त केली व त्यासाठीं इतके जीव खर्ची घातले तरी अखेर ती त्यांच्या हस्तगत झाली नाहीं ती नाहींच. त्याच प्रमाणें डुऑमॉंट—व्होन्वी तटबंदी जमीनदोस्त करण्याचे त्यांचे प्रयत्न हरले. यासाठीं शत्रूनीं आपल्या बऱ्याचशा तोफा एकत्र केल्या व पुष्कळच दारूगोळा नासला, पण फ्रेंच बहाद्दरांनीं दाद दिली नाहीं. गढ्या व खंदक सर करावयाचे ह्मणजे तोफा लावून काम चालत नाहीं, त्याला पायदळाचेंच बळ लागतें ही गोष्ट जर्मन विसरले असावे हें आश्चर्य आहे. कदाचित् तसें करण्यांत त्यांचा कांहीं कावा असेल, पण तो कोणता तें मात्र अद्याप कळलें नाहीं. कदाचित् असेंही असेल कीं या लढाईत शत्रूच्या पायदळाचीच आतांपर्यंत एकसारखी हानि होत गेली असल्यामुळें त्याचा उपयोग आतां बेताबेतानें केल्याशिवाय शत्रूला गत्यंतरच नसेल. आतांपर्यंत किती पायदळ पल्टणी कामास आल्या त्याचा हिशोब पाहूनच एखाद्याची छाती फाटून जाईल, कामास आलेल्या पलटणीची जागा रिझर्व फौजेनें कोठपर्यंत भरून काढणार? त्याला तरी कांहीं मर्यादा आहे. इकडे फ्रेंच तोफखाना अप्रतिम काम करीत आहे. जर्मन लोकांच्या हाविझर तोफांशीं सामना करण्याला फ्रेंचांच्या जड तोफा पुरेशा समर्थ आहेत. गतवर्षीं या दिवसांत रशियन तोफखाना व जर्मन तोफखाना यांचा सामना होता. पण रशियन तोफखाना कच्चा होता. फ्रेंच तोफखान्याविषयीं तसें ह्मणतां येत नाहीं. या वेळीं इंग्रजांची फ्रेंचांना चांगली मदत होत आहे. ती झाली नसती तर कदाचित् व्हर्डुनची लढाई इतकी लांबली नसती. इंग्रज शत्रूनें हस्तगत केलेलीं ठाणा परत घेतात इतकेंच नाहीं, तर शत्रूला त्रासवून सोडतात. इंग्रज व जर्मन यांच्यामध्यें ह्मणण्यासारखी कोणतीच लढाई अलीकडे झाली नाहीं; असें असतां रोज वर्तमानपत्रांतून येणारी शूरवीरांच्या मृत्यूची यादी पहावी तर बरीच लांब असते. या यादीवरूनच इंग्रजांच्या कार्याचें महत्त्व दिसून येतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. इंग्रज फौजेला लढाईचा खराखरा अनुभव आतां मिळत आहे असें ह्मणतां येईल. या कामीं इंग्रज सेनापति सर डगलस हेग यांचें धोरण प्रशंसनीय आहे. प्रत्यक्ष लढाई न करतां शत्रूची जबरदस्त हानि करून त्याला जेरीस आणण्याची विद्या या इंग्रज सेनापतीला उत्कृष्ट साधलेली दिसते.

## पैसा फंड

**( वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर पुनश्च ॐ )**

'पैसा फंड' ही राष्ट्रीय गंगाजली आहे. तिच्या संबंधानें गेल्या दिवाळीच्या पाडव्याला राजश्री टिळक यांनीं लोकांची भावना विशेष जागृत केली. या थोर विभूतीनें या संस्थेला राष्ट्रीय शिक्षणाची प्राथमिक शाळा अशी संज्ञा दिली आहे. येथूनच एक राष्ट्रीयपणाचे जिव्हाळे निघतात आणि येथेंच सर्व लहानथोर मंडळीस पहिला धडा शिकावयाचा आहे. ही नवी भरारी मोठी असून ही तितक्याच उल्हासाची आमच्या प्रांतांतही दिसत आहे ही आनंदाची गोष्ट होय. आमच्या येथील कांहीं तरुण, उत्साही गृहस्थांनीं लोकसमुहाला या गंगा प्रवाहांत पोहण्यास शिकविण्याचा संकल्प केला असून त्या अन्वयें लोकांची मनोभूमि चांगली तयार करण्यासाठीं सार्वजनिक कार्यकारी रा० रा० दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षत्वाखालीं दोन दिवस सभा व व्याख्यानें यांची पूर्व योजना फार सुंदर केलेली आहे. गेल्या शनिवारीं रा. रा. अच्युत बळवंत कोल्हटकर "संदेश" पत्राचे कर्ते आणि तसेंच रा. रा. कृष्णराव प्रभाकर खाडिलकर या दोन उत्कृष्ट वक्त्यांची पैसा फंडावर लायब्ररीच्या पटांगणांत व्याख्यानें झालीं. राज्यकर्ते हे इंडियाला उपकारांच्या श्रेणींनीं ऋणबद्ध करून टाकीत आहेत; पण या उपकारांचें चीज करून घेण्या इतकें प्रजेजवळ द्रव्यबल नाहीं. तेव्हां हल्लींचा परस्पर संबंध ह्मणजे श्रीमान जवाहिरवाल्या राज्यकर्त्यांचें बहुमोल रत्नांचें दुकान आणि त्यांत कौतुक करीत उभा असलेला निष्कांचन इंडियन गिऱ्हाईक अशा सारखाच होय. तेव्हां राज्यकर्त्यांच्या उच्च पायरीला चढण्याचा पैसाफंड हा सोपान होय. आणि राजकर्त्यांना प्रेमकिरणांनीं या सोपानाच्या पायऱ्या समीप आणीत आहेत. अशा अर्थाचें विस्तृत संभाषण रा. रा. कोल्हटकर यांनीं केलें आणि राजश्री खाडिलकर यांनीं स्वयं सेवकास व इतर श्रोतेजनांस उद्देशून मोठ्या वीरश्रीचा बोध केला. काल सायंकाळीं ही पुनः पैसा फंडावरच व्याख्यानें झालीं आणि या चांगल्या नेत्याच्या उद्योगामुळें पैसाफंडाच्या निधीचे अमर्याद काठ परिप्लुत होतील, पण त्यापेक्षांही विशेष बहारीचें काम ह्मणजे या पैसाफंडाच्या द्वारानें राष्ट्रीय संघट्टणाचें व संहतीचें कार्य घडत आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—दिवसा प्रखर उष्णता भासून रात्रीं उकडतें. प्लेग अगदींच नसून सार्वजनिक आरोग्य समाधान कारक आहे.

खानबहादूर सोराबजी शापुरजी एक्स्ट्रा असि. कमिशनर हुशंगाबाद यांस १ माहिन्याच्या कच्या रजेंत त्या जिल्ह्याचे आफिशिएटिंग डे. कमिशनर नेमले हें ऐकून आमच्या प्रांतांतील मंडळीस विशेष आनंद वाटेल.


## जाहिरात

नागपूर एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सभा एप्रील १९१६ च्या ९ नऊ तारखेस सकाळीं ८ वाजतां क्रॅडॉक टाऊन मधील सोसायटीच्या महिला विद्यालयांत भरणार आहे. तरी सर्व सभासदांनीं येण्याची मेहरबानी करावी. कळावें तारीख १-४-१६

जनार्दन आबाजी सुळे

सेक्रेटरी; नागपूर एज्युकेशन

सोसायटी, नागपूर

## जाहीर नोटीस

मेसर्स पेस्टमजी अँन्ड सन्स यांचेकडून सर्वत्र आकोलेवासी लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं आकोल्याहून आकोट वाशीम वगैरे इतर ठिकाणीं जाण्याकरितां सर्व प्रकारें अप्टूडेट उत्तम सोयीची माकस्वेल मोटार खालील दरानें गाडी मिळूं शकेल.

आकोल्याहून वाशीम एक फेरी रु. ३०

" " येण्याजाण्याचे रु. ५१

आकोल्याहून आकोट एक फेरी २०

" " येण्याजाण्याचे रु ३०

इतर ठिकाणीं जाण्या करितां प्रत्येक मैलास एक वेळेस बारा आणे प्रमाणें सिंगल पडेल. परंतु येण्या जाण्या करितां केल्यास प्रत्येक मैलास आठ आणे प्रमाणें पडेल.

विशेष टीप— परत प्रवास करणें तो ज्या दिवशीं तेथें पोहचला असेल त्याच दिवशीं केला पाहिजे. परंतु मुक्काम करणें असेल तर प्रत्येक दिवशीं रु. १० प्रमाणें ज्यास्त भाडें पडेल.

मेसर्स पेस्टमजी अन्ड सन्स

८४ ० ११८१९ १९८६८६

व त्याच प्रमाणें वरील गावांतील दोन घरें ही जिनगी माझे पूर्ण मालकीची असून माझे ताब्यांत आहे. सदहू जिनगी संबंधाचे एक खरीदीखत माझे पासून बक्षी-राम रोडमल व वहिवाटदार गजाधर रोडमल यानें ता. २९-६-१९१५ रोजीं लिहून घेतलें आहे. सदहु खरेदीखत काहीं विशेष शर्तीवर लिहिले गेले असून त्या शर्ती पुऱ्या न झाल्यामुळें तें रद्द व व्यवहारास निरुप-योगीं झालें आहे. सबब जाहिर करण्यांत येते कीं कोणीही इसमानें सदहु जिनगी संबंधाचा व्यवहार सदहु खरेदी घेणार याचेशीं करूं नये. केल्यास काहीं एक हक्क प्राप्त होणार नाहीं. ही नोटिस दिली सही. मु. अकोला ता. ३१-३-१९१६

सही

यशवंता वा॥ वनसिंग द. खुद

नो. नं. १२३

## जाहिरात

रा. रा. गणपत तुकाराम सुतार राहणार वाडेगांव तालुका बाळापूर

यांसः—

या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं २३-९-१९१३ तारखेला माझ्या आईनें (सुंदरबाईनें) माझी पालनकर्ती या नात्यानें तुह्माला कुल मुखत्यारपत्र दिलें होतें. मी सज्ञान झाल्यानंतरही तुह्मी बेकायदा मुखत्यारीचे काम करीत आला आहां. तुमचें मुखत्यारपत्र रद्द असून तुह्मी केलेल्या व्यवहाराचा आजपर्यंतचा हिशेब, कागदपत्र वगैरे तुह्मी हवाला केले नाहींत. तर या नोटिशीच्या तारखेपासून तुमच्या हातच्या व्यवहाराचा तुह्मी आठ दिवसात हिशेब द्यावा, आणि तुह्माकडे निघत असलेली दुकानची बाकी चुकती करावी. आमच्या दुकानचा व्यवहार करण्याची तुह्माला तोंडी मनाई पूर्वीच केली आहे आणि अस्सल मुखत्यारपत्रही परत घेतलेलें आहे. असाम्या कडून वसूल घेऊन त्याचा जमाखर्च नाहीं अशा रकमा संबंधानें तुह्मावर दिवाणींत व फौजदारींत जबाबदारी राहलि. कळावे ता० २९ मार्च १९१६ इ.

सही

दवलत वा॥ गणु पा. साहु दुकान

बटवाडी बु. ता० बाळापूर

नो. नं. १२४ जि० आकोला

## नोटीस

नोटिस बेशमी गोविंदराम रामनारायण मारवाडी रा. धामण ता. अकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास मारुती हरिसा सोनार रा. धामण यानीं गहाणखत लिहून देऊन नोंदन दिलें होते. त्या तुमच्या गहाणाचे हक्कासह खरेदीखत स्पष्टीकरण केल्यान्वये मी ते शेत खरिदी घेतल्या आधारे तुमच्या रकमेची जबाबदारी मजवर आली. ती तुमची रकम किती निघते याचा हिशेब मागण्याकरितां व सर्व रक्कम चुकती करण्याकरितां तुमच्या दुकानावर आलो असतां तुह्मी मुद्दाम व्याजाच्या आशेनें ती गोष्ट लांबणीवर टाकली आणि मला नक्की रकम कळु देत नाहीं. ही नोटिस पोंचतांच दोन दिवसाच्या रजिष्टर पत्रानें रकमेचा आकडा राजिस्टर खर्चासुद्धां लिहावा. तसे करण्यास चुकाल तर तुह्माला व्याज देवाल नाहीं आणि कोर्ट मार्फत योग्य दाद मिळेपर्यंतची सर्व नुकसानी तुह्मावर बसेल. यासाठीं कळविले आहे. कळावें ता० २९-३-१६ इ.

सही

पुंडलीक खुशाल पा॥ रा० धामण

ता० आकोला द० खु०

नो. नं. १२५


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिवृद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतींनिश्र अद्भुत गुटिका.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी [illegible] मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट प्रमेह, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारावर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयाच्यावर कोणतेही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३६ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—याने वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना प्रमेह व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्रांची लाली, सकाव, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात. तिडीक एका बटकेंत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, यथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

### FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4,823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2,47,18,8 |
| 1914 | 72,46,0 | 4,96,8650 |

### *SPECIAL FEATURES.*

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after providing for the Reserve fund divided among the Policyholders every 3 years.

Native Lives are accepted at the same rates as Europeans

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

***Influential andactive agents wantedTerms liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown, Manager

*A. C. Lal,* Brac. *C. P. Berar & Khandesh* NAGPUR.

N. N. 22


हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

# विद्यामंदिर वाकररोड नागपूर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONONICS.
Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions or passed by the TIMES (London) the EMPIRE (Calcutta) the MODERN REVIEW (Calcutta) the HINDUSTAN REVIEW (Allahabad) Strong condema ion by the PIONEER (Allahabad) Chapters I what is Indian Economics (ii) social conditions and Economics condition (iii) Indian Economics and Ind an Pagcholoky. (iv) Political conditions and Economics condition, (v), Language Policy and Economics, (vi) Economic evolution and layers of cicilization (vii) Communal Economics and distributive Economics, (viii) Future out book.

२ **संकीर्ण लेखः**—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पी. नें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
(२) या विषयावर झालेला वादविवाद
(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
(४) धमानियमन आणि ब्राम्हणांची परंपरागत विद्या
(५) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
(८) मध्यप्रांतीयास संदेश
(९) प्रतिनिधीचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्षत्र कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुल १९१५ च्या अंकांत केसरीकार म्हणतातः—
"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या अत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकडे विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नसून त्यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत् कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकापुढें आले म्हणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें जें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ **उत्तर अमेरिकेंतील वसंत काल** 'एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पौत्र कवीचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे (महाराष्ट्र) किंमत ४ आणे.

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८


## नोटीस

हजायनी अमीरबी मर्द हाजी शेखलाल राहणार आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं अब्दूल नबी वल्लद शेख अहमद वय १०।१२ हा तुमचा पुतण्या असून तुम्हापाशीं तो राहतो. शेख अहमद आणि हाजी शेखलाल यांच्या सर्व स्थावर जंगम जिन्नगीचा हा मुलगाच एकटा वारसदार व हक्कदार आहे. त्याच्या जिन्नगीची नीटनेटकी वहिवाट करणें व मुलाचे पालन करणें हें तुमचें काम आहे. पण तुम्ही कांहीं फंदी लोकांच्या गोष्टी ऐकून या मुलाचें अकल्याण करीत आहा; आणि त्यामुळें मुलाला तुमच्या जवळ राहूं देणें हें देखील काळजीचें व फिकीरीचें काम वाटतें. तुम्ही जिन्नगी विकण्याच्या नादांत दिसता आणि जंगम दागदागीना व रोख नगदी ऐवज चांगला संभाळण्याचें तुमचें वर्तन दिसत नाहीं. ही नोटीस पोचल्या तारखेनंतर आठ दिवसांच्या आंत तुम्ही चार पंचाच्या हवाली सर्व स्थावर जंगम करावी आणि त्यांच्याच सल्यानें व हुकमानें जिन्नगीची वहिवाट करण्याचें कबूल करावें. तुमच्या हल्लींच्या चालीवरून तुम्हावर भरंवसा राहिलेला नाहीं म्हणून ही जाहिर सूचना करीत आहे.

आणि याच लेखानें सर्वत्र लोकांस विदित करीत आहे कीं हजायनी अमीरबी इच्या अज्ञानाच्या जिन्नगी संबंधानें कोणताही व्यवहार करण्याची कायद्यानें मनाई आहे. या उपर तर कोणी कोणत्याही प्रकारची देवघेव करील तर ती बातल असून त्याबद्दल जिन्नगी कोणत्या प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. कळावें ता. १ एप्रिल १९१६ इ.

सही

गावसमहमद वा। सेखतोलू ताजनापेठ आकोला द. खु.

नो. नं. १२०

---

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें
कि. मुकद्दमा नंबर ३६ सन १९१६ इ.
विद्यमान डिस्ट्रिक्ट जज्ज यांचें कोर्ट
मुक्काम आकोला
नांव रामजी
बापाचें नांव दत्तु
जात कुणबी राहणार मारुतीपेठ
तहसील मेहेकर जिल्हा बुलडाणा
अज्ञान रोडू आणि आयाजी वा। तुकाराम
उमर वर्षे ११-८
राहणार हिवर तहासिलीचे (२)
मेहकर अज्ञान याच्या स्वतःसाठीं आणि इस्टेटीसाठीं
पालन कर्ता (१)
नेमण्या विषयींच्या अर्जा संबंधीं

३

सर्वत्र लोकांस

यांस

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयींचें (२) रोडा आणि आयाजी यांच्या स्वतःसाठीं आणि इस्टेटीसाठीं पालनकर्ता नेमण्या (४) विषयीं अर्ज कल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ११ माहे ५ सन १९१६ इ० रोजीं नेमिली आहे. त्या वरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जा संबंधी सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टात हाजर झाले पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २८ माहे ३ सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

V. M. Kelker
डि० जज्ज आकोला.

नो. नं. ११९

---

## नोटीस

रा. रा. तुकाराम तानाजी माळी राहणार शेगांव तालुका खामगांव.

यांसः—

खालीं सही करणार तुकाराम किसन वाडोकार राहणार उंबरी, आकोला अज्ञान पालन करणार आई मंजाई इजकडून तुम्ही इसाऱ्याबद्दल म्हणून ३० तीस रुपये बगाई मर्द मानाजी नांवकार यांच्या मार्फतीनें घेतले आणि उमरखेड तालुका आकोला येथील हक्क नोंदणीचा अनुक्रम नंबर ३८ सर्वे नंबर २५ एकर ७ गुंठे २२ आकार रुपये १४ चें शेत रुपये ६७५ ला खरेदी देण्याचे तुम्ही कबूल केलें, आणि फक्त आपल्या बायकोचा रुकार न मिळाल्यास एक दिवसाचे आंत इसाऱ्याचे रुपये परत करीन आणि तसें एक दिवसाच्या मुदतींत न केल्यास खरिदीचा व्यवहाराला पूर्णता आणण्यासाठीं खरेदीखत वगैरे करून देइन असा तुम्ही करार करून खरेदीचा व्यवहार मजबरोबर केला. ही गोष्ट महाशिवरात्रीच्या अगोदरच्या सोमवारीं घडली. या गोष्टीला तीन हप्ते झाल्यावर पांडु गोमाजी मसणे हा ३० रुपये इसाऱ्याचे परत देण्यासाठीं म्हणून आला. आणि आतां दुसरा कोणी आमच्या रकमेपेक्षां कांहीं अधीक रक्कम देत आहे म्हणून त्या लालचीनें तुम्ही ही लबाडी आरंभली आहे. आमच्या खरिदीचा व्यवहार ही नोटीस पोचल्या तारखेपासून ८ दिवसांच्या आंत तुम्ही पुरा करावा. तसें करण्यास चुकाल तर तुम्हावर दिवाणींत फिर्याद करून योग्य ती दाद सर्व खर्चासह्वां व इतर नुकसानी सुद्धां मिळविण्यांत येईल. कळावें ता० १ एप्रिल १९१६ इ.

सही

तुकाराम किसन वाडोकार अज्ञान पालन करणार आई मंजाई इच्या हातची निशाणी बांगडी

नो. नं. १२१

---

## नोटीस

रा. रा. रामजी गाईकवाड कुणबी रा० मौजे पाळ ता. खामगांव जि. बुलढाणा

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून मजला वयांत येण्यास ५-७ वर्षे झालीं. मी तुमचे घरीं राहून संसार करण्यास तयार असतां तुम्ही मजला नांदवित नाहीं. मी वयांत आल्यानंतर फक्त १५ दिवस तुम्ही मजला तुमचे घरीं ठेविले आणि नंतर मजला काढून दिलें. तेव्हां पासून मी मौजे कळंबेश्वर प्र. खर्डी ता. मेहकर जि बुलठाणे येथें लोकांचे कर्ज काढून उदर निर्वाह करित आहे. यामुळें आतांपर्यंत मजला लोंकांचे कर्ज रुपये २०० दोनशें देणं झाले. असून आतां यापुढें मजला कोणी कर्ज देत नाहीं. तेव्हां या नोटिशीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं ही नोटिस तुम्हास मिळाल्यापासून आठ दिवसाचे आंत तुम्ही माझे येथें येऊन लोकांचें कर्ज आदाकरून मजला तुमचे येथें घेऊन जावे. मी तुमचे बरोबर खुषीनें येऊन संसार करण्यास तयार आहे. तसें न केल्यास मुदत संपतांच हीच नोटिस तुमची मजला फारकत आहे असें मी समजून पुढें मी दुसरा घरठाव करून सर्व कर्ज आदा करील. मग मजवर व मी ज्याच्याशीं घरठाव करील त्याजवर तुमचा नवरेपणाचा कोणतेच तऱ्हेनें हक्क चालणार नाहीं. क. ता. २८-२-१९१६ इ.

सही

नि॥ शेवंती मर्द रामजी इचा आंगठा

नो. नं. १२२

---

## जाहिर नोटिस

यशवंत वा। धनसिंग जात कुणबी राहणार वडद पोष्ट दाहिहांडा ता. आकोला जि. अकोला याचे कडून सर्वत्र लोक व त्याच प्रमाणें बक्षीराम [illegible]मल दुकान आकोला याचे मालक यांस नोटिस देण्यांत येते कीं मौजे वडद ता. आकोला येथीलः—

| स. नं. | पोटहिस्सा | एकर गुंठे | आकार |
|---|---|---|---|
| ३६ | १ | ५८३५ | १४८६८३ |

Regd-No.-N 150

# व्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला--सोमवार तारीख १० माहे एप्रिल सन १९१६ ई० [ अंक १४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clemente, एजंट

नं १

---

## अस्सल अंगुरी.

# हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ·।ः तो. खालिस कस्तूरी रु. २९ तो. क्षिवेती ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९
नो० नं० २

---

### हिंदुस्थानावर आरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचे स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

---

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

# चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच.
स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व. ८९ ] **पूर्णानंद** [ सुरू झालें. ट. ख. ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें **अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद** मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरू झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त ·।– (व्ही. पी. पोस्टेजसह ॥=) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद-कार्यालय,
खडेबाजार-बेळगांव.

नो. नं. १३२

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

व्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-जोड, गुलबाचीफुलें, बिंदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखीं व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, तारें, वाळ्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें ग्यारानलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय—कोल्हापूर
नो नं ६

---

# कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ९ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशीं ही विद्या फार प्रबळ असून तिकडील नटेली, लंगोटि, छा छु करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुबाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम ग्रहादिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

# कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपूर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONONICS.
Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions or passed by the TIMES ( London ) the EMPIRE ( Calcutta ) the MODERN REVIEW ( Calcutta ) the, HINDUSTAN REVIEW ( Allahabad ) Strong condema ion by the PIONEER ( Allahabad ) Chapters I what is Indian Economics ( ii ) social conditions and Economics condition ( iii ) Indian Economics and Ind an Psgcholoky. ( iv ) Political conditions and Economics condition, ( v ), Language Policy and Economics, ( vi ) Economic evolution and layers of cicilization ( vii ) Communal Economics and distributive Economics, ( viii ) Fu ure out book.

२ संकीर्ण लेखः—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पी. नें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
(२) या विषयावर झालेला वादविवाद
(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
(४) धर्मनियमन आणि ब्राह्मणांची परंपरागत विद्या
(५) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
(८) मध्यप्रांतीयास संदेश
(९) प्रतिनिधीचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुलै/१९१५ च्या अंकांत केसरीकार ह्मणतातः-

"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या अत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकड विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नसून त्यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकापुढें आले ह्मणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें जें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ उत्तर अमेरिकेंतील वसंत काल 'एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पौत्र कवींचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे (महाराष्ट्र) किंमत ४ आणे

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

## जाहीर नोटीस

मेसर्स पेस्टमजी अँन्ड सन्स यांचेकडून सर्वत्र आकोल्यावासी लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं आकोल्याहून आकोट वाशीम वगैरे इतर ठिकाणीं जाण्याकरितां सर्व प्रकारें अप्टूडेट उत्तम सोयीची माकस्वेल मोटार गाडी खालील दरानें मिळूं शकेल.

आकोल्याहून वाशीम एक फेरी रु. ३०
" " येण्याजाण्याचे रु. ५१
आकोल्याहून आकोट एक फेरी २०
" " येण्याजाण्याचे रु ३०

इतर ठिकाणीं जाण्या करितां प्रत्येक मैलास एक वेळेस बारा आणे प्रमाणें सिंगल पडेल. परंतु येण्या जाण्या करितां केल्यास प्रत्येक मैलास आठ आणे प्रमाणें पडेल.

विशेष टीप— परत प्रवास करणें तो ज्या दिवशीं तेथें पोहचला असेल त्याच दिवशीं केला पाहिजे. परंतु मुक्काम करणें असेल तर प्रत्येक दिवशीं रु. १० प्रमाणें ज्यास्त भाडें पडेल.

नो. नं. १२७ मेसर्स पेस्टमजी अन्ड सन्स

## जाहिर नोटीस

जनी मर्द चंद्रभान कुणबी रा. चवरतळ ता. व पोष्ट अकोट

ईस

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझी मातोश्री बायजाबाई मर्द विठोबा ही तुझे घरीं मरण पावली. माझा बाप मेल्यावर दोन तीन वर्षांनीं माझे जवळून माझे बापाचे दागिनें भांडी ह्मैस गेल्यावर तुझे घरीं तिनें तिचे स्वतःचे पैशानें घेतली. असा एकंदर अजमास पाचशें रुपयाचा ऐवज ती तुझे ताब्यांत सोडून मरण पावली. आतां त्या सर्व इस्टेटीचा मालक कायद्यानें व वारस मी दत्तकपुत्र असल्यामुळें तिचे क्रियाकर्म झाल्यावर मी तुजजवळ मागितले असतां तूं ती जिनगी देत नाहीं. या साठीं मजला ही नोटिस देणें भाग झाले. तर तुझे ताब्यांत माझे आईची अजमासे पाचशें रुपयाची जिनगी आहे. ती तूं ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे स्वाधीन करावी. व माझी पावती घ्यावी, या प्रमाणें न केल्यास मी दिवाणींत फिर्याद करून कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च या सुद्धां भरून घेईन. ही नोटिस दिली सही. मुक्काम आकोला ता ४-४-१६

सही
नामदेव विठोबा ढाकर रा. एदलापूर
ता. अकोट पोष्ट आडगांव

नो. नं १२८

## नोटीस

रा. रा. नारायण मल्हारी कंडाळे रा० बाळापूर -

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी मला फार जाच करूं लागला. आणि शेवटीं मारठोक करून घरा बाहेर हाकलून दिलें. व या वेळीं फार अप्रयोजक संबोधन तुह्मी मला लाविलें. त्या बोलण्या अन्वयें विवाहित स्त्रीपुरुषाचा संबंध तुह्मा आह्मामध्यें उरलेला नाहीं या गोष्टीला तीन महिने झाले. मी वाडेगांवीं आपल्या भावाच्या घरीं रहात होते. गेल्या शुक्रवारीं ह्मणजे ता. २४-३-१९१६ रोजीं वाडेगांवीं जातीचे चार पंच जमले आणि तुह्मी तेथें असतांना तुमच्या सल्यानें व रजामंदीनें तुह्मी ६० रुपये घेण्याचें कबूल केलें. व ३ महिन्या पूर्वी तोंडी दिलेली फारकत कागदी नमूद करून देण्याचे कबूल केलें. कागद लिहिणार इतक्यांत गणपत मेहतर यानें फरेब दिला. व तुह्मी पहिली कबूली बदलून लबाडीनें सर्व गोष्ट पालटली. ६० रुपये घेऊन तुह्मी लेखी फारकत ही नोटीस पोचल्या नंतर १५ दिवसाच्या आंत द्यावी. तसें करण्यास चुकाल तर दिवाणीमध्यें फिर्याद करून योग्य ती दाद इतर खर्च नुकसानी सुद्धां मिळविली जाईल. कळावे ता. २५-३-१६

सही
मुक्ती मर्द नारायण कंडाळे रा०
वाडेगांव नि॥ आंगठा खुद्द

नो. नं. १२९

## नोटीस

रा. रा. रंगनाथ सिताराम ब्राह्मण जाई रा. मेरेबु॥ ता. चिखली

यांसः—

खालीं सही करणार नोटिस देते कीं, तुमचे बरोबर माझे लग्न होऊन अजमास १८।२० वर्षें झालीं. तुमच्या पासून मला दोन मुली झाल्या. आतां ९।८ वर्षें झाली. तुह्मी गंधर्वांची धोंडी नामें बायको केली, तेव्हा पासून तुह्मी मला घरांतून काढून दिलें. ८ वर्षांत माझेकडे तुह्मी आले नाहीं. मी माझ्या भावाचे गांवांत डोंगरखंडाळ येथें राहून कर्ज काढून उदर निर्वाह करते. ८ वर्षां पासून ज्या अर्थी तुह्मी नेले नाहीं व भेटले नाहीं त्याअर्थी तुमचा नवरेपणाचा हक्क कायद्याप्रमाणें मजवर राहिला नाहीं. तरी नोटिस देते कीं, माझे वरचे ५०० रुपये कर्ज नोटिस मिळाल्या पासून १५ दिवसाचे आंत देऊन मजला घेऊन जावे. अगर नोटिशीचे उत्तर द्यावे. असें करण्यास चुकल्यास हिच फारकत समजून दुसरा नवरा करीन व सावकाराचे पैसे देईन मग उजर ऐकणार नाहीं. ता. २६-३-१९१६ इ. द. भिकमसिंग बहादरसिंग रा. बुल्ढाणा

सही
गंगाबाई मर्द रंगनाथ इचीं नि॥ खु.
बांगडी द. सखाराम

ना. नं. १३०

## नोटीस

नोटिस राघु मर्द भिवसन जात कुणबी आडनांव मांग रा. धानोर भुसे प्र. धामणी ता. मंगरूळपीर जि. आकोला

यांसः—

नोटिस देणार नारायण वा॥ संभाजी कुणबी मांग रा. मौजे जनुनबु॥ प्र. व ता. मंगरूळपीर जि. अकोला यांजकडून तुह्मास नोटिस देण्यांत येते कीं, खालीं लिहिलेली शेतें माझे कबज्यांत आहेत तीं येणें प्रमाणें:—

| गांवचें नांव | स. नं. | पो. नं. | ए. | आ. | रु. |
|---|---|---|---|---|---|
| मौजे जनुनबु॥ | २९ | ० | | १३५९ | ९८८ |
| ,, शहापूरबु॥ | २० | २ | | ७८९ | २८१२ |

ही दोन्ही शेते माझे कबज्यांत असून पिक हीं मीच घेत आहे. ही शेतें वडिलार्जित असून माझा सख्खा धाकटा भाऊ नामें भिवसन संभाजी याचे नांवें वरील शेताचे खाते असून तो मरण पावल्यामुळें वारस ह्या नात्यानें शेतें तुझे नांवानें दाखल आहेत. तूं माझी सख्खी धाकटी भावजय आहेस. माझे भावाचे पोटची संतती मुलगा अथवा मुलगी नाहीं. तुझे वय तरुण असून पुढें तूं आपले नवऱ्याचें नांवावर राहशील अशी मला खात्री नाहीं. यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून तूं वरील शेतें कोणास गहाण, अथवा खरेदी देऊं नये. कारण ही मिळकत वडिलार्जित असून तुला विकतां येत नाहीं. तूं फक्त अन्नवस्त्राची अधिकारीण आहेस. यास्तव ही शेतें कोणास गहाण, खरेदी, देऊं नयेत. दिल्यास त्याजबद्दल रकमे संबंधानीं मी कोणते प्रकारें जबाबदार राहणार नाहीं. कळावें ता. २९-३-१६

सही
नि॥ नारायण वा॥ संभाजी मांग याची
खुद्द असे

नो. नं. १३१

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible

Endeavours will be made as far as possible in all trnsactions to meet the equirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शु॥ ८ शके १८३८

## सरकार आणि उद्योगधंदे.

हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठीं सरकार विशेष कांहीं खटपट करीत नाहीं असा आक्षेप अलीकडे परिषदांतून व वर्तमानपत्रांतून करण्यांत येत असतो. या आक्षेपावर सरकारी अधिकाऱ्यांचें काय उत्तर आहे तें कळणें अवश्य आहे. अशा आक्षेपाला उत्तर देण्याचे भानगडींत सहसा ते पडत नाहींत. तेव्हां ना. मि. रहिमतुल्ला यांनीं उद्योग धंद्यांसंबंधानें वरिष्ठ कौंसिलांत आणिलेल्या ठरावावर भाषण करतांना ना. मि. ले यांनीं तें उत्तर देण्याचा प्रयत्न केला हा कापिलाषष्ठीचाच योग झटला पाहिजे. वक्त्यांनीं व लेखकांनीं या विषयासंबंधानें बोलतांना व लिहितांना सरकाराविषयीं निष्कारण अनुदारतेचे किंवा अन्यायाचे उद्गार कदापि काढूं नयेत. पण सरकारी अधिकाऱ्यांनीं मौन स्वीकारल्यामुळें त्यांना खरी स्थिति कळत नाहीं व त्यामुळें वरवर ज्या गोष्टी दिसतात त्यांवरूनच त्याना टीका करावी लागते. ना. मि. ले यांनीं आपल्या भाषणांत ज्या गोष्टी उघडकीस आणिल्या आहेत त्यांमुळें त्या टीकेची तीव्रता कमी होईल असें जरी आह्मांस वाटत नाहीं तरी प्रतिपक्षाचें ह्मणणें साग्र ऐकून घेतल्याशिवाय केवळ एकतर्फी टीका करणें आह्मांस प्रशस्त दिसत नाहीं. ह्मणून सरकारी अधिकाऱ्यांचें समर्थन ऐकून घेण्यास आह्मी फार उत्सुक आहों. ना. मि. ले ह्मणाले कीं लोकांच्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देऊन देशाच्या सांपत्तिक उन्नतीस हातभार लावणें हें सरकारचें एक अवश्य कर्तव्य आहे, व या कर्तव्याचरणांत जरी प्रचंड अडचणी आहेत तरी त्यांतून मार्ग काढून सरकारनें आपलें कर्तव्य यथाशक्ति बजावलें आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत १८९१ सालापासून कापसाचें सूत व कापड करण्याचा उद्योग सुरू झाला. प्रथम हा उद्योग युरोपियन लोकांचे हातीं होता, पण त्याचा फायदेशीरपणा पाहून देशी भांडवलवाले ही त्यांत शिरले, व गेल्या २० वर्षांत हा धंदा तिपटीनें वाढला. याला पुष्कळसे कारण खाजगी लोकांचें भांडवल, परिश्रम, वगैरे होते यांत शंका नाहीं. पण सरकारनें ही मदत केली नाहीं काय? सरकारानें देशांत शांतता स्थापित केली, रेल्वे व तारा वगैरे दळणवळणाचीं साधनें वाढविलीं, या धंद्याच्या उपयोगी असे इंजिनियर तयार करण्यासाठीं टेक्निकल इंन्स्टिट्यूट सारख्या संस्था काढल्या, हें थोडें झालें काय? इतर उद्योगांत ही सरकारनें मदत केली आहे. मद्रासस्कूल ऑफ आर्टनें अल्युमिनम धातूचीं भांडीं तयार करण्यास शिकविलें. यामुळें अल्युमिनमचा एक नवा उद्योग हिंदुस्थान हातीं लागला. तसाच कातडीं क्रोमरंगाच्या पद्धतीनें रंगविण्यास याच शिक्षणसंस्थेनें शिकविलें. अल्युमिनम इतका जरी हा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं, तरी या प्रीत्यर्थ सरकारनें अर्धा लक्ष रुपयांचें नुकसान सोसलें आहे. संयुक्त प्रांतांतल्या सरकारानें साखर तयार करण्याची विद्या जाणणारा एक मनुष्य आणवून त्याच्याकडून एका बुडत्या साखरेच्या खाजगी कारखान्याचें पुनरुज्जीवन केलें व असे कारखाने काढणारांस आतांपर्यंत ७ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. कानपूर येथें तेलाचा एक कारखाना नुकसान सोसून चालविला. तो पुढें १९१२ सालीं स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या हुकुमावरून बंद करण्यांत आला, तरी कपाशीच्या सरकीचें तेल कसें काढावें येवढें त्यानें खाजगी कारखानेवाल्यांस शिकविलें व हे कारखानदार त्या विद्येवर आतां चांगला पैसा कमावीत आहेत. साखरेचा कारखाना काढण्याला एक मुख्य अडचण कारखान्याला पुरेसा उंसांचा पुरवठा होण्याची असते. इकडे सरकारचें लक्ष जाऊन त्या प्रीत्यर्थ यांचे शोध व परिश्रम सुरू आहेत. कागद तयार करण्याला कोणते बांबू किंवा गवत उपयोगी पडतील याचा तपास जंगलखात्याकडून होत आहे, व कांहीं शोध लागला ही आहे. पण आतांपर्यंत लागलेल्या शोधाचा फायदा घेण्यास तयार असे भांडवलवाले तरी कोठें पुढें आलें आहेत? शेवटीं प्रयोगाखातर आपणच एक लहानसा कागदाचा कारखाना काढावा असा संयुक्त प्रांताच्या सरकारचा विचार चालला आहे. या शिवाय छोटे छोटे घरगुती धंदे वाढविण्याकडे प्रत्येक प्रांताच्या सरकारचें लक्ष आहे. धीणकाम, रंगकाम, पितळ तयार करणें वगैरे कामाचे लहान लहान कारखाने काढण्यासाठीं भांडवल नसेल त्यांना प्रांतिक खजिन्यांतून व सहकारी पतपेढ्याकडून भांडवल देवविण्याची तजवीज चालली आहे. व्यापारी व औद्योगिक प्रदर्शनें भरविण्यांत येत असतात. कित्येक ठिकाणीं कायमचीं पदार्थसंग्रहालयें उघडलीं आहेत. कानपुरास सुधारलेल्या तऱ्हेचीं यंत्रें आणण्यासाठीं एका कारखान्याला ३९ हजार रुपयांची रकम कर्जाऊ दिली आहे. नैनी येथील काचेच्या कारखान्याला व कांचेच्या बांगड्या करण्याच्या कारखान्याला असेंच कर्ज दिलें आहे. विलायतेहून व बेल्ज्यम मधून कांचकाम करणारे हुशार लोक आणविण्याची तजवीज होत आहे. अशुद्ध धातूपासून बायक्रोमेट ऑफ पोट्याश काढण्याचा कारखाना सरकारच्या मदतीनें नुकताच निघाला आहे. ओव्यापासून थायमॉल काढण्याबद्दलचा तपास होऊन देहरादून येथील एका कंपनीनें सवलतीच्या किंमतीस जमीन मागितली आहे. त्या अर्जाचा विचार चालला आहे. मुंबईत औद्योगिक कमिटी लोकांना सल्ला देण्यासाठीं स्थापन झाली आहे. इ. इ.

ना. मि. ले यांच्या या भाषणावरून औद्योगिक बाबतीकडे सरकारचें लक्ष नाहीं असें ह्मणण्याचें धाडस कोणी करणार नाहीं. येवढी मात्र गोष्ट खरी कीं मुत्सद्यांच्या अंगीं मुरलेला थिमेपणा हा गुण हिंदुस्थानच्या राजकर्त्यांच्या अंगीं औद्योगिक बाबतींत विशेष दिसतो. त्रिदोष झालेल्या रोग्याला औषध देण्यासाठीं बोलावलेल्या वैद्यानें ‘ अशी घाई कां करतां ? धीरानें घ्या ’ असें ह्मणण्यासारखेंच ना. मि. ले यांचें हें समर्थन आहे.

---

## युद्धाचा खर्च.

विलायतेंतले मुख्य प्रधान मि. आस्किथ यांनीं युद्धाच्या खर्चासाठीं नवव्यांदा परवा मागणी केली. ही मागणी आजपर्यंतच्या सर्व मागण्यांपेक्षां मोठी ह्मणजे ४२ कोट पौंडांची आहे! या मागणीसुद्धां आजपर्यंत पार्लमेंटनें मंजूर केलेल्या रकमांची बेरीज केली तर ती वाचकांचे डोळे फिरविण्याइतकी मोठी होईल. दोन अब्ज आठ कोटी पौंड ह्मणजे केवढी मोठी रकम होते याची कल्पना हिंदुस्थानासारख्या दरिद्री देशाच्या माणसाला प्रत्यक्ष रीतीनें करतां येणें शक्यच नाहीं. त्यानें येवढाल्या रकमाशीं खेळावयाचें असलें तर तें फक्त अंकगणितांतल्या उदाहरणें सोडवितांना खेळावें.

---

## बजेटासंबंधानें स्फुट विचार.

संपला एकदाचा बजेटावरला वादाविवाद. कांग्रेससंबंधानें लिहितांना आंग्लो इंडियनपत्रें ह्मणत असतात कीं तापलेल्या बॉयलरमधून फाजील वाफ हवेंत निघून गेली यामुळें राज्यकारभाररूपी गाडा आतां सुरळीतपणें चालेल. बजेटवरील नामधारी वादविवादाचा तितका सुद्धां उपयोग खरोखर होत नाहीं. बजेट करण्याचा अधिकार सरकारचा, आणि तो ही पांच हजार मैलांवरून कारभार पाहणाऱ्या स्टेटसेक्रेटरी सासूबाईच्या सक्त हुकुमाप्रमाणें करण्याचा आहे. त्यांत हिंदुस्थानसरकारला स्वतःला सुद्धां कांहीं कांहीं बाबतींत स्वतःच्या इच्छे प्रमाणें वागतां येत नाहीं; (आणि हें स्वदेशी कापडावरील जकात उठविण्याच्या प्रश्नावरील सरकारी अधिकाऱ्यांच्या भाषणांवरून अगदीं स्पष्ट झालें आहे) मग अशा बजेटावरच्या वादविवादाचा पोकळपणा निराळा कशाला सांगावयास हवा?

---

युद्धामुळें यंदाचें बजेट काटकसरीचें बजेट झालें आहे असें ह्मणण्यांत येत असतें; आणि खरोखरच गैरवाजवी होणारा खर्च सरकारानें काढून टाकला असता तर अशा बजेटाला कोणी नांवें ठेविलीं नसतीं. गैरवाजवी खर्चाची काटकसर कोणाला नको आहे? पण खरोखर काटकसर योग्य रीतीची झाली आहे काय? शिक्षणासारखीं कित्येक अशीं जरूरीचीं खातीं असतात कीं त्यांत काटकसर करणें केव्हां ही इष्ट नसतें. पण आमच्या यंदाच्या बजेटांत बंगाल, संयुक्तप्रांत, पंजाब, ब्रह्मदेश, बहार, मध्यप्रांत, व आसाम इतक्या प्रांतांत काटकसरीची कात्री या जरूरीच्या बाबीवरच लागलेली आहे. नऊ प्रांतांपैकीं फक्त दोन प्रांत (मुंबई व मद्रास)या कात्रीच्या तडाख्यांतून सुटले आहेत. आणि इतके दांत कोरून सरकारनें किती रकम वांचविली तर सारे २० लक्ष!

---

यंदाचें बजेट करणारांनीं येवढीच चूक केली आहे असें नाहीं. तर ज्या खात्याचा खर्च अगोदरच मोठा ह्मणून ओरड आहे त्याचा खर्च वाढविला आहे! याचें नांव काटकसर! उदाहरणार्थ पोलीसखातें! याच्या खर्चांत मुंबई व बिहार हे दोन प्रांत खेरीज करून बाकी सर्व प्रांतांतीं आपला हात सढळ ठेविला आहे. शिक्षणाच्या बाबतींत दांत कोरून २० लक्ष वांचविले तर या पोलीसखात्याच्यापायीं २३२७००० रुपयांचा खर्च उलट वाढवून ठेविला! हा वाढता खर्च तरी हलक्या पगाराच्या कान्स्टेबलांचे पगार वाढविण्याकरितां असता तर लोकांना कुरकुर करण्याला विशेषशी जागा नसती; पण तसा ही प्रकार दिसत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

---

खरी खरी काटकसर करण्यासारखी बाब ह्मणजे उन्हाळ्यांत थंड हवेंत जाणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसाठीं कराव्या लागणाऱ्या खर्चाची होती. पण तिच्यावर कात्रीचा प्रयोग झाला नाहीं. कां? टाइम्स ऑफ इंडिया पत्र ह्मणतें कीं सिमल्यासारखीं थंड हवेचीं ठिकाणें आहेत तोंपर्यंत चार महिने तेथें घालविण्याची एकदा जडलेली संवय जाणें कठीण आहे! वाहवारे समर्थन! दारुड्यानें आपल्या घरांतल्या बायकामुलांची उपासमार करून कलालाच्या पिशवीची भर करण्याच्या आपल्या संवयीचें समर्थन करण्यास टाइम्स कडून खरोखर शिकावें. विलायतेंत सगळ्या चैनीच्या पदार्थांना बहिष्कार घालण्यांत यावा ह्मणून लोकांना उपदेश करण्यांत येत असतो; आणि हिंदुस्थानांत खर्च फार होतो या सबबीवर गरीब लोकांचें मीठ तोडणारे सरकारी अधिकारी स्वतःच्या चैनींत मात्र काटकसर करण्यास तयार नाहींत.

---

यंदाच्या बजेटांत लष्करी खर्चाची रकम वाढती ठेविली आहे, आणि परिस्थितीकडे लक्ष देऊन या वाढत्या खर्चाविरुद्ध एकाही देशी पत्रानें ओरड केली नाहीं. इतका शहाणपणा आणि दूरदृष्टि देशी पत्रकर्ते ठेवतात तरी अखेर तीं वाईटच गणिलीं जातात. पण देशी पत्रकर्ते स्वस्थ बसले तरी विलायतेंतले स्वतंत्र विचाराचे लोक स्वस्थ बसणार नाहींत. मि. गार्डिनर नांवाचे एक लेखक सरकारला विचारतात कीं या युद्धांत हिंदी शिपायांनीं राजनिष्ठेसाठीं स्वतःचे प्राणसुद्धां खर्ची घातले, आणि अशा शिपायांच्या गरीब मातृभूमीवर लढाईच्या खर्चासाठीं नव्या कराचें ओझें घालणें इंग्लंडला शोभतें काय? हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा बहुतेक भाग भारी पगाराच्या सिव्हिल आणि मिलिटरी आफिसरांच्या खिशांत पडतो आणि त्यामुळें हिंदी लोकांच्या शिक्षणाची उपासमार होते, ही गोष्ट खरी आहे काय? मि पेनिंग्टनसारखे हिंदुस्थानांत अनेक वर्षें अनुभव घेतलेले लेखक वरील प्रश्नाचें समर्थन करतांना ह्मणतात कीं हिंदुस्थानचा समग्र सिव्हिल खर्च वर्षाचे कांहीं सुमारें ३७॥ कोट रुपये आहे आणि एक लष्करी खर्च ३० कोट आहे! [illegible] दोन्ही खर्चांचे पायीं हिंदुस्थान [illegible] रिकामी झाली तर आश्चर्य क[illegible]

---

## औषधांचा दुष्काळ!

इंडियन मेडिकल रेकॉर्ड नांवाचें वैद्यकपत्र ह्मणतें कीं सध्यां युद्धामुळें सगळ्या उत्तम उत्तम औषधांचा दुष्काळ पडला आहे. कांहीं औषधें जपानांतून येतात, पण तींही अतिशय महाग विकून जपान आपले खिसे भरीत आहे. अशी स्थिति आपण मुकाट्यानें पाहत बसावी काय? ही अडचण आपोआप दूर होईल असें कोणाला वाटत असेल तें असो. पण हा निवळ भ्रम आहे—किंबहुना कांहीं एक न करतां माशा मारीत बसणारांची ही एक आवडती सबब आहे. हिंदुस्थानांत औषधें तयार करण्याचे कारखाने कां काढूं नयेत? अमेरिकन लोकांकडे पहा. लोकांत उद्योगधंद्यांच्या ज्ञानाचा प्रसार व्हावा ह्मणून त्यांचे कसे अहोरात्र प्रयत्न चालले आहेत. अर्थात त्यांच्या देशांत जिकडे तिकडे कारखानेच कारखाने दिसावेत आणि अमेरिकन बाजार अमेरिकन मालानें भरलेला दिसावा यांत काय आश्चर्य आहे? हल्लींसारख्या अतिशय अडचणीच्या काळांत ही आमचे डोळे उघडणार नाहींत तर ते केव्हां उघडणार?

---

## २५ आगस्टचा खलीता.

वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या शेवटच्या बैठकींत लॉर्ड हार्डिंज साहेब ह्मणाले, 'ता. २५ आगष्ट १९११ च्या खलित्याच्या तिसऱ्या कलमांत जी राजनीति ठरविण्यांत आली आहे तिच्यांत केसाइतका फरक करण्याचें कारण गेल्या साडेचार वर्षांत घडलेल्या गोष्टीवरून मला दिसत नाहीं. या कलमाच्या अर्थाविषयीं पुष्कळ वाद उत्पन्न झाले आहेत. पण तें कलम इतक्या साध्या इंग्रजी भाषेंत लिहिलें आहे कीं त्या संबंधानें कांहीं खुलासा करण्याची अवश्यकता मला दिसत नाहीं.' सार्‍या हिंदुस्थानच्या वतीनें लाट साहेबांस दिलेल्या मानपत्रास उत्तर देतांना ही ते ह्मणाले कीं 'मी त्यांत सांगितलेल्या गोष्टीला अजून चिकटून आहें, आणि हिंदुस्थानच्या उन्नतीचा तोच मार्ग आहे असें माझें मत आहे.' या उद्गारावरून स्वराज्याचा मार्ग हिंदुस्थानच्या लोकांना खुला करून देण्याचें श्रेय लाट साहेबांनाच दिलें पाहिजे व त्याबद्दल त्यांचेच आभार मानिले पाहिजेत हें उघड आहे. प्रांतिक स्वराज्य ह्मणजे एक प्रकारचे अधिकारी जाऊन दुसऱ्या प्रकारचे अधिकारी त्यांच्या जागीं येणें हें नव्हे, त्याचप्रमाणें प्रांतिक सरकारची हिंदुस्थान सरकारच्या ताब्यांतून मुक्तता हा ही त्याचा खरा अर्थ नव्हे. त्याचा खरा अर्थ असा आहे कीं वरिष्ठ हिंदुस्थानसरकारची देखरेख असावी. प्रांतिक सरकारानें राज्यकारभार चालवावा, मात्र तो लोकांच्या मतानें चालवावा. अर्थात् या कलमाचें महत्त्व हिंदुस्थानच्या लोकांना अतिशय वाटत आहे याचें नवल नाहीं. लॉर्ड हार्डिंज ...हेबांनीं या कलमांत आखून दिलेलें धोरण ...च पूर्णपणें अमलांत येईल असें नाहीं ... यावें असाही त्यांचा हेतु नसेल, पण ... ह्मणून त्यांनीं मांडिलें आहे खास. ही गोष्ट जर खरी आहे तर हें ध्येय केव्हां पूर्णपणें अमलांत येणार आहे तें नक्की सांगण्याविषयीं सर सत्येंद्र प्रसन्न सिंह यांनीं आपल्या कांग्रेसच्या भाषणांत जो प्रश्न केला आहे तो अगदीं योग्य आहे असें ह्मणणें भाग आहे. ध्येय एकदां निश्चित झालें व काळही ठरला ह्मणजे त्या मानानें गतीचें मान ठरवितां येतें. मग त्या मार्गांत कोणी अडचणी घालूं लागला तर त्याचा राग येतो, त्या मुक्कामाला पोंचण्याचे कामीं सरकारनें जरी जोरदार ब्रेक वापरले, तरी लोकांच्या उत्साहाची वाफ त्या ब्रेकला जुमानणार नाहीं.

---

## कारखान्यांतल्या मुलांचें शिक्षण.

परलोकवासी ना. गोखले हे खरे भविष्यवादी होते. त्यांच्या सार्वत्रिक शिक्षणाचा स्वीकार हिंदुस्थानसरकारनें जरी केला नाहीं तरी देशी संस्थानिकांना त्याची उपयुक्तता कळली व ते भराभर आपल्या राज्यांतून त्या ठरावाला मूर्त स्वरूप देऊं लागले आहेत. फॅक्टरी आक्टवर जेव्हां कौंसिलांत वाद झाला, तेव्हां कारखान्यांत काम करणाऱ्या मुलांना निदान तीन तास तरी शिक्षण देण्याची तजवीज कारखानेवाल्यांनीं केली पाहिजे व सदर शिक्षणाचा खर्च अर्धा कारखानेवाल्यानें व अर्धा सरकारनें द्यावा असें त्यांनीं सुचविलें होतें. पण कौंसिलांत कारखानदारांचे कैवाऱ्यांचें (हे सगळे युरोपियन होते) बहुमत झाल्यानें त्यांची सूचना नामंजूर झाली. त्यावेळीं त्या सूचनेविरुद्ध मत देणाऱ्यांना ना. गोखले यांची सूचना विषाच्या गोळीसारखी वाटली. पण कालगतीनें ना. गोखल्यांना भविष्यवादी ठरविलें आहे आणि 'सत्यमेव जयते' या वाक्याची सार्थकता स्थापित केली आहे. १९११ सालीं कारखान्यासंबंधानें तज्ञ ह्मणून सरकारानें ज्यांना पुढें केलें होतें व जे गोखल्यांची सूचना हाणून पाडण्यास विशेषतः कारण झाले होते, त्याच मि. फ्रिम्यांटल साहेबांचे डोळे आतां उघडले आहेत. मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाचा भार कारखानदारांना अंशतः वाहण्यास लावून त्यांना सक्तीचें व मोफत शिक्षण देण्याची अवश्यकता आतां पांच वर्षांचे आंतच त्यांना दिसूं लागली आहे. हिंदुस्थानांत सरकारी अधिकाऱ्यांचे डोळे कौंसिलांत मत देतांना कसे बंद असतात, व मागाहून ते कसे उघडतात याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

---

पण आतां मि. फ्री म्यांटल सारख्यानें डोळे उघडण्यास काय कारण झालें असा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. त्याचें समाधान ज्यांना पाहावयाचें असेल त्यांनीं बहारप्रांताच्या कायदेकौंसिलांत खाणींतल्या मजुरांसंबंधानें रे. डॉ. क्यांबेल यांनीं उजेडांत आणिलेले प्रकार अवश्य पहावे. त्या प्रांतांत कोळशांच्या खाणींत काम करणाऱ्या मजुरांना राहण्यासाठीं जीं घरें खाणीवाल्यांनीं बांधून दिलीं आहेत तीं कशा प्रकारचीं आहेत व त्यांपासून मजुरांची नीतिमत्ता कशी बिघडत आहे याचें अतिशय हृदयद्रावक वर्णन रेवरेंड साहेबांनीं केलें आहे. येथें हें सांगणें अवश्य आहे कीं हे धर्ममार्तंड कौंसिलांतले सरकारनियुक्त सभासद आहेत. अर्थात सरकारचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. तथापि मजुरांची केविलवाणी स्थिति पाहून त्यांचें मन कळवळलें आणि सरकारानें या बाबतींत योग्य चौकशी करवावी अशी सूचना आणिली. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं सरकारनें उघडपणें चौकशी करण्याचें साफ नाकबूल केलें! खाणीवाल्याचा कैवार घेऊन त्यांच्या अक्षम्य चुकांवर पांघरूण घालण्याचा येवढा खटाटोप करण्याचें सरकारी अधिकाऱ्यांना काय प्रयोजन होतें तें कळत नाहीं. खाणीवाल्यांतर्फेच्या सभासदानें वस्तुस्थितिचें जें समर्थन केलें तें फार मजेदार होतें. मजुरांची दुर्मिळता हें एक कारण त्यांनीं पुढें केलें. पण हें कारण उलट त्यांच्याच अंगावर येण्यासारखें होतें हें त्यांना कळलें नाहीं. मजूर दुर्मिळ आहेत ह्मणून जे मिळाले आहेत त्यांची राहण्याची व नीतिमत्तेच्या रक्षणाची अधिकच जबाबदारी ओळखून वागणें हें खाणीवाल्यांचें अधिकच कर्तव्य होतें. दुसरें कारण तर याहून ही विचित्र होतें. मजुरांना जेथील व्यवस्था पसंत असते तेंथेच ते जातात असें मि. ली ह्मणाले. मि. ली यांचें हें ह्मणणें आणि पंढरपूरच्या यात्रेकरूंना गुराढोरांच्या साठीं केलेल्या आगगाडीच्या डब्यांतून प्रवास करणें आवडतें असें एकदां मुंबईच्या कौंसिलांत सांगण्यांत आलें होतें तें यांच्यांत फारच साम्य आहे. पण या दोन्ही गोष्टी बहार सरकारला तर्कशास्त्रदृष्ट्या निर्दोष आणि मनाची खात्री पटविणाऱ्या वाटल्या, तरी ज्यांनी आपली विचारशक्ति सरकारच्या सेवेला वाहिली नाहीं त्यांचें समाधान असल्या वितंडवादानें कसें व्हावें? वादाच्या भरांत मनुष्य आपली लंगडी बाजू वाटेल त्या रीतीनें समर्थन करावयास पाहतो. पण पुढें जेव्हां शांतपणानें तो वस्तुस्थितीचा विचार करूं लागतो तेव्हां त्याला स्वतःच्याच भाषणाची लाज वाटूं लागते. मि. फ्री म्यांटल यांचा असाच कांहीं प्रकार झाला असला पाहिजे. तथापि आपली चूक कबूल करण्याचें नीति धैर्य त्यांचे ठायीं आहे ही विशेष गोष्ट ह्मटली पाहिजे.

---

## चहाविरुद्ध अनंत मूळ

मागील अंकावरून पुढें चालूं

**तयार करण्याची रीत**—अनंत मूळ चहा प्रमाणें अधणाचे पाण्यांत पुडी टाकून घेण्यासारखें नाहीं. रात्रीं भिजत टाकून तें पाणी मुळांसह सकाळीं चुलीवर ठेऊन निदान अर्धे तरी आटवावें व त्यांत तितकेंच दूध घालून गोडी येईल इतकी साखर घालून तें घ्यावें. आटवून उरलेल्या अर्ध पाव पाण्यांस अर्धा तोळा मूळ या प्रमाणानें जितके अर्धपाव पाणी उरवावयाचे असेल तितकें अर्धे तोळे मूळ रात्रीं भिजत टाकावें. ह्मणजे दहा पावशेरांचें पेय तयार करावयाचें असेल तर ५ तोळे अनंत मूळ अडीच शेर पाण्यांत रात्रीं भिजत टाकावें. तें तसेंच चुलीवर ठेऊन आटवून सव्वा शेर किंवा सव्वाशेराहून कमी उरवावें. आंत जितकें पाणी आटविलें असेल तितकें दूध टाकावें व वाटेल तितकी साखर घालून पावशेर पावशेराचे दहा कप करावे. काढा निकाढा करण्याची जरूर नाहीं.

**मुख्य गूण**—वरील वर्णनावरून लक्षांत येईल कीं अनंतमूळ एक प्रकारची वनस्पती असून अपायकारक खाद्य अगर पेय नाहीं. हें पेय योगवाही ह्मणजे सुंठ, शिलाजतु प्रमाणें दुसऱ्या कोणत्याही औषधाबरोबर मिळवितां येण्यासारखें आहे. फार तर काय; बस्ती प्रयोग करणाऱ्यास किंवा स्नानोपाय करणाऱ्यांस देखील या वनस्पतीचा उपयोग करतां येतो. ह्मणजे ज्या प्रकारचें पोषक अन्न मनुष्यानें रुग्णावस्थेंत घेतलें पाहिजे तशा प्रकारचें हें एक पोषक अन्न आहे.

**सावधगिरी**—हें मूळ जितकें गुणकारक आहे तितकेंच भामकही आहे. हल्लींच्या महागाईंत मजुरी सहा सहा आणेपर्यंत झाली असल्यामुळें व हें इतस्ततः खोल जमिनींत आढळतें ह्मणून मजूराजवळून देखील वरच्या वेलाशिवाय मूळ घेणें धोक्याचें आहे. त्यांतल्या त्यांत लाल मुळाबरोबर पांढरें मूळही मिसळलें जाण्याचा संभव बराच आहे. पांढरें मूळ लाल मूळांपेक्षां जमिनींतच अधिक सापडतें यासाठीं दोन्ही मूळांचें एकत्र मिश्रण होण्याचा संभव जास्त. तसेंच मंजिष्ट वगैरे वनस्पतींचें वगैरे मिश्रण अपायकारक नसून उलट हितकारकच आहे. या वनस्पती अनंत मूळापेक्षां विपुल सापडतात. ह्मणून या वनस्पतींत त्यांचेंही मिश्रण असण्याचा संभव जास्त. कोणतीही वनस्पती घ्या. तिचा गुण सहा महिन्यांत कमी होतो व सहा महिन्यांनंतर नष्टप्राय होतो. या साठीं सहा महिन्याहून अधिक जुनें मूळ असल्यास त्यापासून फायदा होणार नाहीं हें उघड आहे. पावसाळ्यांत ही वनस्पती मिळणें शक्य नाहीं; तसेंच पिकें कापल्या नंतर ढोर बकरें वेलास खाऊन टाकतात ह्मणून मूळ सापडणें कठीण आहे. मुळासह न कुटतांना वनस्पती ठेविल्यास तिचा गुण एक वर्षपर्यंत राहतो. या साठीं ती घेणें ह्मणजे भरंवशाच्या माणसाशिवाय इतराजवळून घेतल्यास ती संशयग्रस्तच भासणार.

**किंमतीचा अंदाज**—ज्या ठिकाणीं ही वनस्पती अति विपूल असेल, त्या ठिकाणीं एक मजूर एका दिवसांत ही अच्छेरापासून अकरा छटाकापर्यंत काढूं शकतो. असा पूर्ण दक्षतेनें अंदाज काढलेला आहे. इतर ठिकाणीं ही वनस्पती सात छटाकाहून अधिक निघतच नाहीं. वाळल्यावर तेंच मूळ बरोबर निमे भरतें. ह्मणजे सहा आण्यास साडेतीन छटाकापासून साडेपांच छटाक मूळ निघतें तें काढा करण्याइतकें बारीक कुटण्यास मजुरी लागते ती निराळीच. व शिवाय कुटींत थोडी तूट ही आहेच. शेरांत पावशेर तूट येते. ह्मणजे सहा आण्यास सव्वा दोन छटाकच कुटलेलें खात्रीचें मूळ मिळूं शकेल. या पेक्षां अधिक स्वस्त मूळ संशयाचेंच समजण्यास हरकत नाहीं. सरासरी मानानें १। रुपयास अच्छेर ह्मणजे आठ छटाक अनंत मूळ मिळाल्यास विकणारास कांहीं ही फायदा राहणार नाहीं ...गी खात्रीचा माल कुटलेला तांबड्या ...ा आणि गुण गेलेला नाहीं असा

सव्वा रुपयास अच्छेर या भावानें हें मूळ देईल तर त्यास नफा मुळींच राहणार नाहीं; पण नुकसान ही येणार नाहीं,

केवळ परोपकार करावा या बुद्धीनेंच आह्मी एका विश्वसनीय शेतकऱ्याचें सहाय्य मिळविलें आहे. स्वाभिमानतंतू अवशिष्ट राहिलेल्या पारिचर्या विमुक्त गृहस्थानें खात्रीची वनस्पती पुरविण्याचें आह्मास आश्वासन दिलें आहे पुरविणारा गृहस्थ आमच्या खात्रीचा असून ही वनस्पती मागविल्यास मागणी पासून आठ दिवसांत ही वनस्पती अडीच रुपये शेराच्या भावानें ते आनंदानें पुरवितील.

## निरोप आणि स्वागत.

गेल्या आठवड्यांत एकाच दिवशीं हिंदुस्थानानें लॉर्ड हार्डिंज यांना अतिशय सन्मानपूर्वक निरोप दिला आणि लॉर्ड चेम्सफोर्ड यांचें स्वागत केलें. दोन परस्पर विरोधी गोष्टी एकाच दिवशीं करण्याचा प्रसंग दर पांच वर्षांनीं हिंदुस्थानाला येत असतो. आपली कारकीर्द संपवून परत जाणाऱ्या व्हाइसराय साहेबाला निरोप देण्याचे प्रसंग या पूर्वी हिंदुस्थानाला कित्येकदां आले, पण लॉर्ड हार्डिंज यांना निरोप देतांना प्रेमानें आणि कृतज्ञतेनें हिंदुस्थानचा कंठ जसा दाटून आला तसा लॉर्ड रिपनचा प्रयाण प्रसंग खेरीज करून इतर कोणत्याही प्रसंगीं आला नव्हता. यांतलें इंगित हिंदुस्थानच्या प्रजेला जितकें उत्तम प्रकारें ठाऊक आहे तितकेंच लॉर्ड हार्डिंज हे ही जाणत असले पाहिजेत. हें इंगित लॉर्ड चेम्सफोर्ड (नवे व्हाइसराय) जाणतील आणि त्याचें ज्ञान आपल्या वागणुकींत दाखवितील तर ते एक आदर्श व्हाइसराय होतील यांत शंका नाहीं. आदर्श व्हाइसराय कसा असतो याचें उत्कृष्ट चित्र खुद्द लॉर्ड हार्डिंज यांनींच एल. एल. डीची पदवी स्वीकारतांना मुंबई युनिव्हर्सिटीपुढें केलेल्या भाषणांत दाखविलें आहे. लॉर्ड हार्डिंज ह्मणाले, 'त्यानें सहानुभूतिपूर्वक हिंदुस्थानच्या आशा व महत्त्वाकांक्षा समजून घेतल्या पाहिजेत व त्या इंग्लंडच्या राजाला व लोकांना कळविल्या पाहिजेत, व त्याचप्रमाणें इंग्लंडच्या लोकांची सदिच्छा आणि न्यायबुद्धि हिंदुस्थानाला स्पष्ट रीतीनें समजाविण्याचा कळकळीनें यत्न केला पाहिजे.' लॉर्ड हार्डिंज यांनीं कोणाच्या रोषास न जुमानतां किंवा लोभास बळी न पडतां हें काम आपल्या विवेकास स्मरून केलें हीच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. मुंबई इलाख्यांतल्या ठिकठिकाणांहून आलेल्या मानपत्रांचा स्वीकार करितांना त्यांनीं स्वतःच्या वर्तनाचें वर्णन एका वाक्यांत अतिशय उत्कृष्ट प्रकारें केलें. ते ह्मणाले कीं मी हिंदुस्थानावर विश्वास टाकिला, मी त्याच्या आशा, भय सुखदुःखें, वगैरे सर्व बाबतींत इतकी सहानुभूति ठेविली कीं हिंदुस्थानाशीं तन्मय होऊन गलों, आणि माझ्या विषयीं हिंदुस्थानची ही तशीच स्थिति झाली. हें वाक्य आपल्या अनुभवाचा फायदा लॉर्ड चेम्सफोर्ड यांनीं घ्यावा ह्मणून त्यांनीं मुद्दाम नव्या व्हाइसराय साहेबांना उद्देशून उच्चारलें, आणि तें नवे लाट साहेब आपल्या हृत्पटलावर पूर्णपणें बिंबवून घेतील अशी आह्मी आशा करतों. जातां जातां लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं विद्यार्थ्यांना जो कळकळीचा उपदेश केला तो त्यांच्या विद्यार्थ्यांविषयींच्या कळकळीचा व प्रेमाचा पूर्ण द्योतक होता. ते ह्मणाले 'हिंदुस्थानाविषयीं मोठ्या आशा बरोबर घेऊन थोड्याच तासांच्या अवधींत मला हिंदुस्थान सोडावें लागणार आहे. पण भाविष्याविषयींच्या त्या आशा पूर्ण करणें आतां तुमच्या हातीं आहे. मी अशावेळीं तुह्मांला रामराम ठोकीत आहे कीं तो काळ राष्ट्राच्या लष्कराची व धनसंपन्नतेचीच नव्हे तर शीलमत्ता, स्वार्थत्याग करण्याची बुद्धि आणि आत्मसयमन हे गुण कसोटीला लावण्यास बसला आहे या गुणांनींच राष्ट्र बनत असतें. ह्मणन विद्यार्जना बरोबर तुह्मी हे गुण संपादा ह्मणजे हिंदुस्थानचें गतवैभव आणि भावी वैभव यांना अनुरूप अशी राष्ट्राची घटना करण्यास तुह्मी समर्थ व्हाल.' तरुण हिंदुस्थान या प्रमाणें गगला तर हिंदुस्थानच्या प्रगतीचे दरवाजे कधीं बंद व्हावयाचे नाहींत, हिंदुस्थान आहे या स्थितींत कधीं राहणार नाहीं, तो पुढेंच पाऊल टाकील यांत त्यांना बिलकूल शंका नाहीं 'मी हिंदुस्थानाला कधीं विसरणार नाहीं, शक्य तेवढ्या रीतीनें हरएक प्रसंगीं हिंदुस्थानचें हितच करीत राहीन, हे त्यांचें शेवटचे शब्द ह्मणजे केवळ औपचारिक नाहींत, त्याचप्रमाणें हिंदुस्थान ही आपल्याविषयीं सदैव कृतज्ञच राहील आणि आपलें स्मरण अतिशय आदरपूर्वक करीत राहील असें आह्मी हिंदुस्थानच्या लोकांच्या वतीनें त्यांना आश्वासन देतों.

लॉर्ड चेम्सफोर्ड यांच्या कर्तृत्वाविषयीं किंवा अंतःकरणाच्या वृत्तींविषयीं अद्याप आह्मांला कांहींच माहिती नाहीं. तथापि लंडन टाइम्ससारखीं पत्रें त्यांची जी तारीफ करीत आहेत तिच्यावर भरंवसा ठेवून आह्मी आपली भवितव्यता पांच वर्षेपर्यंत त्यांच्या स्वाधीन करतांना प्रेमानें आणि आदरपूर्वक त्यांचें स्वागत करीत आहों. आशा हें जसें व्यक्तीचें तसेंच राष्ट्रांचेंही जीवन असतें, ही गोष्ट लक्षांत ठेवून ते हिंदुस्थानाला लागून राहिलेल्या आशा पूर्ण करण्याची लॉर्ड हार्डिंज साहेबांची राजनीति स्वीकारतील तर आणखी पांच वर्षांनीं त्यांना निरोप देण्याची पाळी येईल तेव्हां लॉर्ड हार्डिंज साहेबाप्रमाणेंच ते हिंदुस्थानच्या लोकांच्या प्रेमाला, आदराला आणि कृतज्ञतेला पात्र होतील असें त्यांना ही आह्मी आश्वासन देतों. लॉर्ड हार्डिंज यांचेंच धोरण मी पुढें चालू ठेवीन असें आश्वासन मुंबई बंदरांत उतरल्या बरोबर त्यांनीं दिलें आहे आणि तें ते आपल्या वर्तनानें खरें करून दाखवितील अशी बळकट उमेद बाळगून हिंदुस्थान त्यांचें स्वागत करीत आहे. याहून अधिक काय सांगावयाचें?

## महायुद्धाची प्रगति.

ता० २० फेब्रुआरी पासून आज तागाईत जर्मन लोकांचे व्हर्डुन वरचे हल्ले चालूच आहेत! आतांपर्यंत या हल्ल्याचे पायीं लाखो प्राणांची हानि झाली तरी त्याची त्याला पर्वा वाटत नाहीं. म्यूज नदीच्या पूर्व व पश्चिम बाजूंनीं त्याचे हल्ले व तोफांचा भडिमार सुरूच आहेत. फ्रेंच मुलखांत पुढें पुढें घुसण्याचें वेड जर्मनींचे डोक्यांतून अद्याप गेलें नाहीं. या वेडाचे पायीं जर्मनाच्या एक लक्ष निवडक सैनिकांचे प्राण बळी पडले. आतां आणखी कोठपर्यंत हें वेड अनर्थ करीत राहणार तें कळत नाहीं. त्यांना शेराला सवाशेर भेटण्याचा फ्रेंचांचा ही जबर निश्चय दिसतो. त्यांनीं डूमॉंठ पाशीं जर्मनीचे निकराचे हल्ले तर तितक्याच निकरानें परतविले, आतां माल्ल्न कोर्ट पाशीं त्याच देखाव्याची पुनरावृत्ति होत आहे. जर्मनीपाशी सैन्य तरी किती आहे! इतके शिपाई मेले तरी पुराणांतल्या रक्तबीजोत्पन्न राक्षसांप्रमाणें त्यांची संख्या सारखी वाढती दिसते हें काय गौडबंगाल आहे तें कळत नाहीं. माल्ल्न कोर्टमध्यें त्यांनीं चंचुप्रवेश करून ठेविला आहे, पण पुढें पाऊल पडत नाहीं. म्यूजनदीच्या पूर्वेकडे व्हॉह उध्वस्त झालेलें गांव त्यांनीं हस्तगत केलें आहे; पण त्या गांवचा मजबूत किल्ला अद्याप फ्रेंचांच्या हातांत आहे. ही लढाई किती ही दीर्घकाळपर्यंत चालली तरी इप्रेस, आरस व साइसान प्रमाणें व्हर्डून ही शत्रूंचे हातीं लागू देणार नाहीं अशी फ्रेंचांची प्रतिज्ञा आहे आणि आतांपर्यंत तरी ती त्यांनीं पूर्णपणें प्राण पणास लावून पाळली आहे यांत शंका नाहीं. सोमच्या बाजूला ही जर्मन सैन्यांनीं छाप घालून फ्रेंचांना चकित करून सोडलें आहे ही गोष्ट खरी; पण जर्मनीला त्यापासून कितीसा लाभ झाला तो प्रश्नच आहे. व्हर्डूनच्या भवितव्यतेवर पुष्कळशा गोष्टी अवलंबून आहेत. तेथें शत्रूचा जय झाला तर शत्रु पुढें पाऊल टाकील. अपयश स्वीकारावें लागलें तर त्याचा वचपा इप्रेस घेण्याचा पुनः प्रयत्न करून भरून काढण्याची बुद्धि त्यांना साहजिकच होईल. पूर्वेकडील रणक्षेत्रांत वसंत ऋतूच्या प्रखर उष्णकिरणांनीं बर्फ वितळण्यास प्रारंभ झाला आहे तरी रशियन लोकांनीं किरकोळ जय संपादलेच. लवकरच रिगा येथें जर्मनीची चळवळ सुरू होईल असा रंग दिसत आहे. व्हर्डून येथें शत्रूची फजीती झाली तर इकडे त्यांची चळवळ वाढेल हें निश्चित आहे. फ्रेंचाकडे डाळ शिजली नाहीं ह्मणजे रशियाकडे तुटून पडावयाचें ही जर्मनीची युक्ति आतां सर्वांस विदित झाली आहे. पण जर्मनीनें हें ध्यानांत ठेवावें कीं रिगावर हल्ला झाला तर रशिया गप्प बसेल अशी त्याच्या सैन्याची स्थिति नाहीं. आस्ट्रियन व जर्मन यांचें सैन्य शेकडो मैलपर्यंत पसरलें आहे. येवढ्या मोठ्या क्षेत्रांत कांहीं तरी दुर्बळ जागा आहेतच व त्या रशियन सेनापतींना ठाऊक ही आहेत. त्या मर्मावर आघात करण्यास ते चुकावयाचे नाहींत. पोलांडमध्यें ही पुनः चळवळ सुरू होईल इटली आस्ट्रियाचा पिच्छा पुरवितच आहे. तिकडे ट्रेंटीनोमध्यें मिळालेल्या यशानें इटालियन लोकांचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. आयसोंझो दरींत आस्ट्रियन मोठ्या शिताफीनें लढले; पण त्यापासून कांहीं विशेष लाभ न झाल्यामुळें त्यांनीं तिकडे पुनः हल्ले केले नाहींत. ग्रीसच्या ईशान्य हद्दीवर लढाई सुरू आहे, पण तिचें येवढें महत्व नाहीं. आल्बानिया कडची कांहीं बातमी नाहीं. सालोनिका शहरांत दोस्तांची वस्ती असल्यानें त्या शहरावर शत्रूचे बांब येऊन पडण्याची भीती आहे ह्मणुन तें शहर सोडून नावें अशी ग्रीसनें दोस्त राष्ट्रांना विनंती केली आहे अशी खबर मध्यंतरी आली होती; पण पुढें त्या संबंधानें अधिक कांहीं कळलें नाहीं. आर्मेनियांत ट्रेबिझोंड अद्याप रशियाचे हातीं लागलें नाहीं; पीछेहाट नाहीं. तेव्हां तिकडे समाधानकारकस्थिति असली पाहिजे. त्या मुलुखांतले रस्ते वाईट; यामुळें पुढें पाऊल टाकण्याचें काम मुष्किलीचें आहे. ट्रान्सपोर्टची व्यवस्था उत्तम असल्याखेरीज लढाईचें पाऊल पुढें पडणार कसें? रशियाला तिकडे ही अडचण मुख्य वाटत असली पाहिजे. तथापि युद्धाची प्रगति तिकडे अगदींच स्थगित झालेली नाहीं हें बिटलिसकडे रशियानें पुढें पाऊल टाकलें आहे यावरून ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. अर्झरूम परत घेण्याचा प्रयत्न शत्रू करतील असा संभव दिसत नाहीं. सारांश, तिकडे रशियन एकंदरीनें यशस्वीच आहे. पारिस येथें दोस्त राष्ट्रांमध्यें झालेल्या कॉन्फरन्सची विशेष हकीकत अद्याप कळली नाहीं. तथापि मित्रत्व दृढ करण्याबद्दल आणाशपथा झाल्या असल्या पाहिजेत. हा वर्तमानपत्रांचा तर्क खरा ठरेल असें दिसतें. वसंतऋतूंतल्या स्वारींत ठावठिकाण व वेत या कॉन्सरन्समध्यें ठरले असले पाहिजेत. सर्वांनीं एकमतानें चालण्यांतच दोस्त राष्ट्रांचें हित आहे ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. सर्वांनीं मिळून निरनिराळ्या बाजूंनीं एकदम हल्ला केल्याशिवाय शत्रूला घाबरवून सोडतां येणार नाहीं व तसें झालें तरच बहार आहे. कोणत्याही राष्ट्रानें शत्रुशीं स्वतंत्र तह करावयाचा नाहीं हें तत्त्व पुनः सर्वांनीं कबूल करण्याकरितां ही कॉन्फरन्स भरलें असण्याचा संभव आहे. कारण जूट फोडण्याचे प्रयत्न जर्मनीकडून पराकाष्ठेनें चाललें आहेत. मधून मधून जर्मन लोक तहाच्या गप्पा पसरवून आपला मतलबी कावा साधण्याचा यत्न करीत असतात, पण अशा काव्यानें आतां कोणी फसणार नाहींत. जर्मनीचा व्यापार बंद पाडून ज्याप्रमाणें पैशाची अडचण त्याला जबरदस्त रीतीनें भासविण्यांत दोस्त राष्ट्रांना यश आलें तशीच कांहीं तजवीज आस्ट्रियासंबंधानें ही व्हावयास पाहिजे हें मत आतां सार्वत्रिक झालें आहे

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—महायुद्धाचा परिणाम इंडियाच्या वातावरणावर ही झालेला दिसतो. मेघ व विज यांचे योग वारंवार घडून येतात. वारा सो साट्याचा सुटतो व उष्णतेच्या मानांत के बदल ही फार होतात. किरकोळ दुखणीं बळावलेलीं दिसतात आणि उन्हाच्या ताप मुळें प्लेगाचे उंदीर चिखलदऱ्याची डोंगर हवा खाण्यासाठीं सपाटीचीं मैदानें सो लागले आहेत.

**कोहीनूरः**— आमच्या प्रांतांतील संत रत्न रा रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे य बेळगांव येथें चालू महिन्याच्या २९ तारखेला भरणाऱ्या मुंबई इलाख्याच्या प्रांति परिषदेचे अध्यक्षस्थान देण्यांत येत आहे सुंदर होय. या योजनेनें मध्यप्रांत व मुं इलाखा यांच्या स्वराज्याच्या ध्येयाला मु

करण्याचीं कार्यक्षेत्रें अधिक निश्चित होऊन त्यावर सुविचारांचे दीपस्तंभ ठिकठिकाणीं उभारण्यांत येतील.

सुमंगलम्—गेल्या पाडव्याच्या मुहूर्तावर येथील म्युनासिपल ४ नंबरच्या शाळेंत विद्यार्थ्यांनीं चक्रवर्ती बादशहाचे मंगल चिंतलें व ईश प्रार्थना केली. विद्यार्थ्यांनीं वार फंडाला ५ रुपये वर्गणी दिली. शाळेचे हेडमास्तर रा. रा. बळीरामपंत उगवेकर यांनीं केलेला हा प्रारंभ फार चांगला होय.

पैसाफंडः— गेल्या पाडव्याच्या मुहूर्तावर पैसाफंड गोळा करण्याच्या खटपटींत कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या गैरसमजामळें विद्यार्थ्यांस मनाई करण्यांत आली होती. इतकेंच नव्हे तर येथें झालेल्या सुंदर व्याख्यानाला हजर न राहण्याविषयीं त्यांस तुर्तातूर्तचे हुकूम ही होते. ही वक्रदृष्टी दूर करण्यासंबंधानें रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार डे० कमिशनर हे योग्य ते हुकूम लौकरच काढतील. कांकीं पैसाफंडाची काचशाळा या लढाईच्या वेळीं सरकारच्या फार उपयोगीं पडत आहे आणि ह्मणूनच अशा सत्कार्याच्या मार्गांतील गोटे जितके लौकर दूर फेकण्यांत येतील, तितके श्रेयस्कर होय.

रा. रा. महादेव शंकर देशमुख ए. अ. क. उमरावती यांस वर्ग ८ मध्यें कायमची जागा देण्यांत आली हें कळविण्यास आनंद वाटतो.

नागपूर येथील "मारवाडी" पत्राचे संपादक रा. रा. बाबू शिव नारायण सिंह यांस मुजफरपूर येथें देवाज्ञा झाली यामुळें चांगलें स्फूर्तिदायक लेख लिहिणाऱ्या संपादकाचें कार्य नमुन्यासह तरुण पिढी पुढें आलें आहे.

## नोटीस

क्रि. नं. ६ सन १९१६
चौकशीची ता० ५-८-१६
वि. सीनीयर सबजज्ज साहेब
आकोला यांचे कोर्टांत
अर्जदार
किसनलाल ओंकारदास अ. पा. क. आई कस्तुरी बाई नवजे ओंकारदास मारवाडी राहणार आकोला.

या नोटीशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें मयत ओंकारदास रामप्रसाद मारवाडी राहणार आकोला यांचे गव्हेर्मेंट प्रॉमीसरी नोटावरून येणें असलेले कर्ज व त्याचे व्याज वसूल करण्याकरितां सक्सेसन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल कि. अर्ज नंबर ६ सन १६ चा कोर्टांत ९-३-१६ इ. रोजीं दाखल केला आहे. या अर्जाची सुनावणीची ता० ५-८-१६ ची नेमली आहे. तरी या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार असल्यास त्यानें स्वतः अगर वकीला मार्फत आपला लेखी जबाब वरील तारखेस कोर्टांत दाखल करावा. याप्रमाणें न केल्यास अर्जदारास वरील तारखेला सर्टिफिकेट दिलें जाईल. व मग पुढें या संबंधानें कोणाची कांहीं तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळवि आज ता० २९ माहे ३ सन १९१६ इ०

D. K. Kolatkar.
सीनीयर सबजज्ज कोर्ट आकोला

## जाहिरात

सर्व लोकांस खालीं सही करणार यांजकडून नम्रपणें कळविण्यांत येते कीं, मौजे मुंडगांव ता. अकोट येथील मयत माझा मामा हिरामण कांवजी ढेंगळे माळी याची राहिलेली इस्टेट १८ खांव धाबे इमल्यासमेत हे तुकाराम कृष्णाजी नवले माळी मुंडगांव याचे जवळून खरेदी, गहाण, अगर भाड्यानें कोणी ही घेऊं नये. घेतल्यास तो व्यवहार खोटा ठरेल. सदर्हु इसमाचा त्या इस्टेटीवर मुळींच हक्क नाहीं. या संबंधानें मागें ही जाहिरात दिली होती. कळावें. ता. ६-४-१६ इ

सही
मोतीराम माधव हेडमास्तर म. शाळा देवरी
नो. नं. १३३


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता [illegible] मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळातरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व अन्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एक रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. चिडक, मुत्रांचा लाल, सकाव, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात. चिडक एका वडकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. वा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. यशिवाय निरनिराळे रोगांवर अनेक औषधें, प्रथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी.
कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



# Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4,823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2 47,18,8 |
| 1914 | 12,46,0 | 4,96,8650 |

## SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after provising for the Reserve fund
divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential andactive agents wantedTerms liberal***

Full particulars, prospectus and proposal forms on application to—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Bran
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला---सोमवार तारीख १७ माहे एप्रिल सन १९१६ ई० [ अंक १५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नमुन्याच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

---

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिश्रक करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

---

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

---

हिंदुस्थानांत मराठी भाषेत असें हें पहिलेंच.
स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरु झालें. वा. व. ८३ ] पूर्णानंद [ सुरु झालें. ट. ख ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्तांचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें **अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद** मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरूं झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालूं परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त -।- ( व्ही. पी. पोष्टेजसह ॥≈ ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र सोहनी,
पूर्णानंद–कार्यालय,
खडेबाजार–बेळगांव.

नो. नं. १३२

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीमागून येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, पान भरण्याचे, लिस्टफार्म पर्च्यांचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जांचे नमूने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

वऱ्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

---

### श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-बोड, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अग्रफुलें साखी व घागऱ्याचीं वगैरे सर्व जातीचा माल–तसेंच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकांची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापूर
नो नं ६

---

## अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. -॥- तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५
नो० नं० २

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १८.

---

## कौतुकरत्नाकर

छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह
पृष्ठसंख्या ६००; विषय ६०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,

बंगाल्यांतील कामरूपदेशीं ही विद्या फार प्रबळ असून तिकडील जटेली, लंगोटि, छा.क.ू करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवून सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केलेला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुवाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहारिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. २ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपुर.

## येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONONICS.

Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions or passed by the TIMES (London) the EMPIRE (Calcutta) the MODERN REVIEW (Calcutta) the HINDUSTAN REVIEW (Allahabad) Strong condema ion by the PIONEER (Allahabad) Chapters I what is Indian Economics (ii) social conditions and Economics condition (iii) Indian Economics and Ind an Psgcholoky. (iv) Political conditions and Economics condition, (v), Language Policy and Economics, (vi) Economic evolution and layers of cicilization (vii) Communal Economics and distributive Economics, (viii) Future out book.

२ **संकीर्ण लेखः**—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पी. नें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

(१) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
(२) या विषयावर झालेला वादविवाद
(३) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
(४) धर्मनियमन आणि ब्राह्मणांची परंपरागत विद्या
(५) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
(६) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
(७) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
(८) मध्यप्रांतीयास संदेश
(९) प्रतिनिधींचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुलै १९१५ च्या अंकांत केसरीकार ह्मणतातः–

"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या अत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकड विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नसून त्यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणे लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकापुढें आले ह्मणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें जें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ **उत्तर अमेरिकेंतील वसंत काल** 'एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पौत्र कवींचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे (महाराष्ट्र) किंमत ४ आणे

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

---

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes (Bombay Circle) of other denominations for the public on demand as far as possible Endeavours will be made as far as possible in all transactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

---

## जाहिर नोटीस

मेसर्स पेस्टमजी अँन्ड सन्स यांचेकडून सर्वत्र आकोल्यवासी लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं आकोल्याहून आकोट वाशीम वगैरे इतर ठिकाणीं जाण्याकरितां सर्व प्रकारें अपटूडेट उत्तम सोयीची माकस्वेल मोटार गाडी खालील दरानें मिळूं शकेल.

आकोल्याहून वाशीम एक फेरी रु. ३०
" " येण्याजाण्याचे रु. ५१
आकोल्याहून आकोट एक फेरी २०
" " येण्याजाण्याचे रु ३०

इतर ठिकाणीं जाण्या करितां प्रत्येक मैलास एक वेळेस बारा आणे प्रमाणें सिंगल पडेल. परंतु येण्या जाण्या करितां केल्यास प्रत्येक मैलास आठ आणे प्रमाणें पडेल.

विशेष टीप— परत प्रवास करणें तो ज्या दिवशीं तेथें पोहचला असेल त्याच दिवशीं केला पाहिजे. परंतु मुक्काम करणें असेल तर प्रत्येक दिवशीं रु. १० प्रमाणें ज्यास्त भाडें पडेल.

नो. नं. १२७ मेसर्स पेस्टमजी अन्ड सन्स

---

## नोटीस

नोटीस घेणार खुशाल वा गणु धनगर व गणपत वा कडतु तेली व तानु वा रामा धनगर आणि त्रिंबकराव खुशालराव देशमुख सर्वत्र राहणार अंत्रज तालुका खामगांव

यांसीः—

नोटीस देणार पुती मर्द रावोजी धनगर राहणार अंत्रज ता खामगांव कारणे नोटीस देतो ऐसा जे कीं माझा बाप नामे लक्ष्मण वा कुकाजी धनगर राहणार अंत्रज हा अजमास २ दोन वर्षे झालीं मयत झाला असून त्याची स्थावर जंगम इस्टेटीची मालकीण मी आहे. कारण कीं प्रथम मी मुलगी असून अज्ञानपणापासून तो हल्ली सज्ञान होईपावेतो अजमास २५।३० वर्षांपासून बापास पुत्रसंतान नसल्यामुळें माझें लग्न करून इस्टेटीची मालक वारस या नात्यानें मजला केलें वरून आतां माझा बाप मैत झाला. तो पुर्वीपासून भाऊबंदातून विभक्त होता. त्यामुळें भाऊ बिरादराचा माझे बापाचे स्थावर जंगम इस्टेटीवर मुळींच हक्क नाहीं. व शिवाय मजला थाप देऊन माझे बापाचे नांवचा असामीचा गहाणाचा रोखा रुपये ९०० नवशे रुपयाचा रुपये वसूल करून देतो ह्मणून सीताराम धनगर यांनीं वरील सर्वजणांनीं एक मत करून माझे पासून पावत्या आंगठा करून भुलथाप देऊन करून घेतली ती पावती माझी मजला परत द्यावी. व गहाणातील ऋणको जाणू याचे गहाणखत रुपये ९०० चे आहे. तेही मजला परत दिले नाहीं. करितां नोटीस पावलेपासून ८ दिवसाचें आंत माझे हातच्या आंगठ्याच्या रसीदा व गहाणखत माझे मजला परत द्यावें तसें न केल्यास तुह्मी लिहून घेतलेल्या रसीदा रद्द आहेत व गहाण रु. ९०० चे हेही तुमचेपासून भरून घेईल सबब नोटिशीनें आगाऊ सुचविले आहे. ही नोटीस लिहून दिली कळावें तारीख ५-४-१६ इ.

दस्तुर देवीदास रावजी पांडे

सही

पुती मर्द रावोजी धनगर रा० अंत्रज नि. हातची बांगडी व आंगठा असे

नो. नं. १३४

---

## नोटिशीचें उत्तर

रा. रा. दवलत वा गणू पाटील साहू दुकान बटवाडी बुजरुख ता० बाळापुर.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मीं ता. २९-३-१६ नो. नं. १२४ ची दिलेली वऱ्हाडसमाचारांतील जाहिर नोटीस ता. ८-४-१६ इ रोजीं मिळाली. मी आपले येथून नोकरी सोडली त्या तारखे पर्यंत तुमचे व तुमची पालनकर्ती आई (सुंदराबाई) या दोघांचे विचारानें काम केले. ज्या दिवशी नोकरी सोडली त्याच दिवशी सर्व कागद पत्र शिल्लक, तुमचे सासरे तुळशीराम पाटील उंबरेकर यांचे समोर तुमचे ताब्यांत दिली. त्या तारखे पासून एखादा दावा दरखास्त अगर कांहीं ही दुकानचें काम कायद्याबाहेर जाऊन तुमचें नुकसान झाल्यास जबाबदार तुह्मी आहात नोकरीचे तारखेपर्यंत तुमचे व तुमचे आईचे विचारानें कामें निष्कपट बुद्धिनें केली आहेत त्यांत तुह्मांस कांहीं नुकसान झालें असें वाटत असल्यास त्याची जबाबदारी तुमचेवर व तुमची पालनकर्ती आई यांचेवर आहे. तुह्मी लोकांचे नादी लागून विनाकारण नोटीसीनें स्वतः संबंधानें व दुसऱ्या संबंधानें अविश्वास उत्पन्न करून घेतला. तुमचे दुकानची बाकी मजकडेस अंदाज रुपये २०० दोनशे आहेत त्याचा दरसाल रुपये २५ पंचवीस प्रमाणें मोढे द्यावेत असा तुमचेसी व तुमची पालनकर्ती आईशी ठराव झाला असल्यानें तुह्मास एकदम रक्कम मागत येत नाहीं. करारा-प्रमाणें दरसाल रुपये २५ पंचवीस देत जाईन. कळावे ता. ११-४-१६ इ.

सही

गणपत तुकाराम सुतार रा. वाडेगांव द.खु

नो. नं. १३५

---

## नोटीस

नोटिस घेणारी तुकाराम कृष्णाजी नवले माळी रा. मुंडगांव ता. आकोट

यांसः-

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मयत माझा मामा हिरामण कांवजी ढेंगळे माळी रा. मुंडगांव याची असलेली इस्टेट १८ खांब धाबे इमल्यासमेत त्यांत तुह्मी राहतां. या संबंधानें मागें तुह्मास नोटिस दिली होती. तरी आपण न जुमानतां त्यांत राहतच आहांत. करितां दुसरी नोटिस देत आहों. सदर्हु नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत खुले घर करून निघून जावे. नाहीं तर कोर्टांत फिर्याद करून चालु व मागील नोटिशीचे खर्चासह खर्च भरून घेतला जाईल. वरील घर खरेदी, गहाण, अगर भाड्यानें दिल्यास कायद्याप्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें. ता. ६-४ १६

सही

मोतीराम माधव हेडमास्तर म. शाळा देवरी पो. अकोट

नो. नं. १३६

---

## नोटीस

रा. रा. गोपाळ परवत पाटील रा दानापूर ता. अकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुह्मास माझे मौजे शेरीखुर्द ता. अकोट येथील शेत रुपये १२२२॥८ बाराशें बावीस रुपये आठ आणे मध्यें विकत देऊन ता. ३१-३-१९१६ रोजीं खरेदीखत लिहून दिलें. परंतु त्या दिवशीं उशीर झाल्यामुळें दस्तैवज रजिष्टर झाला नाहीं. ह्मणून तुह्मी व मी आणखी मंडळी सुद्धां खरेदीखत छापण्याकरितां ता. १-४ १९१६ इ॥ रोजीं तेल्हारे येथें रजीष्टर कचेरींत आलो. परंतु तुह्मी मजला थाप देऊन दस्तैवज मजजवळून हिसकावून नेला.

व रजीष्टर करून घेतला नाहीं. खरेदीखतांत भरणा अंमलदारासमक्ष रुपये १२०० व विसाराबद्दल आगाऊ रुपये २२॥ या प्रमाणें आहे व खर्च दोघामिळून ठरला आहे. विसारा पैकीं रुपये १२॥ तुमचे कडेस घेणें राहिले. करितां तुह्मास या नोटिशीनें मुद्दाम कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्य पासून आठ दिवसाचे आंत तुह्मास करून दिलेले खरेदीखत तुह्मी नोंदण्यास दाखल करून नोंदून घ्यावे. व खरेदीखता प्रमाणें भरणा रुपये १२०० अंमलदारासमक्ष घ्यावे. व विसारापैकीं रुपये १२॥ द्यावे. तसें न केल्यास तुमचा खरेदीचा सवदा रद्द समजून शेत दुसऱ्यास विकावे लागेल. व जी नुकसानी येईल ती तुह्मास भरून द्यावी लागेल. कळावें ता. ४-४ १९१६ इ॥

सही

चंद्रभान वा॥ काशीबा पाटील रा० शेरीखुर्द ता. अकोट दस्तुर अंबादास मुकुंद पी. रा. तेल्हारे

नो. नं. १३७

## नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं माझा दत्तक मुलगा श्रीधर हा निरुद्योगी, ख्याली खुशाली, व चैनी निघाला आहे. तो माझ्या आज्ञे बाहेर वागतो ह्मणून मी त्यास सुधरून शुद्धीवर येईपर्यंत दूर केलें आहे. स्थावर जंगम जिनगी सर्व माझ्या कमाईची स्वसंपादित आहे. मी जीवंत आहे तों पर्यंत त्याच्यावर दुसऱ्या कोणाचाही हक्क संबंध चालणार नाहीं. चिरंजीव श्रीधर याला जिनगी संबंधाचा व्यवहार करण्याची मनाई आहे. ही मनाई लक्ष्यांत घेऊन इतर लोकांनीं त्याच्याशी कोणतीच देवघेव करून फसूं नये. ह्मणून आगाऊ सूचनार्थ ही जाहिर नोटिस दिली आहे. त्यानें केलेल्या व्यवहाराचा बोजा जिनगीवर कोणत्याच प्रकारे येणार नाहीं.

तसेंच चिरंजीव राजश्री श्रीधर यांस ही कळविण्यांत येते कीं तूं लवकर आपलें वर्तन सुधर व चांगल्या लोकांच्या सल्यानें वागूं लाग. नाहीं तर, मला तुझ्या संबंधानें कडक तजवीज करावी लागेल. आणि मग मीच लावलेल्या झाडाला तोडण्याचा वाईट प्रसंग उत्पन्न होईल. तेव्हां तूं सन्मार्गाला लागशील अशा भरंवशानें तुला चार महिन्याची मुदत देत आहे. या मुदतींत योग्य तो परिणाम दिसून येणार नाहीं तर मी जिनगीची निराळीच व्यवस्था कायमची करून टाकीन तुह्माला पश्चातापाला जागा राहूं नये ह्मणून मी ही नोटिस देत आहे. ता. १० एप्रिल १९१६ इ.

सही

शिवराम अंबादास कुळकर्णी राहणार पिंपळगांव ता. मुर्तिजापूर

नो. नं. १३८

## नोटीस

नोटीस बेशमी पार्वती मर्द सीताराम पा. रा० वरखेड ता० आकोला हल्लीं मुक्काम जवळ ता० मल्कापूर व मौजे भवरद ता० आकोला पो० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी गंधर्वाची बायको असून तूं मांदी झाल्यामुळें तुजला नेण्याकरितां माझे घरी तुझा जावई रुपचंद व भाऊ नामा हे आले व त्यावेळीं तूं मजशा असें कबुलं केले कीं मी मांदगी चांगली होताच भवरदहून माघारी येईन. पुढें तूं चांगली होऊन मजला न विचारतां जवळ्यास तुझे आईचे बरोबर लग्नास गेलीस. त्या गांवास तुजला नेण्याकरितां मी आलों असतां त्वा मजला पाहतांच तूं छपून राहिलीस व तुझ्या भावानीं माझ्याशीं तंटा करून माझे अंगावर मारण्यास आला असे गैर कायदेशीर काम केलें. करितां या नोटीशीनें कळविण्यांत येत आहे कीं ही नोटीस पावतांच त्या माझे घरचे तुझे अंगावर सोन्या चांदीचे असलेले दागीने घेऊन माझे घरीं यावे. तुझे व तुझे भावाचे मनांत बेमानी आली त्या बेमानीपासून फौजदारीस पात्र व्हाल. जर करितां तूं न आल्यास मग मात्र कोर्ट मार्फत तजवीज करून मी तुझा ताबा घेईन. दागीण्याची जबाबदारी तुझे भावानीं व जावई यांनीं घेतली आहे हें पक्क समजावें कळावे तारीख ५-४-१६ इ.

सही

सिताराम वा॥ सूर्यभान पाटील रा० मौजे वरखेड ता० आकोला

द. खु.

नो. नं. १३९

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शु॥ १४ शके १८३८

## खेडेगांवच्या गरजा.

हिंदुस्थानांत शहरें अशीं फार थोडीं आहेत. तथापि बहुतेक सुशिक्षित लोक शहरांतून राहणारे असल्यामुळें व त्यांचा संबंध खेडेगांवाशीं क्वचित्‌च येत असल्यामुळें त्यांनीं चालविलेल्या वर्तमानपत्रांतून व कायदेकौंसिलासारख्या सभांतून खेडेगांवच्या गरजा संबंधानें ऊहापोह केलेला फारसा आढळून येत नाहीं. खुद्द खेडोपाडीं वर्तमानपत्रें निघून तेथील लोक आपल्या गरजांचा विचार करूं लागतील व आपलीं दुःखें सरकारापुढें व जनतेपुढें स्वतःच मांडतील असा काळ दूर आहे. ह्मणून हें काम प्रांतिक वर्तमानपत्रकर्त्यांनींच तूर्त करावयास पाहिजे आहे. खेडेगांवच्या लोकांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केलें गेल्यामुळें राष्ट्रीयसभेसारख्या संस्थांना खेड्यापाड्यांकडून जी मदत व सहानुभूति मिळावयास पाहिजे ती मिळत नाहीं, व तुमच्या कांग्रेससारख्या सभा खऱ्या खऱ्या सार्वजनिक नाहींत असा आक्षेप घेण्यास सरकारी अधिकाऱ्यांना जागा मिळत आहे. अशा अनेक कारणांस्तव खेड्यापाड्यांतल्या लोकांशीं मिसळून व त्यांच्या अडचणींची माहिती करून घेऊन प्रत्येक राष्ट्रहिताच्या कार्याला त्यांची सहानुभूति व सहकारिता मिळविण्याचा यत्न करणें हें सुशिक्षित समाजाचें व लोकनायकाचें कर्तव्य आहे.

खेडेगांवांतल्या लोकांच्या गरजा थोड्या, तथापि त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत कोणा एका संस्कृत कवीनें शेकडों वर्षांपूर्वी त्या एका श्लोकांत ग्रथित केल्या आहेत त्या येणें प्रमाणें:—

तत्र मित्र न वस्तव्यं यत्र नास्ति चतुष्टयम् ।
ऋणदाता च वैद्यश्च श्रोत्रियः सजला नदी ॥

याचा अर्थ–हे मित्रा, जेथें सावकार, वैद्य, वेदज्ञ ब्राह्मण व पाण्यानें भरलेली नदी नसेल, त्या जागीं राहूं नये. आज हिंदुस्थानांत जेथें या चारी गोष्टींची अनुकूलता आहे अशीं खेडीं किती दाखवितां येतील? अनेक गांवें अशी आहेत कीं त्या ठिकाणीं शेतकऱ्यांना हरप्रसंगीं लागणारें ऋण जबरदस्त व्याजानें एखाद्या मारवाड्याकडून काढावें लागतें, व जबर व्याजाचे पायीं त्या बिचाऱ्याला आपलें शेत, बैल वगैरे गहाण ठेवून कफल्लक होऊन बसण्याची अखेर पाळी येते. अशा ठिकाणीं सहकारि पतपेढ्या स्थापन करण्याची अत्यंत अवश्यकता आहे. अशा पेढ्या स्थापण्याचा उद्योग हल्लीं चालला आहे, पण तो फारच मंदगतीनें चालला आहे. याला कारण या विषयांत मन घालून निःस्वार्थ बुद्धीनें जनहिताचीं कामें करण्यास पुढें येणाऱ्या सुशिक्षितांची वाण हें आहे. सहकारी पतपेढ्यांची संख्या ज्या मानानें वाढेल त्या मानानें शेतकऱ्यांचें रक्त शोषून घेणाऱ्या मारवाडी सावकाराला आपला गाशा गुंडाळावा लागून खेडेगांवचे लोक सुखी होतील.

दुसरी अडचण वैद्यकी मदतीची व आरोग्यवर्धक उपायांची. खेडेगांवातले लोक बहुधा आपला बहुतेक काळ उघड्या मोकळ्या हवेंत शारीरिक श्रम करण्यांत घालवीत असल्यामुळें शहरवासी लोकांप्रमाणें त्यांना उठल्या बसल्या वैद्यकी मदत लागत नाहीं ही गोष्ट खरी; तथापि जेव्हां लागते तेव्हां ती त्यांच्या आटोक्यांत नसते. पूर्वीचे काध्यामेध्याचीं औषधें देणारे वैद्य आतां दुर्मिळ होत चालले आहेत. मेडिकल रजिस्ट्रेशन कायद्यासारखे कायदे त्यांचा उच्छेद करण्यासाठीं नवे नवे निर्माण होतच आहेत, आणि डाक्तरांकडे जावें तर ते शहरांत राहणारे व नुसता हात पाहण्यासाठीं रुपया दोन रुपये फी मागणारे! रोज ज्यांची हातातोंडाशीं गांठ पडणार अशा बिचाऱ्या खेडेगांवच्या शेतकऱ्यानें डाक्तराला फी देण्यास रुपये कोठून आणावयाचे? अशा लोकांसाठीं सरकारानें किंवा उदार धर्मात्म्या खाजगी धानिक लोकांनीं धर्मार्थ फिरते दवाखाने ठेवावयास पाहिजेत. आमच्या आयुर्वेदिक औषधांना फारसा खर्च येत नाहीं. तेव्हां दहापांच गांवांमिळून असे फिरते आयुर्वेदिक दवाखाने ठेवल्यास खेडेगांवांची ही दुसरी अडचण सहज दूर होईल. पण इकडे कोणाचें सहसा लक्षच जात नाहीं. कांहीं उदार धानिक लोक धर्मार्थ दवाखाने काढतात. पण ते शहरांतल्या गरीब लोकांसाठीं. खेडवळांची दैना त्यांना दिसत नाहीं. खेडेगांवच्या आरोग्याकडे सरकारी अधिकाऱ्यांचें ही विशेष लक्ष नसतें यामुळें खेडेगांवांत स्वच्छता ठेवण्याच्या तजविजीचा बहुतेक अभावच दिसतो. हिंदुस्थानची मोठी लोकसंख्या खेड्यापाड्यांतून राहणारी असतां त्यांच्या आरोग्याकडे इतकें दुर्लक्ष जेथें होत आहे तेथें एकंदर जनता निस्त्राण व्हावी व मलेरियासारख्या रोगांनीं हाहाःकार करून सोडावा यांत काय आश्चर्य आहे?

तिसरी अडचण श्रोत्रियाची. श्रोत्रिय या शद्बाचा अर्थ येथें देशकाल वर्तमानानुरूप शिक्षक असा घेतला पाहिजे. खेडेगांवांतल्या लोकांना अगोदर शिक्षणाचें महत्त्व कळत नाहीं; आणि ज्या आईबापांना थोडें बहुत कळूं लागलें आहे त्यांनीं आपल्या मुलांना शाळेंत पाठवूं ह्मटलें तर प्रत्येक खेड्यापाड्यांत एखादी तरी शाळा असावयास पाहिजे ती नाहीं. दहापांच गांवांमिळून एखादी शाळा असणार. त्या शाळेंत मुलाला घालावयाचें ह्मणजे रोज दोनचार कास उन्हातान्हांत मुलाला पायीं जावें लागणार, व जाण्यायेण्यांतच त्याचा पुष्कळसा वेळ मोडणार. प्रत्येक गांवाला लहानशीच कां होईना, पण शाळा असली तर शाळेंत दोनतीन घंटे मुलाचें शिक्षण होऊन बाकीच्या वेळांत त्याला आपल्या आईबापास शेतकी वगैरेच्या कामीं मदत करतां येईल. पण अशी कांहीं व्यवस्था नसल्यामुळें शिक्षणाच्या अभावी बाकीच्या साऱ्या जगांत काय चाललें आहे या विषयाच्या पूर्ण अज्ञानांत आज हिंदुस्थानच्या लक्षावधि लोकांना आपल्या आयुष्याचे दिवस काढावें लागत आहेत, ही केवढी शोचनीय गोष्ट आहे!

खेडेगांवची चवथी जरूरी ह्मणजे पाणी. जेथें मोठी नदी वाहत आहे अशा गांवाची गोष्ट निराळी. पण पुष्कळ गांवें अशीं सांपडतील कीं तेथें नदी, कालवा, तलाव, वगैरे जलसंचयाची अनुकूलता मुळींच नाहीं. कोठें तलाव वगैरे असलाच तर लोकांच्या अज्ञानामुळें त्यांतच मलमूत्रविसर्जन होऊन त्यांतलें पाणी पिण्याच्या पात्रतेचें राहिलें नसतें. तथापि लोक त्यांतच कपडे धुतात, स्नानें करतात, व त्याचेंच पाणी स्वैपाकासाठीं व पिण्यास ही नेतात! अशी अव्यवस्था असल्यावर त्या गांवांत पटकी सारखे रोग उद्भवून अनेक प्राणांचा संहार झाला तर त्यांत काय आश्चर्य आहे? सारांश, खेडेगांवांत पाण्याच्या सोयी नव्या करणें, किंवा असलेल्या सोयींची स्वच्छता राखण्यास शिकविणें हीं अत्यंत महत्त्वाचीं कर्तव्यें सरकारी अधिकाऱ्यांचीं व सुशिक्षितांचीं आहेत. पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं या कर्तव्याकडे त्यांचें लक्ष जावें तसें जात नाहीं आणि याचा परिणाम अतिभयंकर नाश व कृषिवर्गाची झपाट्याची अवनति हा होत आहे. या परिणामाकडे आमच्या लोकांचें लक्ष कधीं जाणार तें कळत नाहीं.

## देशी वैद्यकाविषयीं न्यायबुद्धि.

इंडियन मेडिकल सर्व्हिसचे मुख्य डायरेक्टर ना. सर पार्डी ल्युकिस यांचें देशी वैद्यकाविषयींचें उच्चमत सर्वांस ठाऊकच आहे. परवा देशी वैद्यकासंबंधाच्या ठरावावर कौंसिलांत भाषण करतांना त्यांनीं जे उद्गार काढले ते संस्मरणीय होते. ते ह्मणाले—

चाळीस वर्षांपूर्वी— जेव्हां जंतु हे रोगाला कारण आहेत हें मत ठाऊक नव्हतें तेव्हां—या मतासंबंधानें विद्यार्थ्यांपुढें मी भाषण केलें असतां सर्वांनीं माझी हुर्यो केली. मलेरिया हा दूषित हवेपासून होतो हें मत थोड्याकाळापूर्वीपर्यंत प्रचलित होतें. पाश्चात्य वैद्यकाचें मत असें वारंवार बदलत असतां सगळे शोध आपण लावीत आहों व आपणांलाच काय तें कळतें, इतर वैद्यकपद्धतींना त्यांतलें कांहीं ज्ञान नाहीं अशी घमेंड ॲलोपाथी डाक्तरांनीं कां मिरवावी तें मला कळत नाहीं. हिंदुस्थानासारख्या देशांत जेथें आज शेकडों वर्षें खेड्यापाड्यांतल्या कोट्यावधि लोकांना हकीम व वैद्य यांच्याच औषधांचा उपयोग होतो व त्यापासून गुण ही येतो तेथें तरी ही घमेंड कोणी मिरवूं नये. अशा ठिकाणीं देशी भाषांतून पाश्चात्य वैद्यक शिकलेल्या हलक्या दर्जाच्या डाक्तरापेक्षां हकीम व वैद्य यांनाच शिक्षण देऊन त्यांच्या विद्येंत अधिक तरक्की करण्याची अवश्यकता मी अधिक समजतों. हलक्या सलक्या डाक्तराचें औषध घेण्यापेक्षां चांगल्या वैद्याचें औषध घेऊन बरें होणेंच मला अधिक पसंत आहे. हकीम आणी वैद्य यांना काध्याभेय्याचे किंवा नाकाडोळ्याचे वैदू असें तिरस्कारदर्शक नांव देणाऱ्या डाक्तरांनीं संघशक्तीच्या जोरावर त्या लोकांना दाबून टाकण्याचा प्रयत्न करावा हें मी समजतों. या हकीम वैद्यांत दोघे माझे चांगले स्नेही आहेत याबद्दल मला खरोखर अभिमान वाटतो. अलीकडे नवीन शोध ह्मणून प्रसिद्धीस आलेल्या पुष्कळ गोष्टी शेकडों वर्षांपूर्वींच्या वैद्यक ग्रंथांत अगोदरच नमूद करून ठेवलेल्या होत्या या बद्दल पुरावा देऊन वैद्यशास्त्राविषयीं अनभिज्ञ असलेल्या श्रोत्यांस मी त्रास देऊं इच्छित नाहीं.

'उथळ ओढ्याला खळखळ फार' व त्याच्या बरोबर आपल्याहून श्रेष्ठ जनांविषयींचा मत्सर ही फार, या गोष्टी पाश्चात्य पद्धतीच्या डाक्तरांसंबंधानें तरी निदान खऱ्या आहेत असें यावरून ह्मणतां येतें.

## इंदूर संस्थान आणि ग्रंथोत्तेजन.

बडोद्याच्या खालोखाल मराठी साहित्यास उत्तेजन देण्यांत इंदूर कीर्ति संपादील असा रंग दिसतो. तेथें महाराष्ट्र साहित्य सभेचें काम सुरळीत चाललें आहे. रा. लक्ष्मणराव पांगारकर 'मुमुक्षु' कर्ते हे नुकतेच आपल्या 'तुकाराम चरित्रा'च्या प्रकाशनार्थ राजाश्रय शोधण्यासाठीं तेथें गेले होते व श्रीसंतांच्या कृपेनें त्यांची व श्री. होळकर सरकार यांची भेट होऊन श्रीमंतांनीं रा. पांगारकर यांस २००० रु. इनाम दिलें आहे असें आह्मांस एका मित्राच्या खाजगी पत्रावरून नक्की कळतें. तसेंच श्री. महाराजांनीं मराठी ग्रंथोत्तेजनासाठीं नेमलेल्या कमिटीनें दोन नवीं पुस्तकें रचण्यासाठीं ३०० रु. व २०० रु. ची दोन बक्षिसें लाविलीं आहेत. पहिलें बक्षीस इंदूर संस्थानांतील सांपत्तिक द्रव्यें, व त्यांचा उद्योगधंद्यांत कसा फायदेशीर रीतीनें उपयोग करून घेतां येईल या विषयावर ३०० पृष्ठांचें पुस्तक लिहिण्यासाठीं व दुसरें बक्षीस 'इंदूर संस्थानासंबंधानें इंग्रजींत प्रसिद्ध झालेल्या ग्याझिटिअर मधली माहिती संक्षेपानें व आजतारखेपर्यंत २०० पृष्ठांत लिहिण्याबद्दल आहे. दोन्ही ग्रंथांस जुलै १९१६ अखेर मुदत ठेविली आहे.

## नवीन सैन्यें.

आज पर्यंत लढायांबद्दल नुसत्या तार्किक कल्पना होत्या. त्यांचा कठोरतर अनुभव घेणें अवशिष्ट होतें. आरमार जय्यत असावें आणि नेहमीं तयार असावें असें सर्व लोक ह्मणत असत. परंतु जय्यत आणि सज्ज या दोन शब्दांचा किती व्यापक अर्थ आहे या बद्दल कोणत्याही दोन मतांत एकवाक्यता होत नसे. आपलीं विचारें लोकांपुढें मांडताना त्यांच्या डोळ्यांपुढें नेहमीं एक दुर्बळ आरमार उभें असे. हें आरमार लढाई देण्यास कचरणारें आहे अशी समज धरून त्यांस कसें जिंकावें या कल्पनेवर सर्व विधानें केलेलीं असत. अर्थात असें दुर्बळ आरमार एका दुर्गम ठिकाणीं बसून दुसऱ्या पक्षास भेवडावीत आहे आणि तो आपल्या आरमार व्यवस्थेंत जरा चुकेल तर या कमताकतीच्या शत्रूस किती फायदा मिळेल हें तर्क करणारे लोक लक्षांत आणून आपले तर्क चालवीत असत.

परंतु आरमार कसे असावें किंवा लष्कर कसें असावें याची कल्पना सालोनिकामध्यें पूर्ण प्रत्ययास आली आहे. बाल्कन प्रांतांतील सैन्यांपेक्षां सालोनिकामध्यें प्रतीसंख्येच्या मानानें सैन्य कमी आहे. सालोनिकामधील सैन्यास मदत न मिळेल तर तें एकटें आपल्या जिवावर प्रगमनशील हल्ले करण्याच्या लायख नाहीं. तरी परिस्थिती अनुकूळ झाल्यास त्या सैन्याची संख्या आणि तयारी हा अशीं आहेत कीं तें वाटेल तेव्हां प्रतिपक्षावर चाल करूं शकेल. ह्मणून सालोनिका मधील सैन्यास देखील सज्ज सैन्य असेंच ह्मणावें लागेल. हें सैन्य टयुटॉनिक राष्ट्रांना सर्व बाजूनीं शल्यवत झालेलें आहे. सर्वियाचा पुरा नाश या सैन्यामुळेंच वाचला. बल्गेरियाला दक्षिण मासिडोनियामुळें सुरक्षीतपणा आहेच; तरी त्याची धांदल झाली असती. शेतकीच्या कामगिऱ्या समीप आल्यामुळें तात्पुरते शेतकी सैनिक शेतीवर जाण्याकरितां आतूर झालेले आहेत. रोमेनियाला पूर्णपणें अवगत आहे कीं जर या वेळीं आपणास तटस्थवृत्ती टाकण्यास टयुटॉनिक राष्ट्रें भाग पाडतील तर सालोनिका मधील २॥-३ लाखांचें सैन्य आपल्या मदतीस येऊं शकेल. अद्याप मिळावी तितकी माहीती मिळालेली नाहीं. तरी ग्रीसनें सर्वियाला अतीशय आणीबाणीचे प्रसंगीं मदत केली इतकें खास दिसतें. या परिस्थितीवरून जय्यत आणि सज्ज सैन्य ह्मणजे काय याचें एक ठोकळ उदाहरण ह्मणजे हल्लींचें मित्रराष्ट्रांचें सालोनिका मधील सैन्य. अशा सैन्यास आपली कुवत वाढविण्यास संधी मिळत असते आणि प्रत्यही भोंवतालच्या सैन्यांच्या तयारींत संदिग्ध अवस्थेंत राहण्याच्या आणीबाणीच्या प्रसंगामुळें नेहमीं युद्धाकडे तोंड देऊन राहावें लागतें.

अशा प्रकारचें नवें सैन्य उभारण्याकडे सरकारची विशेष खटपट आहे. परंतु सरकार हिंदुस्थानवासी प्रजेवर जितका विश्वास ठेवावा तितका विश्वास ठेवीत नाहीं असें ही दिसतें. स्वयंस्फूर्तीनें आणि उत्साहानें सैन्यांत जाणें निराळें व जीवनकलहांत आपल्यांत पात्रता आहे किंवा नाहीं हें न पाहतां उदरंभरणार्थ जाणें निराळें. या वेळीं आपल्या लोकांनीं सैन्यांत सामील व्हावें असें कोण ह्मणणार नाहीं; परंतु ज्या प्रेमानें व ज्या उत्साहानें सदाशिवराव भाऊ साहेबांबरोबर आपले लोक युद्ध पराजयोन्मुखी झाले तरी निकरानें लढले, तशा प्रकारचे प्रेम आणि तशा प्रकारचा विश्वास आपल्या लोकांत उत्पन्न होऊन त्यांनीं आपणांस लष्करास भरती करून घ्यावें. तसें झाल्यास उदार कल्पनांचे, थोर मनाचे, सुसंस्कृत बुद्धीचे लोक लष्करांत राहून एक जय्यत आणि सज्ज सैन्य जमा केल्याचें श्रेय सरकारास मिळेल आणि देशास ही त्याबद्दल भूषण वाटेल. सेनानायकांबद्दल र विश्वास हवाच पण त्या बरोबरच राज्यकर्त्यांबद्दल ही प्रेम, आदर व भक्ती उत्पन्न असून तीं स्पर्तेत तशीं आहेत असें राज्यकर्त्यांनाही वाटलें पाहिजे.

## धान्याची महर्घता.

गेल्या आठवड्यांत संयुक्त प्रांताच्या कायदेकौंसिलच्या बैठकीच्या वेळीं भाषण करतांना गव्हरनर साहेब सर जेम्स मेस्टन यांनीं विशेष जोरानें सांगितलें कीं लढाईमुळें इतर सर्व जिनसा महाग झाल्या आहेत तरी धान्याच्या किंमतीवर लढाईचा परिणाम विशेष झाला नाहीं. यांत संशय नाहीं कीं धान्य लढाईमुळें जवळ जवळ दीडपट महाग आहे, परंतु सर जेम्स मेस्टन साहेब ही गोष्ट विसरले कीं हिंदुस्थानांतून उत्पन्न होणारा निर्यात माल ह्मणजे फक्त जमिनींतून उत्पन्न होणारीं पिकें. हीं पिकें प्रथमतः ज्या देशांत तीं उत्पन्न होतात त्या देशाच्या मागणी इतकी असून नंतर तीं बाह्य देशास पाठविलीं जातात. आयात मालाच्या किंमती तरी निर्यात माल देऊन भराव्या लागतात. दोनतीन वर्षें निर्यात माल उत्पन्नच झाला नाहीं तर आयात माल देशांत जमा असलेल्या भांडवलानें विकत घ्यावा लागेल. उपयुक्त वस्तु कितीही क्षुल्लक असोत त्या उपयुक्त ह्मणूनच जवळ जवळ अवश्य क्रेय झाल्या आहेत. टांचण्या, सुया, कागद, शिवण्याचा दोरा, कापड, इत्यादि वस्तु जरूरीच्या असून त्या घेतल्यावांचून लोकांचा निर्वाह लागणार नाहीं. कागद पिकें उत्पन्न करणारांस घ्यावा लागत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. स्थूल मानानें पिकें उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्यांस जे जिन्नस घ्यावे लागतात, त्या जरूरीच्या किंमतीच्या मानानें धान्याची किंमत वाढली आहे. दरवर्षी हिंदुस्थानास जितकें धान्य उत्पन्न करावें लागतें तितकेंच धान्य यंदाही करावें लागलें. हिंदुस्थानाबरोबर धान्याचा व्यापार करणारे पूर्वींचेच लोक यंदाही होते. उलट गेल्यावर्षी कापूस खरीदी करणारे नव्हते ह्मणून जितक्या कापसाची जरूर या देशास होती त्या पेक्षां अधिक माल झाल्यामुळें कापसाची खरेदी झाली नाहीं. मागणीपेक्षां पुरवठा वाढला व कापसाची किंमत उतरली. यंदाही जपानची मागणी नसती तर गेल्या वर्षीचाच अनुभव आला असता. जितक्या लोकांच्या मागणीसाठीं हिंदुस्थानास धान्य उत्पन्न करावें लागतें तितक्याच लोकांस यंदाही धान्याचा पुरवठा करावयाचा होता. ते लोक आपले घरीं बसून उत्पादक धंदे चालवीत असोत अगर लढाईवर जाऊन स्वदेशस्वातंत्र्याची प्रगति करीत असोत अगर त्याचें रक्षण करीत असोत. प्रश्न इतकाच कीं दरसाल पेक्षां यंदा मागणी वाढली होती कीं काय व मागणी वाढली असेल तर तिच्या मानानें पुरवठा कमी होता कीं काय. दोन्ही ही गोष्टी नव्हत्या व सर्व परिस्थिती पूर्वींप्रमाणेंच कायम होती. परंतु इतर जरूरीच्या जिनसांच्या किंमती वाढल्या. आणि त्या ज्या सरासरी मानानें वाढल्या मानानें धान्याच्या ही किंमती वाढल्या यावेळीं लोकांस आयात मालाच्या स्वस्तपणामुळें जे धंदे काढणें येथील लोकांस परवडत नव्हतें असें कांहीं धंदे सहज काढतां आले असते. संरक्षक पद्धतीनें जो कृत्रीम लाभ सरकारपासून मिळावा अशी नूतन धंद्यांना अपेक्षा असते तो लाभ आपोआपच मिळाला होता. लढाई आजच बंद झाली तरी बाह्य देशांच्या कारखान्यास कुशल मजूर मिळून पूर्वींप्रमाणें मागणीच्या बरोबरीचा माल उत्पन्न होऊं लागण्यास ५।६ वर्षें तरी लागतील. ह्मणजे ५।६ वर्षें या देशास अन्योन्य चढाओढी बरोबर झगडावें लागणार नाहीं. अशा वेळीं भिरेजच्या पोलादी कामाच्या कारखान्यास किंवा दुसऱ्या बाल्यावस्थेंतील कारखान्यास हवें तितकें वाढवितां येण्यासारखें आहे. नवे कारखाने काढतां येण्यासारखे आहेत. आजवर मुख्य भीति ही होती कीं आपल्याच देशांत चढाओढीमुळें आयात मालाच्या किंमतीपेक्षां किंवा त्या मालाच्या किंमती बरोबर आपणास येथेंच उत्पन्न केलेला माल विकणें परवडणार नाहीं. ती धास्ती अंशतः ४-५ वर्षें तरी कमी झालेली आहे. देशास पुरवता येईल, इतक्या प्रमाणावर माल या देशांत उत्पन्न होऊं लागेल तर बाईटांतून चांगलें निघालें असें होईल. उदाहरणार्थ कापडच घ्या. सर्व देशास पुरवता येईल, इतकें कापड उत्पन्न करण्यास हल्लीं मोठी सोईवार वेळ आली आहे. या वेळेचा फायदा घेऊन देशाचा उद्योगधंदा नियमीत आणि व्यवस्थित करून घेतला नाहीं तर आपण सांपत्तिक दृष्ट्या बहुमोलाची संधी घालवून आजवर प्रमाणें परावलंबीच राहूं. आणि हल्लीं प्रमाणेंच एखादी अडचण दुर्दैवानें उत्पन्न झाल्यास अधीक किंमतीनें अवश्य

लागणाऱ्या वस्तु विकत घ्याव्या लागून वाढत्या लोकसंख्येस शेतावर मजुरी करण्याशिवाय दुसरें साधन आपण संपादन करून घेणार नाहीं.

## संमेलन.

### (टाऊन ए. व्ही. स्कूलच्या विद्यार्थ्यांचा उत्सर्जन समारंभ)

येथील शहर आंग्लो व्हरनॅक्युलर शाळेंतील विद्यार्थ्यांनीं आज ३ वर्षें असा उपक्रम ठेविला आहे कीं वार्षीक परीक्षा संपल्यानंतर उन्हाळ्याची सुट्टी होण्यापूर्वी जे १०।१५ दिवस विश्रांतीचे असतात, त्या दिवसामध्यें कर्मणुर्कवजा हस्तकौशल्याच्या कामाचें एक प्रदर्शन भरवावें आणि एक दिवस सर्व विद्यार्थ्यांनीं मिळून हसण्यांत, नानाविध खेळ खेळण्यांत, उड्या मारण्यांत, सभा भरविण्यांत व्याख्यानें देण्यांत इत्यादि बहुविध मनोरंजनाच्या व उत्साहशाली गोष्टी करण्यांत घालवावा. असें हें विद्यार्थ्यांचें संमेलन व त्यांच्या हस्तकौशल्याचें प्रदर्शन हीं दोन्हीं शिक्षक समुदायाच्या प्रत्यक्ष प्रवर्तनानें व प्रोत्साहनानें होत असतात; इतकेंच नाहीं तर गांवांतील विद्याभिरुचीचे शिष्ट संभावित लोक ही या सर्व उद्योगाचे कौतुक करण्याला व मुलांच्या मनाला चांगली दिशा लावण्यासाठीं मुद्दाम जमत असतात आणि त्या वेळीं यथाधिकार विद्यार्थ्यांस उपदेशही करण्यांत येतो. असा हा विद्यार्थ्यांचा उत्सर्जन समारंभ गेल्या गुरुवारीं झाला. आणि त्याचे सुयश त्या शाळेचे मुख्य अध्यापक रा. रा. तात्या साहेब पांडे व त्यांचा संयुक्त शिक्षकवर्ग यांच्याकडे आहे त्या दिवशीचें प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या वयोमानानें पाहतां खरोखर त्यांस शाबासकी देण्यासारखेंच सुंदर होतें. तसेंच विद्यार्थ्यांनीं चित्रसेन गंधर्वाबरोबर जें द्वैत वनांत कौरवांचें युद्ध झालें त्या वेळचें स्फूर्तिदायक शौर्याचें व उदार मनस्वीपणाचे कौरव पांडवांतील संवाद इतक्या मार्मिकपणानें व जोमदारीनें म्हणून दाखविले कीं त्यांच्या अभिनंदनार्थ वाजणाऱ्या टाळ्या केव्हां पुरे कराव्यात हेंच समजेना. त्या दिवशीं आमचे लोकमान्य रा. रा. काशीनाथ श्रीराम बजार हे मोठ्या आनंदानें हजर होते आणि अध्यक्षाच्या नात्यानें त्यांनीं विद्यार्थ्यांस फार गोड सुबक उपदेश केला आहे. त्याचें टीपण इतर विद्यार्थ्यांस ही आवडेल असें आहे. ते म्हणाले कीं:—

"टाउन ए० व्ही० स्कूलचे विद्यार्थी, शिक्षकवर्ग, कमिटी मेंबर, व सभ्यगृहस्थहो, आजच्या समारंभास तुम्ही मला आमंत्रण करून अध्यक्ष निवडल्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. ज्या ठिकाणीं लहान मुलें एकत्र जमून खेळ खेळतात, व एकमेकाशीं प्रेमानें वागतात, त्या ठिकाणीं जाऊन त्यांचे खेळ व प्रेम पाहून ज्यांना मौज वाटणार नाहीं अशी मंडळी फार थोडी. त्यांत तुम्ही आज सुंदर अशा वस्तूंचें, लहान प्रमाणावर कां होईना, परंतु रमणीय असें जें प्रदर्शन मांडलें आहे. तें पाहून येथें आलेल्या सर्व मोठ्या मंडळीस फार कौतुक वाटलें असेल अशी माझी खात्री आहे. मला स्वतः तर हें सर्व पाहून विशेष आनंद व अभिमान वाटत आहे ह्याचें मुख्य कारण ह्याच शाळेच्या जुन्या विद्यार्थ्यांपैकीं मी एक आहे. ह्या प्रसंगीं लहानपणाच्या आठवणी होऊन जो कांहीं फरक झाला आहे त्याबद्दल विचार सुचणें साहजिक आहे. आपल्यामध्यें जुने तें चांगलें व आपली स्थिती दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे अशी एक समजूत आहे. माझा स्वतःचा अनुभव निदान ह्या बाबतींत तरी अगदीं निराळा आहे. आमच्या वेळेस ही शाळा लोखंडी पुलाजवळ जी जुनी इमारत अजून उभी आहे त्यांत भरत असे. त्या इमारतीपेक्षां ही तुमची इमारत उजेडाच्या व हवेच्या मानानें किती तरी श्रेयस्कर आहे. तुम्हाला खेळ खेळण्याला मोठें विस्तीर्ण पटांगण आहे. जवळच मोर्णा नदीचें अडविलेलें पाणी असल्यामुळें पोहण्याची उत्तम सोय आहे. व त्याचा तुम्ही चांगला उपयोग करून घेत आहां हें पाहून मला फार आनंद वाटतो. नुसत्या इमारती व इतर सोयींतच फरक झाला आहे असें नाहीं; परंतु इतर बाबतींत म्हणजे लोकांच्या कल्पनेंत सुद्धां फरक दिसून येतो. तुमच्या प्रदर्शनाचीच गोष्ट घ्या. आमचे वेळेस एकादा मुलगा कातरीनें कागद कातरीत असतांना किंवा धांड्याची गाडी करीत असतांना पाहिलें असतें तर 'उगीच व्यर्थ वेळ कां घालवितोस' असा प्रश्न शिक्षकानें किंवा वडील माणसानें केला असता. तुम्ही ज्या सुंदर वस्तू आपला अभ्यास सांभाळून केल्या आहेत त्या एके ठिकाणीं ठेवून गांवांतील प्रमुख मंडळींना बोलावून तुमच्या शिक्षकांनीं तुमचें कौतुक केलें आहे. तशीच खेळाची गोष्ट घ्या. आमचे वेळेस आधीं कांहीं सोयच नव्हती; शाळेचे कंपाउंड फार लहान असे; असे खेळ आम्हांस रस्त्यावरच खेळावे लागत असत. आम्हाला तेथें खेळतांनां पाहून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून आमची गणना टेनाड व दांडग्या मुलांत होत असे यांत नवल नाहीं. आता ती स्थिती बदलून तुमचा खेळ खेळण्याबद्दल किती तरी गौरव होत आहे. एकंदर मुलांच्या खेळाबद्दल विद्वान मंडळींचा ग्रह अगदींच बदलून गेला आहे. चार मंडळी जमून एकादें मोठें कार्य करणें, एकमेकांवर विश्वास ठेवणें, एकमेकाशीं प्रामाणीकपणानें वागणें, इत्यादि कांहीं अमूल्य गुण खेळ खेळतांना जसे कमावतां येतात तसे इतर वेळेस कमावतां येणें कठीण आहे अशी सर्वसाधारण समजूत झाली आहे तुम्ही आज दुपारीं इन् डोअर गेम्स (Indoor games) खेळलां असें पुढें ठेविलेल्या कार्यक्रमाच्या कागदावरून दिसतें. पत्ते खेळत असतांना जो मुलगा दुसऱ्याचीं पानें पाहतो, किंवा पान चोरण्याची खटपट करितो तोच मुलगा मोठा होऊन कॉलेजांत गेल्यावर टेनिस कोर्टांत उलट पक्षाचा चेंडू जरी रेषेच्या आंत पडला तरी तो बाहेर आहे असें म्हणणें त्याला कठीण वाटत नाहीं. अप्रामाणिकपणें वागण्याची संवयच होऊन जाते. मोठमोठ्या परिक्षा जरी पास झाला तरी त्यांचें सर्व ज्ञान पुस्तकांतच राहून पुढील आयुष्यक्रम चालविण्यास तो मुलगा अयोग्य असा ठरला जातो. अशीं उदाहरणें वारंवार पाहण्यांत येतात. आपल्या मंडळीवर म्हणजे हिंदु धर्मांतील श्रेष्ठ जातीवर असा एक आक्षेप आहे कीं चारजणे जमून व्यापार करण्यास, पेढ्या गिरण्या वगैरे चालविण्यास अगदीं असमर्थ आहेंत. हा आरोप अगदींच अयथार्थ आहे असें म्हणतां येत नाहीं. ह्याच शहरांतील कांहीं मंडळ्या, पेढ्या व गिरण्यांच्या स्थितीचा विचार केल्यास ही गोष्ट कबूल करावी लागेल. वर सांगितलेले गुण संपादण्याची व अवगुण दूर करण्याची तुमच्या शिक्षकांवर मोठी जबाबदारी आहे. व ती बजावण्याबद्दल तुमची मास्तर मंडळी योग्य ती खटपट करितात हें पाहून समाधान वाटतें. 'खटाव माकनजी' च्या गिरणींत आग लागलेल्यावेळीं ह्या शाळेच्या मुलांनीं केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल मिळालेलें सर्टिफिकेट सर्व मंडळींना दाखविण्यास तुमच्या शिक्षक वर्गाला न्यता वाटत आहे हें ह्याचेंच द्योतक आहे. ह्या संमेलन चे वेळीं मुलांना उपदेश करण्याची वहिवाट आहे, म्हणून मी हे दोन शद्ब सांगितले; परंतु आतां उशीर झाला आहे; तुम्हास योग्य तो उपदेश वेळोवेळीं मिळत आहे. म्हणून जास्त सांगण्याची जरूर नाहीं; तरी एक गोष्ट मला येथें सांगितली पाहिजे. ह्या संमेलनाचा एक उद्देश तुमच्या शाळेंतील मुलांमध्यें एकमेकांबद्दल प्रेम वाढविणें हा आहे. परंतु त्याचा अर्थ इतर शाळेंतील मुलांबद्दल तुम्ही द्वेष धरावा असा मात्र नाहीं. तुम्ही जसेजसे मोठे व्हाल तसतशीं तुमची निरनिराळ्या मंडळींशीं गांठ पडेल. दुसऱ्यांत जे चांगले गुण आहेत त्यांत चढाओढ करणें हें निराळें; परंतु त्यांच्याशीं स्पर्धा करून द्वेष वढविणें हें मात्र फार घातक आहे. ज्या ठिकाणीं मंडळी जमतात तेथें एका पक्षांनीं दुसऱ्याचा द्वेष करणें ह्या पासून सध्या फार नुकसान होत आहे ही गोष्ट मोठ्या शहरच्या म्युनिसिपाल्टी पासून तें अगदीं लहान खेड्यातील चावडीपर्यंत कोठेंहीं गेलें असतां ध्यानांत येण्यासारखी आहे. अशा प्रकारचे अवगुण टाकून देऊन चांगले गुण मिळविल्यास तुम्हांस तुमचें आयुष्य खास सुखानें घालवितां येईल असें सांगून मी आपली रजा घेतों."

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—या प्रांताचा प्रसिद्ध उन्हाळा उत्तरोत्तर आपलें उग्ररूप धारण करूं लागला आहे. हल्लीं उष्ण कालाच्या आजारामध्यें पटकीच्या रोगानें येथें मोठीच भर घातली आहे. कधीं कधीं पंधरा पंधरा सोळा सोळा लोक आजारी होतात. या संबंधांत पिण्याच्या पाण्याविषयीं सरकारी योजना चांगल्या उत्कृष्टपणें अंमलांत येऊं लागल्या आहेत.

रा. रा. शापुरजी मंचरजी सेटना प्रॉसिक्युटिंग इन्स्पेक्टर आकोला यांनीं १ वर्षाची फर्लो घेतली आहे. यांच्यासारख्या कार्यदक्ष, उत्साही, निस्पृह अधिकाऱ्यास डिपुटी सुपरिंटेंडन्टच्या जागेचा बहुमान मिळेल तर पुष्कळांस आनंद वाटेल.

खामगांवचे राजश्री बोन असि. कमिशनर यांस ७ महिन्याची रजा देण्यांत आली असून रा. रा. एन. जे. राऊटन यांस बुलडाण्याहून खामगांवस सब डिव्हीजन नेमण्यांत आलें.

रा. रा. दत्तात्रय रामचंद्र डोंगरे सुपरिंटेन्डेंट हक्क नोंदणी वऱ्हाड यांस इकडेस ए. असि. कमिशनर वर्ग ८ ची कायमची जागा देण्यांत आली हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. सिबास्टियन रजिस्ट्रेशनचे इन्स्पेक्टर पूर्व वऱ्हाड यांस २ वर्षांची रजा देण्यांत आली असून त्यांच्या जागी रा. रा. एकनाथ नारायण तारे सब रजिस्ट्रर आकोला यांस बढती मिळाली ही संतोषाची गोष्ट होय.

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा. न. वि. वि. खालील हकीकत—आपले पत्रांत प्रसिद्ध करण्याची मेहरबानी करावी.

गुरुवार ता. ३०-३ १९१६ रोजीं नेटीव्ह जनरल लायब्ररीचे दिवाणखान्यांत आकोलेकरांची जाहीर सभा रा. रा. नानासाहेब दाते वकील यांचे अध्यक्षतेखालीं भरून पैसाफंडाची गांवसभा स्थापन करण्यांत व खालील प्रमाणें तिचे कार्यकारी मंडळ निवडण्यांत आले.

**अध्यक्ष व खजीनदार**

रा. रा. नारायण काशीनाथ दाते, वकील

**चिटणीस**

रा. रा. बाळकृष्ण हरी काणे, वकील

**सभासद**

रावसाहेब रामचंद्र विष्णु महाजनी, वकील
रा. रा. वासुदेव लक्ष्मण चिपळूणकर, वकील
रा. रा. विष्णु दामोदर भट, वकील
रा. रा. गोपाळ कृष्ण चितळे
शेट रामधन जमनादास

सभेच्या विद्यमानें सोमवार ता० ३-४-१६ इ. रोजीं फंड गोळा करण्याचे ठरलें.

२ येथील नेटीव्ह जनरल लायब्ररीचे पटांगणांत ता० १-४-१६ रोजीं श्रीयुत अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे व ता० २-४-१६ रोजीं श्रीयुत माधव श्रीहरी अणे, वकील यांचे सभेच्या विद्यमानें पैसा फंड या विषयावर व्याख्यान झालें. पुण्याचे श्रीयुत कृ. प्र. खाडीलकर हे दुसऱ्या कांहीं कामासाठीं येथें आले होते व ते पहिल्या दिवशीं व्याख्यानाला हजर होते. व्याख्यानास आलेल्या कांहीं मंडळींचे विनंतीवरून त्यांनीं ही त्याच विषयावर थोडावेळ भाषण केलें. वरील दोन्ही दिवशीं श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं अध्यक्षस्थान सुशोभीत केलें होतें. व दुसरे दिवशीं समारोपादाखल त्यांचे भाषण झालें.

३ पाडव्याचे दिवशीं स्वयंसेवकांमार्फत फंड गोळा करण्यांत आला. शहर, ताजनापेठ व जठारपेठ मिळून एकंदर २७ विभाग पाडण्यांत आले होते. व एकंदर ३६ गृहस्थांनीं फंड गोळा करण्याचे काम पत केलें होते. सरासरी ८०० लोकांनीं फंड दिला, त्यांत मोठे आकडे ५०,१०,५,२ व १ रुपयांचे असून एक रुपया पासून एक आण्यापर्यंत रकमा देणारांची संख्या जास्त आहे. कांहीं लोकांनीं त्या खालील रकमा दिल्या आहेत. फंडाची एकंदर रकम ३४३८=॥ गोळा झाली आहे. रा. रा० शिवराम पांडुरंग अभ्यंकर, वकील व रा. रा. त्रिंबक नारायण बापट, वकील हे प्रत्येकीं (पन्नास) रुपये देऊन फंडाचे तहहयात

सभासद झाले आहेत.

४ वरील रकमे पैकीं १७८– खर्च झाला असून रुपये ३०० रा. नेने खजीनदार पैसाफंड याजकडे मुंबईला पाठविण्यांत आले आहेत. व बाकीचे २६८–॥ या आफिसांत ठेवण्यांत आले आहेत.

कळावें लोभ असावा हे विनंति.

अकोला ता. १२-४-१६ } आपला बाळकृष्ण हरी काणे
चिटणीस
पैसाफंड गांव
सभा

## नोटीस

नोटीस वेशामी रत्या वा। कृष्णा महार रा० कामठ किनखेड्याजवळचे ता० मुर्तिजापूर जि० उमरावती पो० मुर्तिजापूर

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्नास १०-१२ वर्षें झालीं तेव्हां मी मुकी होती व मला मुकी ह्मणून पत केलें. मला शहाणी होण्यास ४ वर्षे झालीं व माझ्या बापानी मला ५-७ वेळां घेउन गेला त्यावेळीं मला १ दिवस सुद्धा घरी न ठेवतां माझ्या बापाच्या मागें लावलें मी तुमच्याघरीं नांदण्यांत तयार आहे व तुह्मी मला वागवित नाहीं व गांवच्या पाटलानीं व इतर लोकांनीं पुष्कळवेळां वागविण्याबद्दल सांगितलें तरी तुह्मी ऐकत नाहीं. मला माझ्या बापाच्या घरीं राहून खाण्यापिण्यास व कपड्यालत्त्यास कर्ज काढणें भाग पडले तर या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, १५ दिवसाचे आंत माझ्यावर ४ वर्षांत झालेले कर्ज रकम रुपये १५० देऊन मला घेऊन जावे तसें न केल्यास मी तुमचेवर खर्चाच्या पैशाचा दावा आणीन व नोटीस हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा माझ्यावर कांहींच हक्क राहणार नाहीं. ता० ९-४-१६ इ.

द० झाडु शाहु सीरसाट रा० आकोला
सही,
कोंगसी मर्द रत्या महार रा० जमेकश्वर नि० हा० आं.

नो. नं. १४०

## नोटीस

रा. रा. रामभाऊ मारोती सोनटके माळी रा. देगांव पो. वाडेगांव

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आपण ऑफताबे महमदी प्रेस आकोला याजमार्फत ता. १८-१२-१५ रोजीं दिलेली नोटिस तीन आठवड्यापूर्वीच मिळाली. नोटिशींत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे. आह्मी आपणाकडे माझ्या बायकोस घेण्याकरितां बरेंच वेळां आलो असतां आपण पाठविली नाहीं. व नोटिशीनें खावटी मागतां हें काय? मी खावटीबद्दल बिल्कूल जबाबदार नाहीं. इतकेंच नाहींतर माझ्या पैकील दागिने तिच्या अंगावर आहेत. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते माझी बायको अंगावर असलेल्या सर्व दागिन्यासह ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आणून पोहचती करावी. असें न केल्यास कोर्ट मार्फत ताबा घ्यावा लागेल. व त्यास लागणारा खर्च या नोटिशीच्या खर्चासह भरुन घेतला जाईल. मी खावटीच्या खर्चाबद्दल जबाबदार नाहीं. ही नोटिस दिली ता. ३-४-१९१६

सही
किसन वा॥ भगवान माळी द. खुद रा देगांव पो. वाडेगांव

नो. नं. १४१


ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तूरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता [illegible] गर्मीसंबंधी सर्व विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—पानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्राची लाली, सकाच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० ११ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, यथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णें, जिल्हा रत्नागिरी. } कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०



## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* 4½ CRORES

### A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25.200 |
| 1894 | 20.110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77,552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2 47,18.8 |
| 1914 | 72,46,0 | 4.96,8650 |

### SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.
Forty years continuously increasing prosperity.
Ninety per cent of the entire Profits, after provining for the Reserve fund divided among the Policyholders every 3 years.
Native Lives are accepted at the same rates as Europeans
Loans granted to policyholders at reasonable rates.
Prompt Payment of Claims.

***Influential and active agents wanted Terms liberal***

:0 -

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-No. N 150

# व्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५० ] आकोला——सोमवार तारीख २४ माहे एप्रिल सन १९१६ ई० [ अंक १६

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खाली दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नमुन्यांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } S. Clements, एजंट

नं १

### अस्सल अंगुरी.

## हिंग

केवळ एक आणा तो. पवित्र केशर १॥ तो. शुद्ध शिलाजीत. ·॥· तो. खालिस कस्तूरी रु. २५ तो. तिबेटी ममीरा रु. ३ तो.

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं. ५
नो० नं० २

### हिंदुस्थानावर अरिष्ट

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळया हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळया**

हें औषध घेतल्यानें मानवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. १ विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं काहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनखी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

DR. H. L. Batliwala. Sons & Co Ltd
N. N. 3 Dadar Bombay.

## चांदीचीं भांडीं

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व बाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवू. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

हिंदुस्थानांत मराठी भाषेंत असें हें पहिलेंच. स्वस्त आणि उपयुक्त मासिक पुस्तक.

सुरू झालें. वा. व. ८५ ] **पूर्णानंद** [ सुरू झालें. ट. ख ८३

लहान मोठ्या सर्व स्त्री पुरुषांच्या चित्ताचें सारखेंच आकर्षण करणारें व अनेक विषयांचा उहापोह करणारें **अगदीं नवीन तऱ्हेचें अत्यंत मनोरंजक पूर्णानंद** मासिक पुस्तक फेब्रुवारी महिन्यापासून सुरू झालें. यांत चटकदार गोष्टी, हास्यकारक चुटके कविता, कादंबऱ्या वगैरे मनोरंजक लेख येत. शिवाय प्रसिद्ध विद्वानांच्या लेखांचा व विविध ज्ञानाचा संग्रह यांत केला जात आहे. सारांश फक्त पांच आण्यांत वाचकाला जेवढा लाभ करून देणें शक्य तेवढा किंबहुना जास्त देण्याचा प्रयत्न केला आहे. लढाईमुळें चालू परिस्थिति सर्व बाजूंनीं बिकट व खर्चिक झाली आहे. तरी पण या मासिकाची वार्षिक वर्गणी फक्त ·।– ( व्ही. पी. पोष्टेजसह ॥= ) ठेविली आहे. नमुन्याचा अंक दीड आण्याची तिकिटें पाठवून मागवा.

बळवंत रामचंद्र मोहनी,
पूर्णानंद–कार्यालय,
खडेबाजार–बेळगांव.

नो. नं. १३२

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### विक्रीस तयार

आमचे छापखान्यांत दरखास्तीचे, वकील पत्राचे, परत भरयाचे, लिस्टफार्म पर्च्याचे व नकलेकरितां करावयाच्या अर्जाचे नमुने छापून तयार आहेत. ते आमचे छापखान्यांत कोणत्याही वेळीं विकत मिळतील.

व्हाडसमाचार कार्यालय, सदाशिवाश्रम, आकोला } मॅनेजर

## श्री दत्तात्रय अलंकारालय कोल्हापूर

आमचे कारखान्यांत स्वतःचे देखरेखेखालीं, मुद्दाम तयार केलेले उत्तम सोन्याचे सुबक दागिने— मंगळसुत्र माळ, ठुशा-गोठ, गुलाबाचीं फुलें, बिल्वदळी टीका, मुदा, अंग्रफुलें साखळ्या व बागन्याचीं वगैरे सर्व जातीचा माल—तसेच चांदीच्या मासोळ्या, चाळ, उपकर्णी, ताटें, वाट्या, गडवे, इत्यादि माफक दरानें मिळतील. आम्ही सर्व सोनें न्याशनलचें शंभर नंबरी वापरीत असतों. व डागाचा उपयोगही नियमितच केलेला असतो. यामुळें जिन्नस पांढरे पडण्याची अगर वाईट निघण्याची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. आमचे जिनसाची लाख काढून वजन तोलून पाहावें. गिऱ्हाइकाची खात्री करून देण्यास आम्ही तयार आहों. व्यापाऱ्यास कमिशन मिळेल. ऑर्डरी प्रमाणें माल तयार करून देऊं, चांदी सोन्याचे खरेपणाबद्दल आम्ही जबाबदार आहों. माल रोखीनें अगर व्ही. पी. नें पाठविला जातो. ऑर्डरी बरोबर एक रुपया अगाऊ पाठविला पाहिजे.

श्रीदत्तात्रय अलंकारालय–कोल्हापुर
नो नं ६

## कौतुकरत्नाकर

**छिन्नमस्तानी धुमावती; मातंगी भैरव षोडश देवतांचे चित्रांसह पृष्ठसंख्या ६००; विषय १०० वर आवृत्ती ५ वी. प्र. २००००,**

बंगाल्यांतील कामरूपदेशी ही विद्या फार प्रबल असून तिकडील जटेली. लंगोटि, छाछुं करणारे अज्ञानवादी यांचेकडून खरी माहिती मिळवुन सिद्धनागार्जुन मंत्र महोदधि, महानिर्वाणतंत्र उड्डीश वगैरे ग्रंथाचे आधारें हा भानुमती ग्रंथ तयार केला आहे. ह्याच धर्तीवर प्रसिद्ध झालेल्या इंद्रजाल, जादुगाई इतरसंग्रह, कौतुकचिंतामणी, किमिया, गुप्त गारुडी विद्या वगैरे पुस्तकांचा ह्याचेपुढें हिशेब नाहीं. यांत कोणते विषय आहेत याचा विस्तार कळविणें फार कठीण आहे. मंत्र तंत्र व यंत्र विधिपूर्वक करणें नियम प्रहादिकांचें वर्णनें भानुमती यंत्र वशिकरणशास्त्र नानाप्रकारचे स्तंभन प्रयोग, उच्चाटन, जारण, मारण प्रयोगविधि, औषधी हुन्नर, नानारंग कला, आत्मविद्यामेस्मेरिझम प्रयोगविधि वगैरे अनेक विषय आहेत. किं. ट. व्ही. पी. सह १॥ रुपया.

## कोकशास्त्र अथवा जीवनसौख्य.

ज्यांना खरोखरीच सौख्य भोगणें आहे त्या प्रत्येकांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें. या पुस्तकांत कोणते विषय आहेत हे पुस्तकाच्या नांवावरून सहज समजण्याजोगें असल्यामुळें त्याचें वर्णन करणें नको. किंमत १ रुपया ट. ख. ३ आणे.

पत्ताः— गंगाधर आर. आणि कंपनी.
हरिश्चंद्र बिल्डिंग मुंबई नं. ४

नो. नं. ७

# विद्यामंदिर वाकररोड नागपुर.

### येथें मिळणारीं पुस्तकें.

DR. SHRIDHAR V. KETKAR'S INDIAN ECONOMICS.
Re 1-8-0 per V. P. Re. 1-11-0.

Good opinions are passed by the TIMES ( London ) the EMPIRE ( Calcutta ) the MODERN REVIEW ( Calcutta ) the HINDUSTAN REVIEW ( Allahabad ) Strong condemnation by the PIONEER ( Allahabad ) Chapters I what is Indian Economics ( ii ) social conditions and Economics condition ( iii ) Indian Economics and Indian Pagcholoky. ( iv ) Political conditions and Economics condition, ( v ) Language Policy and Economics, ( vi ) Economic evolution and layers of cicilization ( vii ) Communal Economics and distributive Economics ( viii ) Future out look.

२ **संकीर्ण लेख**:—डा० केतकर यांचे किंमत १ रु. ४ आणे. व्ही. पीनें १ रु. ७ आणे. यात पुस्तकांत खालील लेख आलेले आहेत.

( १ ) जातिभेद आणि त्या संबंधाचें राष्ट्रीय धोरण
( २ ) या विषयावर झालेला वादविवाद
( ३ ) समाजाचें धर्म नियमन आणि तें करणारा वर्ग
( ४ ) धर्मनियमन आणि ब्राह्मणांची परंपरागत विद्या
( ५ ) समाजशास्त्र आणि धर्मशास्त्र यांचा परस्पर संबंध
( ६ ) विक्रीचें अर्थशास्त्र आणि यंत्रशास्त्र
( ७ ) नगर संवर्धन आणि नगर सौंदर्य
( ८ ) मध्यप्रांतीयास संदेश
( ९ ) प्रतिनिधीचीं कर्तव्यें
(१०) पोलिटिकल क्लब कसा करावा.

या पुस्तका संबंधानें २७ जुलै १९१५ च्या अंकांत केसरीकार ह्मणतातः—

"डा० केतकर हे खंदे लेखक असून महाराष्ट्रांत निघणारीं बहुतेक प्रसिद्ध वर्तमानपत्रें आणि मासिकें यांतून यांचे लेख प्रसिद्ध होत असल्यामुळें, ते महाराष्ट्रीय वाचकांच्या अत्यंत परिचयाचे झाले आहेत. इकडे तिकडे विखुरलेलीं रत्नें पहाण्यांत मौज नमून त्यांचा हार करून पहाण्यांतच जसा खरा आनंद आहे, त्याचप्रमाणें लेखकांच्या विचाराचा पूर्ण परिचय होऊन विचारांना चालन मिळण्यास नियत कालिकांतून निरनिराळ्या वेळीं प्रसिद्ध झालेल्या लेखांपेक्षां संकीर्ण रूपानें प्रसिद्ध झालेल्या लेखांचाच फार उपयोग होतो. जगांत विषय कांहीं नवीन नसतात, पण तेच विषय नवीन पद्धतीनें आणि त्यांत नवीन विचार सरणीची भर घालून लोकापुढें आले ह्मणजे समाजाच्या मनाची खळबळ उडवून देण्यास कारणीभूत होतात. डा० केतकर हे निर्भीड लेखक असून एखाद्या सन्मान्य गृहस्थावर अगर संस्थेवर तुटून पडतात हें खरें आहे, तथापि एखाद्या विषयावर जेव्हां ते आपलें मत देतात, तेव्हां प्रथम जरी त्यांचें तें मत लोकांना विलक्षण वाटलें तरी तें प्रमाणबद्ध रीतीनें मांडलेलें असल्यामुळें विचारांना जोराचें चालन मिळण्यास कारणीभूत होतें यांत शंका नाहीं.

३ **उत्तर अमेरिकेंतील वसंत काल** ' एक साकी वृत्तात्मक काव्य, गोविंद पौत्र कवीचें. "धाडशी मन मोकळेपणा हाच या काव्याचा मोहक काव्यगुण आहे ( महाराष्ट्र ) किंमत ४ आणे.

पत्रव्यवहार व्यवस्थापक विद्यामंदिर
वाकररोड या पत्त्यावर करावा.

नो. नं. ११८

## NOTICE

The Treasury officer is now prepared to issue and encash Universal Currency Notes and Home Notes ( Bombay Circle ) of other denominations for the public on demand as far as possible Endeavours will be made as far as possible in all trusactions to meet the requirements of the payee as to the form of currency in which he desires to take payment.

The above orders do not yet apply to the Treasuries at Nagpur, Akola and Amraoti where Government treasury work is done by branches of Presidency Banks. As soon as arrangements are completed with the Banks concerned, a further notice will be issued giving the date from which free encashment of currency notes at these centres will be available.

## जाहिर नोटीस

मेसर्स पेस्टमजी अँन्ड सन्स यांचेकडून सर्वत्र आकोलेवासी लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे दुकानीं आकोल्याहून आकोट वाशीम वगैरे इतर ठिकाणीं जाण्याकरितां सर्व प्रकारें अपटूडेट उत्तम सोयीची माकस्वेल मोटार गाडी खालील दरानें मिळूं शकेल.

आकोल्याहून वाशीम एक फेरी रु. ३०
" " येण्याजाण्याचे रु. ५१
आकोल्याहून आकोट एक फेरी २०
" " येण्याजाण्याचे रु ३०

इतर ठिकाणीं जाण्या करितां प्रत्येक मैलास एक वेळेस बारा आणे प्रमाणें सिंगल पडेल. परंतु येण्या जाण्या करितां केल्यास प्रत्येक मैलास आठ आणे प्रमाणें पडेल.

विशेष टीप— परत प्रवास करणें तो ज्या दिवशीं तेथें पोहचला असेल त्याच दिवशीं केला पाहिजे. परंतु मुक्काम करणें असेल तर प्रत्येक दिवशीं रु. १० प्रमाणें ज्यास्त भाडें पडेल.

नो. नं. १२७ मेसर्स पेस्टमजी अन्ड सन्स

## नोटीस

पुंडु वा। मल्हु पा. व मल्हु वा। कर्णाजी पाटील रा० सागर ता० बाळापुर

यांसः—

जानु वा। मारुती ठाकूर रा. सगर यांचेकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी सुमारें २ महिन्यापूर्वीं आमचे पासून रुपये १००० एक हजारचें भरण्याचें गहाणखत लिहून घेतलें परंतु त्या गहाणखताचे परण्याचे रुपये, तुह्मी आह्मांस गहाणखत झाल्यानंतर देण्याचें कबूल केल्यावरून व तुमचा आह्मांस त्यावेळीं विश्वास असल्यावरून आह्मी भरणा गावांत पावला असें कबूल केलें. परंतु तुह्मी आह्मास कबूल केल्याप्रमाणें भरणा दिला नाहीं तरी कळविण्यात येते कीं भरण्याचे पैसे तावडतोब आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. तसें न केल्यास तुमचे गहाणखत रद्द समजलें जाईल कळावें ता. १६-४-१६

सही
जानु वा। मारुती ठाकर
नि० आंगठा असे

नो. नं. १४२

## नोटीस

नोटीस बेशगी पांडु वा। इंद्रभान रा० आकोली जहागीर व रघुनाथ श्रीदोचंद ब्राह्मण रा० आकोट ता० आकोट

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे पक्षकार नामे श्रीकीसन जसकरण व चतुरभुज जसकरण मारवाडी रा० आकोली जहागीर ता० आकोट यांचे नांवाचे कागद मयत चिमणाजी सखाराम यांचे जवळ असलेले कोरेकागदावर सह्या केलेल्या आहेत असें कळल्यावरून सदर्हू कोरेकागद नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे कडे आणून द्यावेत. सबब ही नोटीस दिली कळावें तारीख १४-४-१९१६ इ.

दस्तुर वामन शिवराम सराफ
राहणार आकोला
सही
A. G. Nargundker
Pleader

नो. नं. १४३

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकांस जाहिर नोटीस देण्यांत येते कीं मयत विठू वा। लक्ष्मण भामटी हा मरण पावल्यास सरासरी आठ महिने झाले. त्याचे पुष्कळ लोकाजवळून घेणें आहे. त्या सर्व लोकांस कळावें कीं मयत विठू वा। लक्ष्मण याचे जे पुर्वीवरून व इतर देणें असलेले त्यांनीं खालीं सही करणार यांस देऊन पावती घ्यावी. खालीं सही करणार हे मयताचे वारस आहेत. मयताची बायको सारजी मर्द विठू ही त्याच्या घेण्यासंबंधानें पुष्कळ अफरातफर करीत आहे.

सही
नथु वा। मारुती भामटी राहणार
विवर द. खुद

विवर द खु.
नंदु वा। विठोबा भामटी राहणार
विवर नि. खद

नो. नं. १४४

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वा॥ ७ शके १८३८

## अकोला आणि कॉलरा

या आणि आठवड्यांत या शहराच्या वस्तीच्या मानानें कॉलऱ्याची साथ बरीच वाढत चालली आहे. शहराच्या आरोग्याचा बोजा अधिक प्रमाणानें म्युनिसिपालिटीवर असून अंशतः व्यक्तींवर आहे. ज्या व्यक्तीस आपल्या मगदुरापेक्षां अधिक बोजा आपल्या शिरावर घेणें असेल अशांनीं म्युनिसिपालिटींत निवडून येण्याचा प्रयत्न करूं नये. ज्यानें त्यानें आपल्यानें जितकें काम करवेल तितकेंच काम आपल्याकडे घ्यावें हा राजनीतींतील आणि त्याचप्रमाणें समाजनीतीतील अबाधित नियम आहे. बरेच लोकांचा हा नियम न पाळल्यानें चूक होते. स्थानिक स्वराज्याचे हक्क या देशास ३० वर्षांपूर्वी मिळून ही सार्वजनीक आरोग्याकडे बरेंच लक्ष पुरवितील असे देखील सभासद न मिळणें ह्मणजे अत्यंजन सहानुभूति अभावाचें किंवा कोणत्या नियमीत धोरणावर आपण काम करावें याच्या अज्ञानाचें निदर्शक आहे. कमिट्यांत विद्वान अगर उत्साही सभासद नाहींत असें क्वचितच ठिकाणीं आढळून येईल व त्याच प्रमाणें येथील ही कामिटींत लायख सभासद आहेत. कमिटींत गेल्यानें आपली योग्यता वाढेल व आपणास मोठमोठाल्या अधिकाऱ्यांबरोबर हस्तांदोलन करण्यास सांपडेल या भावनेनें या शहरांत कमिटींत निवडून येण्याकरितां खटपट करणारे सभासद फार कमी आहेत. असें असून या शहराकडे प्लेग प्रतिबंधासाठीं व्हावा तितका नेटाचा प्रयत्न झाला नाहीं; किंवा थोडी झीज सोसून लोकांस घरें साफ करण्यास मदत दिली नाहीं. परंतु गतगोष्टींनें जो इशारा घ्यावा तो इशाराही घेतला नाहीं. रात्रीं दिवे अंधुक असतात, रस्ते बरोबर झाडले जात नाहींत, घरीं पायखाने साफ करण्यास मेहतरास बोलाविलें असून त्यास अल्पवेतन देऊं केलें असतांही ते येत नाहींत, लहान लहान गल्ल्यामधून या काठाहून त्या काठावर नेणाऱ्या मोऱ्या साफ केल्या जात नाहींत. गटारांतून सफाई होत नाहीं. मग कॅरबॉलिक असीड पावडर अगर फेनेल टाकणें तर दूरच; फारकाय परंतु ज्यांना आपलीं घरें व पायखाने साफ ठेविले नसतील अशांस ताकिदी देखील दिल्या जात नाहींत. कमिटीचें आरोग्य रक्षणाकडे इतकें दुर्लक्ष अस-

त्यामुळें केवळ दूषित जलपनामुळें आणि अस्वच्छ हवेनें उत्पन्न होणारे आजार इतक्या कमी प्रमाणानें या शहरांत उद्भवतात या बद्दलच लोकांस ईश्वराच्या तारक योजनेबद्दल आश्चर्य वाटलें पाहिजे. यांत कमिटीस कसलेंही श्रेय नाहीं. शिवाय असल्या आकस्मिक अडचणींच्या वेळीं थोडा अधीक खर्च लागल्यास कमिटीनें त्या खर्चाकडे मागें पुढें पाहणें बरें होणार नाहीं. अशावेळीं कमिटीनें पुढील गोष्टी जरूर केल्या पाहिजेत.

१ लोकांच्या घरच्या पायखान्यांतील घाण व सांचलेलें पाणी बरोबर भंगी वेऊन साफ आहे किंवा नाहीं याची तपासणी करावी. हल्लीं लोकांस चपराशीच सापडत नाहीं व सापडल्यास त्यापासून मदत मिळत नाहीं अशी लोकांची तक्रार आहे.

२ रस्त्यावरून दोनदोनशें तीनतीनशें हाताचे अंतरावर गल्ल्यांतून मुद्दा वाळलेला कडु लिंबाचा पाला, गंधक आणि डामर कमिटीनें जाळावें. हल्लीं लिंबाच्या पाल्याची मुळींच वाण नाहीं. या करितां थोडे हंगामी नोकर भरती करावे लागले तरी कमिटीनें मागें पुढें पाहूं नये. हवा शुद्ध करण्यासाठीं विशेषतः सायंकाळीं हा धूर वस्तीभर झाला पाहिजे.

३ हल्लीं लोकांस बीटाचा चपराशी भेटणें अधिकाऱ्याच्या भेटीपेक्षां देखील अधिक कठीण झालें आहे. कमिटींतील नोकरलोक देखील सहनुभूतीनें वागत नाहींत व अंगावर येतात अशा तक्रारी ऐकू येतात.

यासाठीं बीटाच्या चपराश्यानें जरूर प्रत्येकाच्या घरीं जाऊन विचारपूस करून त्यास जरूर असेल तितकी मदत द्यावी. ह्मणजे लोकांस चपराशी शोधनार्थ हिंडण्याचे ऐवजीं चपराश्यास लोकसाह्यार्थ हिंडावयास लावावें. या मदतीसाठीं हंगामी चपराशी वाढवून त्यांस सफाई कामदारांभोंवतीं घोळका घालून दौड करण्यास लावूं नये.

४ नदीचें पाणी अद्यापही लोकांच्या पिण्यांत येतें. नळाचें पाणी जोंपर्यंत हल्लीं प्रमाणेंच नियमितकाळपर्यंत मिळत राहील तोंपर्यंत नुस्ता उपदेश किंवा नुसती सल्ला उर्फ दौंड्या कांहीं काम देणार नाहींत. उन्हाळ्यामुळें पिण्याचें पाणी लागतें दुप्पट व आजवर नदीचेंच पाणी पिणारांची संख्या जर नळाकडे धावली तर नळांची काल मर्यादा निदान तिपटीनें तरी वाढविली पाहिजे. सिव्हिल स्टेशनमध्यें नळ सारखे चालू असतात, शहरांत आणि विशेषतः जुन्या वस्तींत मात्र कालमर्यादा आहे. ती बिमारी बीमोड होईपर्यंत वाढणें शक्य असल्यास वाढवावी. ही अडचण जलकोठाच्या पुरवठ्यावर आहे हें आह्मास कबूल आहे. परंतु त्या बरोबर हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं शक्य तितके उपाय केल्यास ही बीमारी ८।१५ दिवसांत नाहींशी होण्यासारखी आहे.

५ नदीचें पाणी नेण्याकरितां कांहीं विवक्षित ठिकाणींच घाट आहेत. त्या ठिकाणीं सोयीवार हंगामी डक्की करावी. ह्मणजे निदान गाळलेलें तरी पाणी लोकांस मिळेल.

६ डायलूट सल्फ्युरिक सीड सकाळ संध्याकाळ १०।१० थेंब पीत गेल्यानें या व्याधींचें भय रहात नाहीं. हा प्रतिबंधक उपाय आहे. सर्व खाजगी आणि सरकारी दवाखान्यांत हें औषध विपुल ठेवून मागणारांस देण्यांत कमिटीनें हात सढळ ठेवावा.

७ रोगग्रस्थास ताबडतोब मदत मिळेल अशी व्यवस्था करावी. वरील सूचना कमिटी अमलांत आणील अशी आह्मास पूर्ण खात्री आहे. कॉलरा हा रोग टाळतां येण्यासारखा आहे. तो म्युनिसिपालिटी शिवाय कोणी खाजगी व्यक्ती टाळूं पाहिल तर त्यास तसें करतां येण्यासारखें नाहीं. ह्मणून या सूचना कमिटीस कराव्या लागत आहेत. कमिटीचें इकडे लक्ष्य नसेल असें ह्मणवत नाहीं, परंतु प्रत्येकाचा उपाय योजण्याचा मार्ग भिन्न असतो ह्मणून या सूचना केल्या आहेत. सार्वजनीक आरोग्य सार्वजनीक संस्थेनेंच संभाळणें शक्य आहे.

---

## लॉर्ड हार्डिंज साहेब.

तारीख ४ रोजीं लॉर्ड हार्डिंज साहेबांची कारकीर्द संपली. लॉर्ड रीपन प्रमाणें बादशहांचे हे प्रातिनिधी चिरस्मरणीय रहातील यांत शंका नाहीं. त्यांस एतद्देशियांबद्दल सहानुभूति होती परंतु लोकांच्या आशा व आकांक्षा परिस्थितीस अनुकूल आहेत व रास्त आहेत हें त्यांस मान्य होतें. शिक्षणाच्या कामीं ही त्यांनीं बरीच सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. हिंदु युनिव्हर्सिटीची स्थापना आणि स्त्रियांकरितां एका स्वतंत्र कॉलेजाची स्थापना या दोन्ही संस्था त्यांच्या शिक्षणाबद्दलच्या कळकळीची साक्ष देतील. शील आणि शिस्तीचा कोणत्याही प्रगमनशील कार्यावर किती परिणाम घडतो आणि या गुणांच्या अधिक्यावर कोणत्याही कार्याची किती मदार असते हें इतक्या उच्च अधिकारावरून त्यांनींच सांगितलें. देशाच्या परिस्थितीला साजेशी आणि भावी काळालाही शोभेल अशा प्रकारची हिंदुस्थानची उन्नती होईलच. हे उमेदीचे उद्गार त्यांनींच काढून लोकांस प्रोत्साहन दिलें. दिल्लींत त्यांच्यावर जो निंद्य आणि कृतघ्नतामूलक अत्याचाराचा प्रयत्न झाला तो अजीबात विसरून त्यांनीं लोकांवर विश्वास ठेवला व लोकांशीं तादात्म्य बनले. तें फारसे बोलत नसत हें खरें आहे, परंतु खासगी भाषणांत अगर सार्वजनीक भाषणांत त्यांस जे मनापासून वाटत असे तसेंच ते बोलत असत. या देशाचा इंग्लंडवर विश्वास बसेल तर येथील राज्य सहज शांततेनें चालवितां येईल अशी त्यांची खात्री होती. ह्मणजे अन्योन्य विश्वास कसा वाढेल या धोरणावर त्यांनीं येथील राज्य कारभार चालविला. वरील त्यांच्या कारकिर्दीच्या त्रोटक आणि अतिसंक्षिप्त आदर्शावरून ते इतके लोकप्रिय कां झाले हें सहज समजणारें आहे.

---

## पारशी जातींत फूट.

खरोखर तारीख ९ रविवार रोजीं मुंबईस पारशी जातींत जो अश्रुतपूर्व प्रकार घडला त्याबद्दल कोणाइही वाईट वाटेल. पारशी, कोंकणस्थ ब्राह्मण आणि मारवाडी हे हिंदुस्थानांतील कोणत्याही शहरांत नाहींत असें नाहीं. परंतु कोंकणस्थ ब्राह्मण समाजांत अंतस्थ मत्सरानें व परस्पर द्वेशानें आपला अंमल बसवून बरेच दिवसाची फूट पाडली आहे. तो समाज विदीर्ण झाल्यासारखाच आहे. बाहेरगांवीं पडलेले मारवाडी लोक आपल्या जात बांधवाला लागेल ती मदत देऊन उद्योगधंद्यास लावीत असत. पण तो समाजही अलीकडे अंतःकलहानें विदीर्ण होऊं लागला आहे. राहतां राहिले होते पार्शी लोक. क्षुल्लक कारणावरून सर जमसेटजीसारख्या पुढाऱ्यावर प्रतिकूळ टीकेचा मारा होऊन लोकांनीं जाहीरसभेंत गोंधळ करावा हें पार्शी जातीस खरोखर कमीपणा आणणारें आहे. त्या जातींत पुराणप्रिय पक्ष उत्पन्न झाला असून त्या पक्षांतही त्या जातीचे थोरथोर पुढारी आहेत. तो पक्ष ह्मणतो सर जमसेटजीस सर्व जाती तर्फे सभा बोलावतां येत नाहीं. हा पक्ष संख्येनें बराच मोठा आहे. सर जमशेटजींचा पक्ष अल्पसंख्याक आहे. होतां होतां त्या रविवारीं मुंबईच्या टाऊन हालांत प. वा नामदार सर फेरोजशहा मेहता यांच्या संस्मरणार्थ सर्व पार्शी जातीची सभा सर जमशेटजी यांनीं पूर्वीं बोलाविली होती ती भरली. परंतु सभेंत पुराणपक्षाचेच लोक फार होते. यामुळें सर जमशेटजी आपल्या मोटारमध्यें पोलीस आणि युरोपियन कान्स्टेबल्स् यांच्या साह्यानें आले.

टाऊनहालच्या बाहेरच आंत जागा न मिळाल्यामुळें जे लोक उभे होते त्यांस आपले ठराव वाचून दाखऊं लागले. आंतील लोकांनीं बाहेर येऊन मोठ्या मुष्किलीनें सर जमशेटजींस घरीं जावयास लावलें. प्रक्षुब्ध लोकमतास मान देऊन सर जमशेटजी यांनीं हट्टानें सभा भरविली ही पाहिली चूक. मारामारी झाली नाहीं व कसला ही दंगा झाला नाहीं ही गोष्ट खरी आहे तरी लोकश्रेष्ठांबद्दल जनतेचा आदरभाव कमी होत जाणें हें कोणत्याही देशास अगर त्यांतील पोटसमाजांस फार विघातक आहे. समाजाग्रणींना मान देऊन त्यांच्यामर्जीप्रमाणें वागणें हा एक आत्मसंयमनाचा महत्वाचा धडा आहे. हा प्रत्येकानें गिरवला पाहिजे. सर्व समाज आपाआपली सुधारणा करू पहात आहेत. त्याच प्रमाणें जे समाज एका वेळीं तरी सुव्यवास्थित होते ते अधीक सुव्यवस्थित होणें अत्यंत जरूर आहे. संमेलनें, परस्पर दळण वळण, समानभय आणि समाजाकडून मिळणारा धन्यवाद यां बद्दल समाज अवयवांस ह्मणजे समाजव्यक्तींस जों पर्यंत आदर वाटत नाहीं आणि त्याच्या रोषाचें भय वाटत नाहीं तोंपर्यंत समाजगाडा लंगडत चालेल यांत संशय

---

## इशारा.

(स्थानिक सरकारास विद्यार्थी चमू विषयीं)

विद्यार्थी हे जसे देव आहेत, तितकेच ते सैतानही आहेत. त्यांचा देवपणा विदेच्या टाकीनें जर बहिःस्फुट झाला नाहीं तर त्यांच्यामधील दांडग्या बीजशक्ती सैतानाच्या कृतीनें राष्ट्रावर अनुपकार करितील. विद्यार्जनाचा हक्क निसर्गसिद्ध आहे. आणि तो साध्य करून देण्यापलीकडे सरकारचें दुसरें उच्च पवित्र कर्तव्यच नाहीं. हल्लींच्या शाळांमधून विद्यार्थ्यांचा साय होत नाहीं आणि हायस्कूलचे शिक्षक आपल्या प्रवेश परीक्षेंत जेवढी संख्या पाहिजे तेवढी निवडून घेतात आणि बाकीच्या विद्यार्थ्यांस त्यांच्या मूळच्या शाळेंतील ती यत्ता उतरली असल्यामुळें त्यांस त्रिशंकू प्रमाणें मध्येंच तिष्टत रहावें लागतें. शिक्षणांतील दोषामुळें जर अराजक कल्पना उत्पन्न होत असतील तर त्या कल्पनांना मूर्तरूप देण्याचें रिकामपणाचें कार्य अशा स्थितींत हीं भूतें तत्काल हातीं घेतील. जर शाळा पुरेशा नाहींत तर हल्लींच्या महायुद्धानें निश्चित करून सांगितलेलें लष्करी शिक्षण तरी विद्यार्थ्यांना सुलभ करून देणें अत्यावश्यक आहे. या बाबतींत वऱ्हाडचे इन्स्पेक्टर राजश्री डिक्स् साहेब हे लवकरच वरिष्ठांकडून हुकूम आणवितील अशी आह्मांस उमेद आहे.

---

## हिंदुस्थानचा लष्करी खर्च.

हिंदुस्थानच्या बजेटांत आजपर्यंत लष्करी खर्चाची वाढ जशी नेटानें होत गेलेली दिसते तशी अन्य कोणात्याही खर्चांत दिसत नाहीं. शिक्षण व आरोग्य या बाबतींत ही वाढ झाली असती तर तिच्या विरुद्ध कोणी ब्र काढला नसता. कारण, या गोष्टींत पैसा खर्च करणें हा खर्च नसून तो पैसा व्याजीं लावल्यासारखा फलद्रूप असतो. लष्करी खर्चाची वाढ पहा—

| साल | खर्च कोटि रु. |
|---|---|
| १८८४-५ | १७.५ |
| १८९४-५ | २३.५ |
| १८९९-१९०० | २६-४ |
| १९०३-०४ | २७.२ |
| १९०९-१० | २८६ |
| १९१३-१४ | २९.८ |
| १९१५-१६ | ३०.२५ |
| १९१६-१७ | ३४.७५ |

ह्मणजे गेल्या ३० वर्षांत हा खर्च दुप्पट झाला! नव्या सालच्या बजेटांत हिंदुस्थानचें एकंदर उत्पन्न १२६ कोटि रुपये व नुसता लष्करी खर्च ३३ कोटी रुपये ह्मणजे एकंदर उत्पन्नाच्या चतुर्थांशा पेक्षां ही आधिक धरण्यांत आला आहे. सध्या युद्धाचा काळ असल्यामुळं स्वसंरक्षणार्थ याहून ही ज्यास्त खर्च करावा लागला तरी तो अनवश्यक ह्मणतां येणार नाहीं. परंतु सामान्यतः शांततेच्या काळांत हा तो तसाच राहणें किंवा वाढत जाणें कदापि इष्ट ह्मणतां येणार नाहीं.

---

## जपानचा लष्करी खर्च.

जपानचें एकंदर वार्षिक उत्पन्न ५५, ७१,९१७७६ येन आहे. एक येन ह्मणजे सरासरी १॥ रुपया. आणि त्याच देशाचा लष्करी खर्च ८३,१३६,३४२ येन ह्मणजे एकंदर उत्पन्नाचा षष्ठांश किंवा सप्तमांश आहे. या खर्चांत सैन्य व आरमार या दोवांचा ही समावेश झालेला आहे.

पण हिंदुस्थानाला स्वतःचें आरमार नसतां ही नुसत्या सैन्याप्रीत्यर्थ उत्पन्नाचा चतुर्थांश द्यावा लागतो. आरमार खर्च धरल्यास हें प्रकार त्याहून ही अर्थातच वाढेल.

## इंग्लंडचा वाटा

हिंदुस्थानचें बाह्यशत्रूपासून रक्षण करण्यास इतक्या सैन्याची अवश्यकता असती तर हा येवढा ही खर्च मुकाट्यानें करणें प्राप्त होतें. कारण 'आत्मानं सततं रक्षेत्' पण तसा-ही प्रकार नाहीं. हिंदुस्थानचें तीन लक्ष सैन्य आज युरोप वगैरे ठिकाणीं लढण्यास गेलें आहे, पण त्यामुळें हिंदुस्थानची सुरक्षितता बिल्कूल कमी झालेली नाहीं खरें झटलें तर हिंदुस्थान आपलें ताब्यांत ठेवल्यानें इंग्लंडचा पुष्कळच फायदा होत आहे. हिंदुस्थानच्या राज्य कारभाराच्या मोठाल्या पगाराच्या जागा, व्यापारांतला अजस्त्र नफा आणि इतर लाभ सगळा इंग्लंडच्या पदरांत पडतो. असें आहे तर हिंदुस्थानच्या लष्करी खर्चाचा वाटा योग्य प्रमाणानें इंग्लंडनें देणें हा खरा न्याय आहे

## शिक्षणाचा खर्च.

१९१४ १५ सालच्या बंगाल इलाख्याच्या शिक्षणखात्याच्या रिपोर्टांतले आंकडे अनेक दृष्टींनीं अतिशय बोधप्रद आहेत गेल्यासाली कॉलेजांत जागा न मिळाल्यामुळें भटकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असतां एक ही नवें कॉलेज नवें निघालें नाहीं. सरकारानें स्वतः काढलें नाहीं, व युनिव्हर्सिटीनें घालून दिलेले नियम इतके कडक आहेत कीं खाजगी कॉलेज लोकांच्या प्रयत्नानें निघणें बहुतेक अशक्य झालें आहे. काशीम बाजारच्या महाराजांनीं आपल्या संपत्तीचा मोठा भाग शिक्षणाचे कामीं लावण्याचा संकल्प करून एक खाजगी कॉलेज काढण्याचा बेत केला, पण त्याला युनिव्हर्सिटीकडून परवानगी मिळाली नाहीं असें ऐकतों. हा एकंदर प्रकार खरोखर अत्यंत शोचनीय आहे. सरकार जवळ शिक्षणाचे कामीं खर्चण्याला पैसे नाहींत असें ह्मणावें तर सगळी काटकसर हिंदी विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरतीच आहे, युरोपियन शाळांना मदत करतांना ती दिसत नाहीं. एकंदर युरोपियन व युरोशियन विद्यार्थ्यांची संख्या बंगाल्यांत सुमारें १० हजार आहे, आणि त्यांचेसाठीं प्रांतिक सरकारानें ११,८९,२३६ रुपयांची ग्रांट दिली आहे. देशी विद्यार्थ्यांची संख्या १७ लक्षांवर असून त्यांचे साठीं फक्त ६४,९९,३३६ रुपये दिले आहेत. ह्मणजे प्रत्येक युरोपियन व युरेशियन विद्यार्थ्यामागें सरकारनें ११८ रु. दिले, आणि तेच प्रत्येक देशी विद्यार्थ्यासाठीं पुरे ४ रुपये सुद्धां खर्च केले नाहींत !

## काटकसर.

सध्याच्या सारख्या प्रसंगीं सरकारानें योग्य बाबतींत काटकसर करणें अवश्य आहे असें आह्मी ही ह्मणतों, पण ती योग्य बाबतींत व योग्य मार्गानें व प्रमाणानेंच व्हावयाला पाहिजे आहे येवढेंच आमचें ह्मणणें आहे. सरकारी पत्रव्यवहार निष्कारण क्षुद्र बाबीसाठीं किती वाढतो व त्याचे पायीं किती कागद, शाई, पाकिटें वगैरेंचा खर्च होतो तें सरकार पाहील तर आश्चर्यचकित होईल. सरकारी पत्रव्यवहारासाठीं निष्कारण जाडे कागद वापरण्यांत येतात. कागदाचा अर्धा भाग सभास ह्मणून खोडून देण्यांत निष्कारण नुकसान होतें. सरकारी कामदारांच्या दौऱ्याचे वेळीं ही पुष्कळ पैसा भत्ता ह्मणून निष्कारण खर्च होतो. अशा निष्कारण खर्चांत काटकसर करण्याला पुष्कळ जागा असतां तिकडे सरकारी अधिकाऱ्यांचें लक्ष जावें तसें जात नाहीं. थंड हवेच्या ठिकाणां सरकारी ठाणें नेण्यांत होणारा खर्च ही संध्याचे सारखे प्रसंगीं अनाठायींच झटला पाहिजे. पण तो बंद करण्यांत येत नाहीं. आणि शिक्षणासारख्या अत्यंत लोकोपयोगी कामाला काटकसरीची कात्री लावण्यांत येते या प्रकाराला काय ह्मणावें तें कळत नाहीं.

# महायुद्ध.

महायुद्धाच्या बातम्या पाहिजे तितक्या कडाक्याच्या नसतात व त्यामुळें तिकडील तारा वाचण्यामध्यें मन विशेष रमत नाहीं हा बाह्यप्रकार झाला. पण या महायुद्धाची हरण काळजी सर्वच राष्ट्रांना सारखी झिंगवीत आहे. सरकारी वृत्तपत्र दोस्त राष्ट्राचे जय व जर्मनीचे पराभव यांच्या कथा सांगत असतें. पण त्या सर्व निर्जीव वाटतात. जर्मन राष्ट्राच हातपाय फार लौकर जखडले जातील असें दीड दोन वर्षांपूर्वी वाटलें होतें पण तें अभ्रपटल ब्रिटिश साम्राज्याच्याच काय पण इतर दोस्त राष्ट्रांच्याही डोळ्यांवरून दूर होण्यास पुष्कळशीं मनोराज्यें उलथी पालथीं व्हावीं लागलीं आहेत. अशावेळीं मानवी विचाराचे मनोरे असे जेव्हां जेव्हां जमीनदोस्त होतात तेव्हां तेव्हां मनुष्याची दृष्टी त्या त्या गोष्टी मधील ईश्वरी योजनेकडे आपोआप वळते. इतिहासांतला हा जितका अपूर्व योग आहे तितकीच याच्या बुडाशीं निरनिराळी सूत्रें हलत आहेत. इंग्रजासारख्या बलाढ्य राष्ट्रांना मानवी पामरपणा लवकर कळून चुकला असेल, आणि त्या बरोबर इंडियासारख्या जित राष्ट्राच्या उदात्त राजानिष्ठेची खरी किंमत ही ध्यानांत आली असली पाहिजे. या अद्भुत गोष्टी बरोबर दुसरीही हाडवैराचीं जुनीं राष्ट्रीय पापें काल प्रवाहांत धुवून गेलीं आहेत. नाहीं तर फ्रान्स रशीया व इंग्लंड या तीन राष्ट्रांचा एकरंगी सामना जर्मन राष्ट्राच्या मृत्युस्थानीं होण्याचा संभवच नव्हता. पश्चिम रणक्षेत्र घ्या, मेसापोटेमिया घ्या, किंवा ग्रीसच्या बाजूच्या सर्वत्र युद्धाची धुमश्चक्री पहा आणि हार व जीत यांचे डाव आह्मा सारख्या दूरच्या ऐकणाऱ्यांच्या मनाला विलक्षण संमोह पाडतात. प्रस्तुत सारख्या लढाया राष्ट्राचे दैवीगुण उदयास आणतात आणि ही अशी एक रासायनिक रसशाला आहे कीं येथें मनुष्याच्या अंगांतील शौर्य, देशभक्ती. मित्रभाव प्रसंगावधान व सर्वस्व त्यागाची बुद्धी हीं इतकीं मनुष्याच्या अंतःकरणांतून फुलून बाहेर पडतात कीं एवढ्या प्रचंड प्राणहानीमध्यें अंतर्लीन असे ईश्वरी संकेत फार विलक्षण असले पाहिजेत. काऊंटस् टॉलस्टॉय यांनीं लढाईच्या पूर्वीं भाकीत केल्याप्रमाणें व्यक्तिस्वातंत्र्याचे अमर्याद अतिरेक, व्यापाराच्या बलावर दुसऱ्याची हिरावून घेतलेलीं स्वातंत्र्यें आणि विश्वबंधुत्वाला झुगारून देणारीं मीपणाचीं राज्यें हीं या प्रलयाच्या रक्त प्रवाहांत साफ चक्काचूर होऊन गेल्याशिवाय राहणार नाहींत. या महायुद्धाचे अस्ताचे क्षितीजा कडील काळोखी रात्र मनुष्याला क्षणभर भिऊन टाकील तरी त्याच्या पूर्वक्षितिजाच्या दिशा निराळ्याच आशांनीं उजळल्या आहेत. आणि 'सत्यमेव जयते' हा ईश्वरी कायदा आपला प्रकाश सर्व जगाला कल्याणकारक लवकरच होईल. असे युद्ध विशारद तज्ञ मंडळी हा शांतीपर्वाचा पाठ ह्मणू लागले आहेत हें दुःखांत सुख होय.

## ड्युप्लीचें चरित्र.

(इतिहासांतलें गूढ.)

फ्रान्सची कल्पना व इंग्लंडची करणी या दोन गोष्टी जगाला विस्मय करावयाला लावीत आहेत; आणि हा विस्मयाचा विषय ह्मणजे इंडियाचें साम्राज्य होय. कवीच्या कल्पना, तत्ववेत्याचे विचार, शास्त्रज्ञांचे सिद्धांत हे ईश्वरी प्रसादच होत. पण ते ज्या राष्ट्रांत निर्माण होतात तेथेंच त्यांची परिणामभूमी कधीं कधीं दिसून येत नाहीं आणि फ्रान्सच्या ड्युप्लीनें जें इंडियाविषयीं मनोराज्य केलें तें ईश्वरी संकेतानें कसे निराळ्याच राष्ट्राच्या हातून घडून आलें हा मनोरंजक इतिहास रा. रा. कृष्णाजी बल्लाळ गोडबोले यांनीं तयार केलेला आहे पूर्वींचे त्या वेळेचे इतिहास राजश्री गोडबोले यांच्या दृष्टीनें वाचल्यास मनाला मोठें कौतुक वाटेल. या पुस्तकाची भाषा इतकी साधी, सुलभ व मनोरंजक आहे कीं विद्यार्थ्यांनींही हें पुस्तक कर्मणुकीवजा वाचण्यासारखें आहे. आणि इंडियाच्या भवितव्यतेंत पूर्व व पश्चिम याकडील राष्ट्रांची किती विलक्षण गुंतागुत आहे याचें चित्र प्रस्तुतच्या महायुद्धांत पाहण्याला हें पुस्तक चांगलें मार्गदर्शक होईल. कर्नाटकचा नबाब ही भव्यपदवी ड्युप्लीच्या डोळ्यापुढें केवढी तरी खेळत होती; पण थोड्या शतकांत ती नामशेष होऊन उरली आहे. राजसत्तेनें ही नबाब पदवी त्यावेळीं श्रीमान होती; पण राजसत्ता नाताच तीच पदवी मनाला क्षुद्र वाटते. कर्नाटकच्या नबाबीप्रमाणें आमच्या राष्ट्रांतील पुष्कळशा गोष्टी ज्या वैभवशून्य झाल्या आहेत त्या पुनः राजसत्तेनें श्रीमान करण्याची अकबरी राजपद्धती आमच्या राजकर्त्यांनीं अद्याप पुरेशी उचललेली नाहीं. आणि असेच विपर्यास हें पुस्तक मोठ्या गोड भाषेनें या जुन्या ड्युप्लीच्या काळच्या इतिहासांतले दाखवीत आहे. ते विपर्यास दूर करण्याचा काल आमच्या राज्यकर्त्यांच्या हातीं ईश्वर कृपेनें आलेला आहे व तो प्रस्तुतच्या महायुद्धानंतर जेव्हां हिंदी स्वराज्याची ब्रिटिश साम्राज्याखालीं पुनर्घटना होईल तेव्हांचाच हा काल होय.

## विद्या कोषाचे खजिनदार

रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी हे आमच्या नगरचेच काय पण साऱ्या मध्यप्रांताचे किंबहुना महाराष्ट्राचे मोठे भूषण आहेत. वयाला ७० वर्षे होण्याचा काल समीप येत चालला असूनही हे दांडगे विद्यार्थी आहेत व तसेच शिक्षक ही आहेत. विद्यादानानेंच विद्येचा कोष कसा हस्तगत होतो हे गेल्या तिन्ही महिन्याच्या विविधज्ञान विस्ताराचे अंक चाळले असतां सहजी लक्ष्यांत येईल 'गीता रहस्या'वर त्यांची नवी टीका विशेष मनन करण्यासारखी आहे. गीतारहस्य वाचतांना किती तरी ग्रंथांची उपकरणीं त्यांनीं संकलित केलीं होतीं व त्या रहस्यावरही त्यांच्या टिकेनें चांगला प्रकाश पडला आहे. राष्ट्रीय सभेवरील त्यांचा लेख तसेच कै. गोखले यांच्या चरित्रावरील मार्मिक लेख हे बहुसाळ बुद्धीमतीची चांगली साक्ष देतील. या उन्हाळ्यांत ते बुलडाण्यास जाऊन तुकारामाचे अभंग इंग्रजी काव्यद्वारा महाराष्ट्रापेक्षां थोरल्या जगापुढें आणणार आहेत. यांचें इंग्रजी कवन देखील प्रसादयुक्त असून अभंग समजण्याला पुष्कळदां मल्लिनाथा सारखे वाटत त.

## वऱ्हाडवृत्त

हवापानः— या सतकांत मेघ, वायु व वीज यांचें तुमुल युद्ध चाललें आहे. क्वचित थोडा पाऊसही पडला. वातावरणांतील ही क्षुब्धता अगदी आकस्मिक होती. पण आतां हवेंत थोडासा थंडोसा येऊन उत्तर रात्रीं गुलाबी थंडीही वाटते. ऊन पुनः तीव्र होत चाललें आहे. रोगराई समृद्ध आहे हाही प्रस्तुतच्या हवेंतील मोठा दोष होय.

रा. रा. दौलत झाबाजी देशमुख तहशिल्दार मुर्तिजापूर यांस सैन्याची भरती करण्याच्या कामीं स्पेशल आफेसर नेमल्या कारणानें रा. रा गोविंद महादेव देशपांडे नायबतहशिल्दार मलकपूर यांस मुर्तिजापूरास आफिशिएटिंग तहशिल्दार नेमण्यांत आलें.

यवतमाळची जिल्हा परिषद् ६ व ७ मेला भरणार असून अध्यक्षस्थान नामदार रा. मोरेश्वर राजाराम दिक्षित यांस देण्याचा विचार ठरला आहे.

रा रा. एच स्पेन्स डेप्युटि पोलीस इन्स्पेक्टर जनरल यांस सुमारें १९ महिन्यांची रजा देण्यांत आली असून त्यांच्या रजेंत रा. रा. गेयर जिल्हा पोलीस सुपरिंटेंडंट नागपूर यास डिपुटी इन्स्पेक्टर जनरलची बढती देण्यांत आली आहे.

रा. रा. एफ टी. कूट जिल्हा सुपरिंटेंडंट यांच्या ६ आठवड्याच्या रजेंत वर्धा येथें रा. रा. नारायण वामन डेपुटि सुपरिंटेंडेंट यांस त्या जिल्ह्याचे कपतान साहेब नेमण्यांत आलें.

रावबहादुर राजाराम सीताराम दिक्षित सुप्रसिद्ध कान्ट्राक्टर नागपूर यांस अर्धांग वायूच्या विकृतीनें मेल्या गुरुवारीं नागपूरास देवाज्ञा झाली. दिक्षित घराण्याचा लौकिक व थोरपणा यांनींच फार विस्तृत केला व यांच्याच पराक्रमानें मध्यप्रांतांत तें घराणें श्रीमंतीलाही चढलें आहे. हे नेमस्त विचाराचे असत व सार्वजनीक कामांत हे नेहमीं पुढाकार घेत. अशीं अनुभवानें पिकलेलीं माणसें मृत्युवश होतात हें यथाकालच होय, त्यांचे चिरंजीव रा. मोरोपंत आपला वडिलांचा कित्ता अधिक वळणदार करण्यासारखे कुशल आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

## पत्रव्यवहार.

### महामारीं वरील औषध

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस सा. न. वि. वि. खालील मजकूर सर्व लोकांचे उपयोगी असलेमुळें तो आपण आपलें पत्रांत छापाल अशी आशा धरून आपल्याकडे पाठवीत आहे. तरी तो आपण आपले पत्रांत छापावा अशी विनंती आहे

महामारी ह्मणजे ज्यास पटकी, कालर हवेचा उपद्रव वगैरे ह्मणतात त्यावर अत्यंत खात्रीचें औषध खालीं लिहीलें प्रमाणें आहे.

हें औषध अनुभव घेतलेलें असून ज्या ज्या लोकांस तें दिलें गेलें त्यापैकीं एकही मनुष्य जाया झाला नाहीं. कालऱ्यावर पुष्कळ लोकांचीं औषधें आहेत व त्यानें गुणही येतो परंतु त्या औषधाबद्दल पुष्कळ लोकांस माहिती नसते त्यामुळ त्याचा उपयोग लोकांस होत नाहीं. जरी माहिती असली तरी रोग सुरूं झाल्यावर पत्र पाठवून औषध येऊन रोग्याचे तोंडांत पडेपर्यंत शेंकडो लोक मृत्युमुखीं पडतात. कधी कधीं रोगही बंद होऊन जातो अशा रोगावर आयत्या वेळीं बाहेर गांवांहून औषध आणण्यापासून उपयोग होत नाहीं. औषधाचा अगोदरच संग्रह करून ठेवणें चांगलें परंतु असे दूरदर्शी लोक थोडे असतात. व औषध प्रत्यक्ष मागविणारे दुर्मीळच असतात. आमचे औषध चार महिने टिकत असलें मुळें तें केव्हांही करून ठेवलें तरी चालेल. परंतु जेथें ताजें औषध करण्यास सवड असेल तेथें जुने औषधावर न भागवितां ताजे औषध तयार करावें हें चांगलें. प्रत्येक गांवीं एक दोन तरी सुखवस्तु लोक असतात. अशा लोकांनीं हें औषध तयार करून ठेवलें व गांवांतील लोकांस दिलें तर लोकांवर मोठे उपकार होतील. या औषधास मुख्य पथ्य हें आहे कीं रोग्या मनुष्यास चांगला गुण येईपर्यंत ह्मणजे लघवी चांगली होऊन पोट साफ होईपर्यंत खावयास कांहींच देऊं नये दूध देखील देऊं नये. चांगला गुण येण्यास एक दीड दिवस लागतो. मनुष्यास अन्न न देतां नुसतें पाणी दिलें तरी मनुष्य मरत नाहीं हें सर्वांस माहित आहे. आपलेकडे दोन दोन दिवस तीन तीन दिवस लंघन करितात. काशीकडे १९-२० दिवस देखील लंघन करितात. या वरून एक दोन दिवस पोटांत अन्न गेलें नाहीं तरी मनुष्य मरत नाहीं हें उघड असून रोग्याचे नातलग रोग्याची कींव करून अगर अन्नाशिवाय शक्ती राहणार नाहीं असें विनाकारण मनांत आणून रोग्यास खाण्यास देतात. परंतु या औषधावर खाण्यास दिल्या बरोबर रोगी मरतो या साठीं या औषधावर रोग्यास चांगला गुण येई पर्यंत खाण्यास देऊं नये असे दंगे नेहमी होतात. याबद्दल इतकें लांब लिहिणें भाग पडलें. खाण्यास न देणें हें पथ्य ज्याचे कडून राखले जाणार नाहीं. त्यानीं व खाण्यास दिल्या शिवाय शक्ती राहणार नाहीं अशी ज्याची खात्री असेल त्यानीं हें औषध देऊं नये हेंच बरें असो, अन्न देण्याचें तें प्रथम जड अन्न देऊं नये. प्रथम साबुदाणा वगैरे हलकें अन्न द्यावें व नंतर क्रमानें नेहमी प्रमाणें अन्न देणें धर्मानें व्याधी हरते असा नियम आहे साठीं ज्या ज्या मनुष्यास या औषधानें गुण येईल त्यानें इसम ८–। आणा प्रमाणें धर्मदाय करावा असें हें औषध सांगणाराचें ह्मणणें आहे साठीं ज्यास रकम पाठविणें असेल त्यानें ती पोष्टाचे टिकीटानें संस्थान श्रीकृष्णेश्वर मु. शहर सातारा पेठ व्यंकटपुरा याचे म्यानेजरकडे पाठवावी. त्या रकमेचा उपयोग सदर्हु संस्थानचे खर्चाकडे सदर्हु संस्थानचे म्यानेजर ठरवतील त्या दुसऱ्या धर्मकृत्याकडे करण्याचा आहे. प्रत्येक इसमानें वेगळी वेगळी रकम न पाठवितां गांवांत रकम जमा करून मनीऑर्डरीनें सर्वांची रकम एकदम पाठविण्यांत फायदा आहे. साठीं पैशाची अफरातफर न होतां तसें करणें जेथें शक्य असेल तेथें रकम गोळा झालेवर एकदम पाठविणें. या रकमेचा उपयोग फक्त वरील संस्थानचे खर्चाकडे करण्याचा नसून इतर धर्म कृत्याकडे ही करण्याचा आहे. साठीं सर्व धर्माचे लोकांनीं पैसे पाठविण्यास हरकत नाहीं वर प्रमाणें इसमी ८–। पाठविलाच पाहिजे असाही त्यानें नियम ठरवून ठेवला नाहीं. केवळ परोपकारा करितां हें औषध छापलें आहे व पैसे पाठविणें अगर न पाठवणें हें ज्याचे त्यानें आपले शीलाप्रमाणें ठरवून करावें असो औषध कसें तयार करावयाचें व तें कसे कसे घ्यावयाचे तें खालीं लिहिलें आहे.

१ कापूर कचोरी तोळे १२॥
१ कलमी तोळे १२॥
१ वेलदोड्याचे दाणे तोळे ५
१ बडीशोप तोळे २५

या प्रमाणें औषधें आणावीं. औषध कमी जास्त करणें असेल तर वरील प्रमाणें कम जास्त औषधें आणावीं. मग तीं कुटून बारीक करावी. वस्त्रगाळ करण्याची जरूरी नाहीं नंतर त्यांत सुमारें २० शेर पाणी घालून चुलीवर ठेवून निंमे पाणी आटवून निंमे पाणी राहील तें घेऊन बाटलींत भरून ठेवावें.

रोग्यास प्रथम हा काढा दोन तोळे देणें व नंतर दिवसांतून एकदां अगर दोनदां हाच काढा प्रत्येक वेळेस दोन तोळे प्रमाणें द्यावा

रोग्यास तहान लागेल तर नुसतें पाणी देऊं नये. चांगलें पाणी दहाशेर घेऊन त्यांत वरील काढा पांच तोळे घालून मिसळून तें पाणी वरचेवर पिण्यास देणें. ज्याचे जवळ काढा पुष्कळ असेल त्यानें पिण्यास नुसता काढा दिला तरी चालेल परंतु काढा मुबासिक असलेमुळें त्यानीं तहान भागणार नाहीं या साठीं वर सांगितले प्रमाणें काढा घातलेलें पाणी पिण्यास देणें.

ओकारी होत असेल तर कापराचा अर्क पांच थेंब साखर वर घालून खाण्यास देणें. या प्रमाणें प्रत्येक ओकारीचेवेळीं देत जाणें.

पोट झोंबत असेल तर ह्मणजे पोट दुखत असेल तर एक तोळा हिंग एक शीशीभर पाण्यांत कुटून घालावा व हलवून मिसळावा नंतर तें हिंगाचें मिश्रण २ तोळे प्रथम देऊन मग वरील काढा वर लिहिले प्रमाणें देणें.

अंग गार पडेल तर कायफळाची पूड वस्त्रगाळकरून ती हातापायास चोळावी व डोक्यासही चोळावी अगर डोक्यावर पूड घालून डोकें फडक्यानीं घट्ट बांधून टाकावें.

याप्रमाणें केल्यास रोगी कधीच दगावणार नाहीं. जे जे लोक या औषधाचा उपयोग करतील त्यांनीं हें औषध किती मनुष्यास दिलें व त्यापैकीं किती मनुष्यास गुण आला हें कृपाकरून वरील संस्थानचे व्यवस्थापकाकडे कळवावें ह्मणजे ते आकडे सर्व लोकांचे फायद्या कारितां प्रसिद्ध करण्यांत येतील कळावें ही विनंती.

मु. दारव्हा.<br>
प्रांत वऱ्हाड<br>
ता२९-१०-१३ } वामन रामचंद्र गोखले<br>
वकील

---

## नोटीस

तमाम लोकांस कळविण्यांत येते कीं तीर्थस्वरूप गंगाभागीरथी पार्वतीबाई भ्रतार गंगाधर बालकृष्ण अघोर (देवरीकर) मयत वकील वस्ती खामगांव जिल्हा आकोला, वऱ्हाड, यांचा मी खालीं सही करणार एकुलता एक नातू आहे. गंगाधर बालकृष्ण हे माझे सख्खे आजे होते. पार्वतीबाई ह्या माझ्या सावत्र आजी आहेत, माझे आजे गंगाधरपंत वकील यांची स्वसंपादित स्थावर व जंगम इस्टेट मौजे खामगांव व तालुका खामगांव जिल्हा आकोला, वऱ्हाड येथें असून ती सर्व इस्टेट पार्वतीबाई यांचे ताब्यांत व वहिवाटींत असून त्या इस्टेटीची गैर कायदा विल्हेवाट करण्याचे विचारांत आहेत असें कळतें. पार्वतीबाईस मूल बाळ कांहीं एक नाहीं. सबब मी सर्वोतोपरी त्या इस्टेटीचा त्यांचे पश्चांत वारस आहे. तरी कोणीही ती इस्टेट विकत वगैरे घेऊं नये. घेतल्यास ते ते जबाबदार होतील. माझी सखी आजी होती तीसही माझी मातोश्री शिवाय दुसरें आपत्य नव्हते कळावें हे विनंति.

धुळें जिल्हा } सही<br>
पश्चिम खानदेश } भिकाजी रामचंद्र दाणी<br>
१९-४-१९१६<br>
नो. नं. १४७

---

## जाहिर खबर

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं, माझा चिरंजीव नागोजी वा॥ भगाजी राऊत वय १७-२० राहणार दहिगांव हा वाईट लोकांच्या नादी लागून दुर्व्यसनी निघाला आहे. तो आमच्या आज्ञे बाहेर आहे इतकेंच नाहींतर लबाड लोकांच्या फुशीनें तो माझ्या नांवावर कर्ज काढूं पाहतो असेंही माझ्या कानावर आलें आहे. माझ्या स्थावर जंगम जिनगीवर त्याचा काडीमात्र हक्क संबंध नाहीं. त्यास कोणीही साहू सावकारानें कर्ज देऊं नये किंवा त्याच्या बरोबर गहाण, खरिदी, इत्यादि व्यवहार करूं नये. तसें करण्याचा त्याला कायद्यानें अधिकार नाहीं, व त्याच्या व्यवहाराचा बोजा माझ्यावर किंवा माझ्या जिनगीवर राहणार नाहीं. साहूसावकारांनीं फसूं नये ह्मणून ही मुद्दाम नोटिस प्रसिद्ध केली आहे. घरांतील चीजवस्तु किंवा दागदागिना याच्या संबंधानें गहाळ होणाऱ्या जिन्नसा जेव्हां पत्त्यांत येतील तेव्हां साथीदारावर फौजदारींत मी फिर्यादही करणार आहे. या नोटिशीनें जर नागोजी शुद्धीवर येणार नाहींतर त्याच्या सोबत्याचीं नांवें पोलिसांत मी लिहून कळवीन. ता. २१. ४-१९१६ इ०

सही<br>
भगाजी वा॥ भोनाजी राऊत रा. दाहिगांव<br>
ता० अकोट निशाणी रेघ<br>
नो० नं० १४८

---

## जाहिरात

आकोले म्युनिसीपाल कमेटीच्या आफिसांतून देण्यांत येतें कीं सन १९१६-१७ सालाकरितां खालीं लिहिलेल्या कामांचीं टेंडरें ता० ३० एप्रिल १९१६ इसवी च आंत, संध्याकाळपर्यंत, म्युनीसिपालिटीचे ऑफिसांत द्यावींत.

**कामाचें नांव.**

१ रस्ते रिपेरींचे व व्हाइटवाशिंगचें काम करणें
२ मुरूम, गोट्टी, मलमा, रेती पुरवणें.
३ कंदील पुरवणें व रिपेअर करणें
४ बत्तीकडे चिमण्या, काच, नवे दिवे, डब्बे, बर्नर व वाती पुरवणें
५ गोडें तेल, व खोबरेल तेल पुरवणें
६ कमीटीकडील हुर्के, वह्या वगैरे बांधण्याचें काम करणें
७ सर्व प्रकारचें लोंखंडी सामान पुरवणें, घमेले, बकेट, फावडे, कुदळी वगैरे, वगैरे
८ सर्व प्रकारचें लाकडी सामान पुरवणें; चाक जोड्या, खुर्च्या, टेबलें, अलमाऱ्या, बोर्ड, वगैरे वगैरे
९ जळाउ लाकडे व गोवऱ्या पुरवणें
१० गटारावरील छावण्या पुरवणें
११ मराठी औषधें पुरवणें
१२ मळलेला चुना पुरवणें
१३ कुत्रां मारण्यासाठीं १ ग्रेन स्ट्रिकनियाच्या बरमाइनच्या पुड्या पुरवणें.
१४ स्टेशनरी पुरवणें.
१५ इंग्रजी औषधें पुरवणें.
१६ कमीटीस लागणारे सर्व प्रकारचें छपाइचें काम करणें.
१७ मैला पुरण्या करितां गड्डे खोदणें व झाडाकारितां गड्डे खोदून झाडें पुरवणें.

१ टेंडर देणारानीं टेंडरास आपली सही किंवा निशाणी स्वतः करावी. आकडे चिताड करूं नयेत.

(२) मक्तयाच्या शर्ती व कामाची माहिती कमेटीच्या आफीसांत, ऑफीसच्या दिवशीं व आफीसाचे वेळीं मागितली असतां मिळेल.

(३) सर्वांहून कमी टेंडरें कमेटी कबूल करील असें समजू नये.

A. S. Khan<br>
व्हाइस चेअरमन.<br>
म्युनिसीपाल कमेटी<br>
आकोलें

नो नं० १४९

## नोटीस

रा. रा. 'खुशालचंद फूलचंद' दुकानचे मालक लालचंद खुशालचंदजी गुजराथी

(२) शेख बदर वल्लद शेख बाबा

(३) शेख राहिमान वल्लद शेख बाबा सर्वजण राहणार बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं शेख बदर व शेख राहिमान या उभयतांनीं ७।९।१२ च्या पत्राअन्वयें आमची शेतीची बहिवाट जबरदस्तीनें हांऊं न दिल्या कारणामुळें आमची पहिल्या वर्षाची नुकसानी व वायद्याची रक्कम सुमारें रुपये ११८ आह्मास विनाकारण भरावी लागल्यामुळें ती नुकसानी मिळून त्यांच्याकडे कमींत कमी आमची रक्कम ७२० रुपये निघतात. त्या रक्कमेच्या फेडीकडे शेख बदर व शेख राहिमान यांना आमच्याकडून स्वामीत्वाची जी रक्कम घेणें आहे व घेणें होईल ती वसूल भरण्यांत यावी असा पूर्वीच विचार झाल्यामुळें आह्मी त्यांच्यावर फिर्याद केली नाहीं पण आतां असें कळतें कीं त्यांच्याकडून राजश्री लालचंद यांनीं त्या स्वामीत्वाच्या रकमेंचा करारनामा मुद्दाम कपटानें लिहून घेतला आहे तेव्हां तुह्मा त्रिवर्गास कळविण्यांत येते कीं आमच्या दोन वर्षांच्या नुकसानीची रक्कम आह्मास मिळेपर्यंत तो करारनामा कायद्यानें रद्द आहे. आमची नुकसानी स्वामीत्वाची रक्कम वजा जाऊनही जी निवते ती ही नोटीस पोचल्या तारखेपासून ८ दिवसाच्या आंत आणून पावती करावी. तसें न झाल्यास रितीप्रमाणें दावा करण्यांत येईल, कळावें तारीख २१ एप्रिल १९१६ इ०

सही

ताजमहमद राजमहमद राहणार पेठ बाळापूर

नो. नं. १४५

## नोटीस

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें.

किरकोळ मुकद्दमा नंबर ४० सन १९१६ इ. विद्यमान डि० जज्ज साहेब बहादुर यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नांव नारायण

बापाचें नांव बापुराव

जात ब्राह्मण राहणार कापशी

तहसील आकोला जिल्हा आकोला

च्या अल्पवयी महादेव गंगाराम

उमर वर्षें १४

राहणार माणकी, ता. बाळापूर तहसीलीचें जातीसाठीं व मालासाठीं पालन कर्ता नेमलजाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं

सर्वत्र लोकांस

सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें जातीसाठीं व मालासाठीं पालन कर्ता नेमले जाण्या विषयीं अर्ज केल्या वरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीचा तारीख १७ माहे जून सन १९१६ इ. रोजीं नेमिली आहे त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जा बद्दल जर कोणास कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिति दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्यांच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झालें पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १० माहे ४ सन १९१६ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशी दिली

V. M. Kelker

नो. नं. १४६ डि० जज्ज आकोला पश्चिम वऱ्हाड

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

### मदनामृतसंजीवनी.

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता कडक गर्मी संबंधें मरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळातरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल. दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. अपूर्व नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. परम्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह. तिडीक, मुत्राची लाला, सकळ, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसतां सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १। भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, प्रथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका आसवें, तेलें व सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं.

पत्ताः—मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी. — कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

ना० नं० २०

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd.

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY.

## FUNDS almost 5 CRORES.

INVESTED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BONDS.

*Claims paid* $4\frac{1}{2}$ CRORES

## A Decennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Existing Assurances. |
|---|---|---|
| 1884 | 4.823 | 1,59,25,200 |
| 1894 | 20,110 | 5 26,08,850 |
| 1904 | 43,356 | 8 88,02,223 |
| 1914 | 65,269 | 12,37,10,910 |

| Year. | Total Income. | Total Assets. |
|---|---|---|
| 1884 | 6,77.552 | 14,41,429 |
| 1894 | 4259,,607 | 94,49,971 |
| 1904 | 43,64,808 | 2 47,18,8 |
| 1914 | , 72,46,0 | 4,96,8650 |

## SPECIAL FEATURES.

Absolute Security—Low Rates—Liberal Conditions.

Forty years continuously increasing prosperity.

Ninety per cent of the entire Profits, after provising for the Reserve fund divided among the Policyholders every 3 years.

Native Lives are accepted at the same rates as Europeans

Loans granted to policyholders at reasonable rates.

Prompt Payment of Claims.

***Influential andactive agents wanted Terms liberal***

:0 -

Full particulars, prospectus and proposal forms on application to:—

R. Paterson Brown
Manager

*A. C. Lal,*
Branch Secratary
*C. P. Berar & Khandesh*
Nagpur.

N. N. 22

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.